म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१७०
REFBK-0019898
REFBK-0019898

मराठी ग्रंथ संग्रहालय
१६८८८
ठाणे (स्थळ प्रत)

सं. क्र. २१७००

मराठी कवींची

# बोधमणिमाला.

हीं

रा. बाळकृष्ण अनंत भिडे. बी. ए.,

यांनीं गुंफिली,

REFBK-0019898

ती

महादेव केशव काळे,

यांनीं

मुंबई येथें 'तत्त्वविवेचक' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति.

चैत्र, शके १८३१.

किंमत ४ आणे.

## रा. बा. अ. भिडेकृत इतर पुस्तकें.

| | | आणे. | पै. |
|---|---|---|---|
| १. | प्रभुप्रसादन. .... .... .... .... .... | ० | ६ |
| २. | कवींचे बोल, खंड १ लें. .... .... .... | ५ | ० |
| ३. | कवींचे बोल, खंड २ रें. .... .... .... | ५ | ० |
| ४. | फुलांचे झेले अथवा स्फुट काव्यसंग्रह (स्वकृत)..... | ६ | ० |
| ५. | वामनपंडित ( वृत्त व ग्रंथ ). .... .... .... | ४ | ० |
| ६. | मुक्तेश्वर ( वृत्त व ग्रंथ ). .... .... .... | ६ | ० |
| ७. | तुकारामबोवा ( वृत्त व ग्रंथ ) .... .... .... | ८ | ० |

किमतीशिवाय ट. ख. निराळा पडेल. पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील.

पत्ता.

**म० के० काळे,**

पेंडसे यांची वाडी, गिरगांव—मुंबई.

२१७००

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

१. सांप्रत प्रचलित शिक्षणपद्धतीची धार्मिक व पौराणिक ग्रंथांशीं फारकत झाल्यामुळें व तींत मराठीचा मान अनेक कारणांनीं जात चालल्यामुळें, आमचा विद्यार्थिवर्ग स्वतःच्याच पूर्वजांच्या काव्यकृतीला पारखा झालेला आहे. सामान्य जनांचीही स्थिति या बाबतींत शोचनीयच झाली आहे. व्यवहारांत इंग्रजीचें प्रस्थ दिवसेंदिवस माजत जाऊन, मराठीचा सासुरवास वाढत आहे; हरिकीर्तन, पुराण, पोथीवाचन, वगैरे पूर्व प्रकार हेळसांडीनें मागें पडून, त्यांच्या जागीं कोणत्याही नवीन संस्था उद्भवल्या नाहींत; भक्ति व श्रद्धा यांचा अंमल नष्ट होऊन, त्या ठिकाणीं संशय किंवा उदासीनता यांचा पगडा मनावर बसलेला आहे. या गोष्टींनीं पूर्व कवींचा परिचय मागें पडून, ओळखही विसरल्यासारखी होऊं लागली आहे. ही स्थिति सुधारण्याला एक उपाय हा दिसतो कीं, मराठींतील प्रासादिक काव्यांच्या स्वस्त आवृत्त्या छापून व त्यांतील सुंदर सुंदर वेंचे काढून, ते विद्यार्थि व सामान्य वाचक यांच्या हातीं पडतील असा प्रयत्न करण्यांत यावा. याच दिशेनें प्रस्तुत प्रयत्न आहे.

२. काव्यग्रंथांतील वेंचे अनेक धोरणांनीं काढतां येण्यासारखे असतात. सृष्टींतील देखावे, मानवी स्वभाव, युद्धादि प्रसंग, सुंदर आख्यानें, हृदयंगम संवाद, प्रासादिक व प्रतिभाद्योतक रचना, शृंगारादि रसांचा उत्कर्ष, सामान्य नीति, ईशभजन, संगीतादि प्रकार, अलंकारादि साहित्याचीं अंगें, इत्यादि एक किंवा अनेक गोष्टींवर कटाक्ष ठेवून निरनिराळ्या तऱ्हेची निवड होण्याजोगी आहे. प्रस्तुत प्रयत्नांत मुख्यत्वें सामान्य व्यावहारिक नीति व धर्मनिष्ठा यांवर रोंख ठेविलेला आहे.

३. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादि साधु कवींचे अभंग म्हणजे भक्तिरसाचे अखंड प्रवाह व नीतिरत्नांचीं अक्षय भांडारेंच होत. परंतु त्यांतील वेंचक उतारे देण्याचें काम अनेक विद्वज्जनांनीं पूर्वींच केलेलें आहे. यास्तव

मराठींतील पद्यात्मक वाङ्मयाच्या त्या महत्त्वाच्या विशाल भागाला मुळींच स्पर्श केलेला नाहीं. प्रस्तुतचे सर्व वेंचे एकनाथ, शुभानंद, मुक्तेश्वर, श्रीधर, महीपति यांच्या ओंवीबद्ध ग्रंथांतून व वामन मोरोपंतांच्या काव्यांतून घेतले आहेत. साधुस्तव, सत्संग, नाममहिमा, नामरसायन, केकावली, सन्मनोरथराजी वगैरे मोरोपंती स्फुट प्रकरणें स्वतंत्र रीतीनें सबंधच वाचण्यासारखीं असल्यामुळें त्यांचा या पुस्तकांत समावेश केला नाहीं.

४. हे उतारे निवडण्याच्या कामीं रा. रा. बाळकृष्ण सीताराम जोशी, मुरूड-जंजिरा, यांनीं जें मनसोक्त साहाय्य केलें, त्यांबद्दल त्यांचे प्रेमपूर्वक आभार मानण्यांत येत आहेत.

५. अखेर वाचकांस एवढीच विनंति आहे, कीं—

प्रसादें चेतोऽब्जें विपुल फुलवीते रविसम,
प्रतापोत्कर्षत्वें तम शमविते भ्रांतिविषम, ।
जगद्बंधुत्वानें सरलवर, अन्याय खणिते,
दृढस्नेहानंदें शुचिरुचि वरा **बोधमणि** ते. ॥

मुरूड-जंजिरा,<br>१९ जून १९०५.

बा० अ० भिडे.

---

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

१. 'बोधमणिमाला' हें पुस्तक आर्य नीतीचा आदर्श म्हणून रचिलेलें आहे. यांतील सर्व वचनें प्राचीन महाराष्ट्रीय साधुकवींचीं आहेत. परंतु महाराष्ट्रीय साधुकवींचे ग्रंथ प्राचीन आर्य ऋषिप्रणीत ग्रंथांचीच प्रतिबिंबें असल्यामुळें, प्रस्तुत मणिमालेंतील तत्त्वें अत्यंत प्राचीन कालीं आर्यावर्तांत उभारलेल्या व आजपर्यंत

ह्यात राहिलेल्या नीतिमंदिराचे आधारस्तंभच आहेत, असें म्हणणें अतिशयोक्तीच्या कोटींत येऊं शकणार नाहीं.

२. कोणत्याही राष्ट्रांत शिक्षणाचा प्रसार किती झाला आहे हें पहाण्याची एक साधारण कसोटी त्या राष्ट्रांतील ग्रंथसंख्येची वाढ, ही होय. ज्या वेळीं इतर सर्व प्राच्य व पाश्चात्य् राष्ट्रें अज्ञानांधकारांत लोळत पडलेलीं होतीं, त्या वेळींसुद्धां आपल्या भरतखंडांत धर्म, वेदान्त, गणित, नीति, वैद्यक, ज्योतिःशास्त्र, शिल्पकला, गायन, लेखनकला, इत्यादि सर्व शास्त्रांत आर्यलोक प्रवीण झाले असून, यांपैकीं प्रत्येक विषयावर त्यांचे अगदीं स्वतंत्र असे ग्रंथ तयार झालेले होते; इतकेंच नव्हे, तर बहुतेक सर्व शास्त्रांत व कलांत शिखरास जाऊन पोंचलेल्या व अर्वाचीन सुधारणांत प्रमुखत्वानें मोडणाऱ्या सर्व राष्ट्रांचें गुरुपद आपल्या भरतभूमीसच देणें भाग आहे, ही गोष्ट सर्वमान्य झाल्यासारखी झाली आहे. सामाजिक व्यवस्था उत्कृष्ट रीतीनें, अबाधित, आणि यथान्याय चालून, धर्माचीं व नीतीचीं तत्वें पूर्णपणें मनांत बिंबावीं व ईश्वरनिष्ठा, नीतिनैपुण्य, व्यवहारदाक्षिण्य, संप्रदायपटुत्व, आणि आचारशील, यांचा पाया पुढील पिढीच्या अंतःकरणांत खोल बसला जावा या हेतूनें तर अगदीं वैदिककालापासून आमच्या आर्य पूर्वजांनीं किती आटोकाट श्रम केले आहेत, ह्याचें ढळढळीत प्रमाण म्हटलें म्हणजे काळाच्या भयंकर जबड्यांतून आज सुमारें ५।६ हजार वर्षें आमचें व आमच्या नीतिग्रंथांचें अस्तित्व कायम राहिलें आहे हेंच होय. वेद, उपनिषदें, वगैरे आद्य ग्रंथ आणि मनु, याज्ञवल्क्य, बृहस्पति, नारद, कण्व, गौतम, वगैरे महान् महान् ऋषींनीं लिहिलेले धर्म व नीतिशास्त्र यांवरील ग्रंथ, यांचे ज्यांनीं ज्यांनीं म्हणून निरीक्षण केलें आहे, त्यांनीं आमच्या पूर्वजांच्या धर्म, नीति, वगैरे शास्त्रांतील नैपुण्याबद्दल फारच तारीफ केली आहे. यानंतर आमच्या धार्मिक, सामाजिक, व व्यावहारिक नीतीचीं तत्वें आणि राजधर्म व क्षात्रियधर्म, ज्ञानकांड व कर्मकांड, उपासनामार्ग व भक्तिमार्ग, धर्मसंस्था व लोकसंस्था, व इतर उपयुक्त विषय, या सर्वांचा थोडाबहुत विचार वाल्मीकि, व्यास, आदीकरून पुराणकर्त्यांनीं रामायण-महाभारतादि ग्रंथांत फारच सुंदर तऱ्हेनें गोंविलेला दृष्टीस पडतो.

३. ह्याशिवाय ख्रिस्ती शतकाचे आरंभास कामंदकीय नीतिशास्त्र या नांवाचा व्यावहारिक नीतिशास्त्रावर एक स्वतंत्र ग्रंथ आमच्या पूर्वजांनीं लिहिलेला आहे. नंतर पंचतंत्र, नीतिशतक, वैराग्यशतक, सरस्वतीकंठाभरण, सप्तशतक, सप्तशती, सदुक्तिकर्णामृत, शार्ङ्गधरपद्धति, हितोपदेश, वगैरे नीतिबोधक ग्रंथ पांचव्या शतकापासून चौदाव्या शतकापर्यंत निरनिराळ्या वेळीं रचले गेले आहेत. या सर्वांत पंचतंत्र व हितोपदेश हे दोन ग्रंथ इतके उत्कृष्ट साधले आहेत कीं, प्राच्य व पाश्चात्य देशांत त्यांचीं भाषांतरें वहुतेक सर्व भाषांत प्रसिद्ध झालीं आहेत.

४. अज्ञ भारतीयांसाठीं मराठी भाषेंत धर्म व नीति शास्त्रांचीं तत्त्वें स्पष्ट करून सांगण्याचें जेव्हां आमच्या नीतिनिपुण पूर्वजांच्या मनांत आलें, त्या वेळीं त्यांच्या काव्यशक्तीस तर इतकें कांहीं भरतें आलें कीं, मुकुंदरायांपासून तों तहत मोरोपंत, महीपति, श्रीधर, यांच्या काळापर्यंत, म्हणजे, सुमारें गेल्या ६००।७०० वर्षांत संस्कृत ग्रंथांच्या भाषांतररूपानें, किंवा स्वतंत्र ग्रंथ म्हणून, कोणत्या तरी निमित्तानें, त्यांनीं आम्हांस आपलें कायमचें ऋणी करून ठेवलें आहे.

याप्रमाणें धर्म व नीति या शास्त्रांचीं मूलतत्त्वें हिंदु ग्रंथांत व हिंदु धर्मांत सर्वत्र पसरलीं असून, तीं वेद, पुराणें, शतकें, तंत्रें, यांपासून तों तहत तुकोबा, रामदास, मोरोपंत, श्रीधर, वगैरेंच्या ग्रंथांत ठिकठिकाणीं मूर्तिमंत दृष्टीस पडतात; यामुळें हिंदु पिंडांत तीं जशीं कांहीं हाडींमासीं खिळूनच गेलीं आहेत, इतकेंच नव्हे, तर परधर्मी लोकांच्या तीक्ष्ण आघातालाही तोंड देऊन तीं अद्याप जशींच्या तशींच शाबूत राहिलीं आहेत.

५. परकीयांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर सुरू झाल्यापासून भारतीयांस परकीयांचे आचारविचार, धर्म व नीतितत्त्वें, सामाजिक व राजकीय संस्था, शिक्षणपद्धति व व्यापारपद्धति, वगैरेंचें अवलोकन करण्याची संधी मिळून आपल्यांत चालू असलेल्या संस्थांची त्यांशीं तुलना करून त्यांतून निवड करण्याची चांगली संधी मिळाली; यामुळें सारासारविचार करून आपल्यांतील त्याज्यांश टाकून, परकीयांच्या

आचारादिकांतील ग्राह्यांश घेण्यास त्यांनीं सुरवात केली. या सुधारणेच्या भरांत त्यांनीं कदाचित् चुकाही केल्या असतील, परंतु प्रस्तुत आपल्याला त्याबद्दल ऊहापोह करावयाचा नाहीं. आम्हांस येथें इतकेंच सांगावयाचें आहे कीं, इतर बाबींत ज्याप्रमाणें सुधारणा होऊं लागल्या आहेत, त्याप्रमाणेंच वैदिक कालापासून तों तहत पाश्चात्यांचा व आमचा राजकारणसंबंध सुरू होईपर्यंत आमची जी शिक्षण-पद्धति होती, तीस इतर बाबींबरोबरच पाश्चात्यांच्या संगतीनें व विशेषतः मुद्रण-कलेच्या योगानें एक निराळेंच वळण लागलें. पूर्वीं दोनदोन तीनतीन तपें गुरुगृहीं घालवून पुस्तकाच्या मदतीशिवाय, चौदा विद्या, चौसष्ट कला, शास्त्रें, पुराणें, यांचें मुखोद्गत पारायण करण्याची पद्धति होती. आमचें सर्व संस्कृत ज्ञानभांडार पद्यांत गुंफण्याचें मूळ कारणही तेंच असावेंसें वाटतें, व तोच कित्ता संस्कृतकालानंतरच्या महाराष्ट्रीय विद्वज्जनांनीं व संतमंडळींनीं गिरवून, शिक्षणपद्धति सुलभ होण्याकरितां धार्मिक, नैतिक, वगैरे तत्त्वें पद्यांत गोंविलेलीं दिसतात. परंतु आमची शिक्षण-पद्धति हल्लीं बदलल्यामुळें आमची पाठ करण्याची शक्तीही कमी कमी होत चालली, व त्यांतले त्यांत छापखान्याची कला फारच सुधारल्या कारणानें कोणताही ग्रंथ मुखोद्गत करून त्याचें रक्षण करण्याची आतां जरूरीही राहिली नाहीं. यामुळें परमेश्वरनाम-स्मरणादि धार्मिक कृत्यें सहजीं मागें पडलेलीं दृष्टिगोचर होतात, व पूर्वींच्या शिक्षणपद्धतीप्रमाणें मराठी काव्यांत ग्रथित केलेले व्यावहारिक नियम व सामान्य-नीतितत्त्वें यांचें स्मरणही दुर्मिळ होत चाललें आहे.

६. प्रस्तुत लेखाचे आरंभीं सांगितल्याप्रमाणें राष्ट्राला विद्येची अभिरुचि लागली आहे किंवा नाहीं, याची प्रतीति पाहाणें झाल्यास भाषेंतील ग्रंथसंख्येवर नजर दिली म्हणजे झालें. या कसोटीनें पाहूं गेलें असतां मराठी भाषेची अद्याप बरीच शोचनीय स्थिति आहे, व मराठी वाचकांत अद्याप व्हावा तसा विद्याप्रसार नाहीं, हें मोठ्या खेदानें कबूल करावें लागतें. कोणत्याही ग्रंथाची आपोआप दुसऱ्या आवृत्तीपर्यंत मजल गेली आहे, अशी गोष्ट बहुधा सांपडणें कठीण जाईल. तेव्हां

अशा स्थितींत प्रस्तुत पुस्तकाची द्वितीयावृत्ति काढण्याचा सुयोग मालाकारांस आला आहे, हें मोठें भाग्यच समजावयाचें.

७. या आवृत्तींत बरीच सुधारणा केलेली वाचकांचे सहज नजरेस येईल. मागील आवृत्तींतील विषय २४ ते २८ म्हणजे गुरुशिष्यसंबंधाचे सर्व विषय, अजीबात गाळून टाकण्यांत आले आहेत. पूर्वीच्या शिक्षणपद्धतीप्रमाणें गुरुशिष्य यांचे दरम्यान जें नातें असे, त्यास पुष्कळां अंशीं फांटा मिळून पूर्वीपेक्षां हल्लीं परस्परांमधील आदरभाव व प्रेमभाव बराच कमी झालेला दिसतो. पूर्वींचा देव आणि भक्त किंवा पिता आणि पुत्र यांच्याशीं तुलना करण्यासारखा गुरुशिष्यसंबंध जाऊन, त्या ठिकाणीं हल्लीं दुकानदार व गिऱ्हाईक, किंवा सेवक व धनी, यांच्या तोडीचा तो संबंध झालेला आहे. तेव्हां तो विषय अजिबात गाळल्यास फारसें नुकसान नाहीं, असें वाटल्यावरून त्यास या आवृत्तींत फांटा देण्यांत आला आहे. प्रथमावृत्तींत ओंव्यांचा भरणा जास्त असल्याकारणानें पुस्तकाचा जो मूळ उद्देश, कीं यांतील वेंचे विद्यार्थिवर्गास व इतर वाचकांस सहजीं पाठ करतां यावे, तो सिद्धीस जाण्यास बरीच अडचण पडण्यासारखी होती. शिवाय, कांहींजणांकडून नवीन आवृत्तींत ओव्यांची संख्या कमी करण्यांत यावी, अशाबद्दल सूचनाही आलेल्या होत्या. त्याप्रमाणें या आवृत्तींत शक्य ती सुधारणा करण्यांत आली आहे. पूर्वीपेक्षां हल्लींच्या आवृत्तींत पद्यसंख्याही वाढविण्यांत आली आहे व रुचिवैचित्र्याप्रमाणें सर्वांस त्याची गोडी लागावी म्हणून त्यांत निरनिराळ्या चालींवरचीं पदें, आर्या, अभंग, श्लोक, यांचाही समावेश केला आहे. तसेंच प्रथमावृत्तींतील कठीण भाग कमी करण्यांत आला आहे. यामुळें एकंदरींत हल्लींची आवृत्ति शाळांतील मुलांस मराठी भाषेच्या द्वारा धर्मशिक्षण व नीतिशिक्षण यांच्या कामीं उपयोगी पडण्यासारखी व वाचनाची अभिरुचि असलेल्या इतर वाचकांसही आवडण्यासारखी व्हावी, असें धोरण ठेवण्यांत आलें आहे.

पांडुरंग.

१९८९५

# विषयक्रम.


| अनुक्रमांक. | विषय. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| १ | ईशस्मरण. | १—४ |
| २ | खरा तीर्थवास. | ४—७ |
| ३ | प्रपंच. | ७—१६ |
| ४ | चिंता. | १६—१९ |
| ५ | आई. | १९—२३ |
| ६ | नरदेह. | २३—२६ |
| ७ | दारिद्र्य व याचना. | २६—३२ |
| ८ | श्रोतावक्ता. | ३२—३५ |
| ९ | संतांचा उपदेश व पुण्यकथा. | ३५—३८ |
| १० | श्रद्धा, भक्ति, व भक्त. | ३९—४१ |
| ११ | यश, कीर्ति. | ४१—४३ |
| १२ | उपकार. | ४३—४८ |
| १३ | पंडित. | ४८—५१ |
| १४. | देवतुल्य सत्पुरुष. | ५१—५३ |
| १५ | संतमहिमा. | ५३—६० |
| १६ | साधुच्छळाचें फळ. | ६०—६३ |
| १७ | साधुरीति. | ६३—६८ |
| १८ | मूर्खपण. | ६८—७३ |
| १९ | उद्योग व आळस. | ७३—७८ |
| २० | षड्रिपु. | ७८—८४ |
| २१ | कामादिकांचा सदुपयोग. | ८४—८५ |

| अनुक्रमांक. | विषय. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| २२ | द्रव्यलोभ. ... ... ... ... ... ... | ८६–८९ |
| २३ | विषयलोभ, तृष्णा, आशाळभूतपणा. ... ... ... | ८९–९८ |
| २४ | ताठा, अभिमान, अहंकार. ... ... ... ... | ९८–१०४ |
| २५ | क्रोध. ... ... ... ... ... ... ... | १०४–१०८ |
| २६ | विवेक व शांति.... ... ... ... ... ... | १०८–१११ |
| २७ | पराक्रम, खरें तत्त्व. ... ... ... ... ... | १११–११४ |


---

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १० | २ | रमार्थाची | परमार्थाची |
| १५ | २ | अपकारा | ममकारा |
| ,, | २२ | मतपीयो | मत पीयो |
| १९ | ५ | ठेवीन | ठेवी |
| २३ | ६ | दवें | दैवें |
| ३१ | १२ | थारींव | थोरींव |
| ६१ | १० | अंघका राती | अंधकाराती |
| ८० | ३ | बिषय सेवुनीच | सेवुनीच विषय |
| ,, | ६ | दंभ. | दंभ, |
| ,, | ७ | ०प्रभृतिंचा | ०प्रभृतींचा |
| ,, | १३ | ०लोभनगा | ०लोभ नगा |
| ,, | १४ | शोधन | शोभन |
| ,, | १५ | क्रोध लोभ काम० | क्रोधलोभकाम० |

---

3/1/1

# बोधमणिमाला.

## १. ईशस्मरण.

### पद.

वंदियला भगवंत । तो म्यां ॥ ध्रु० ॥
भवसिंधुतारक, निजसुखकारक, । सकळां आदी अंत. ॥ तो म्यां० ॥१॥
सज्जनरंजन, अखिलनिरंजन, । भक्तजनां कृपावंत. ॥ तो म्यां० ॥ २ ॥
वेद झाले मुके, शेष स्तवु न शके, । ज्याचें रूप अनंत. ॥ तो म्यां० ॥३॥
नव्हे नरनारी, गैबी सूत्रधारी, । हालवि जो जिवजंत. ॥ तो म्यां० ॥ ४ ॥
म्हणे सोहिरा, अनुभवि पहणें । चित्सुखवनवसंत. ॥ तो म्यां० ॥ ५ ॥

### अभंग.

देवें जन्मासी घातलें, । नाना सुख दाखविलें. ॥ १ ॥
त्यासी कैसें विसरावें ? । पुढें कैसेनी तरावें ? ॥ २ ॥
कुळ समूळ सांभाळिलें, । नाना प्रकारीं पाळलें. ॥ ३ ॥
दास म्हणे, देवावीण । दुजा सांभाळितो कोण ? ॥ ४ ॥

कां रे नाठवीसी कृपाळु देवासी ? । पोसितो जगासी एकलाची. ॥१॥
कोणें केली बाळा दुग्धाची उत्पत्ती ? । वाढवी श्रीपती सवें दोन्ही.॥२।
फुटती तरुवर उष्णकाळमासीं, । जीवन तयासी कोण घाली ? ॥३॥

तेणें तुझी काय नाहीं केली चिंता ? । राहें त्या अनंता आठवूनी. ॥४॥
तुका म्हणे, नांव ज्याचें 'विश्वंभर,' । करा निरंतर ध्यान त्याचें. ॥५॥

## पदें.

कृपाघना ! तुज कां नये करुणा ? । शुकसनकादिक वंदिति चरणां. ॥ ध्रु०॥
उल्केशा भजति गाति महेशा । आगळि निःशंकिनि, जगदाभरणा ! ॥कृपा०॥१
अंतरिचा तूं जाणसि आशय, । पूर्ण करिशि कधिं ? अघसंहरणा ! ॥ कृ०॥२
ध्यान, भजन, मी कांहिंच नेणें; । दास म्हणवितों पतितोद्धरणा ! ॥कृ०॥३

पोटापुरतें देईं; । मागणें लइ नाहीं, लइ नाहीं. ॥ ध्रु० ॥
पोळी साजुक अथवा शिळी । देवा ! देइं भुकेच्या वेळीं. ॥ मागणें० ॥१॥
वस्त्र नवें अथवा जुनें । देवा ! देईं आंग भरूने. ॥ मागणें० ॥ २ ॥
देवा ! काळगा अथवा कोंडा । आम्हां देईं भुकेच्या तोंडा. ॥ मागणें० ॥३॥
तुका म्हणे, [ देवा ] आतां । नका करूं पायापरता. ॥ मागणें० ॥ ४ ॥

सदया प्रभो ! तूं हो ! पावें. ॥ ध्रु० ॥
जन्मापासुनि चुकतचि आलों, । कीं जड मी, न सुज्ञें कोपावें. ॥ १ ॥
मदधिक दीना प्रेम दिल्हें जें, । तेंचि मला सुदीना ओपावें. ॥ २ ॥
भक्त मयूर असें जन म्हणती, । त्वद्यश तें न रामा ! लोपावें. ॥ ३ ॥

ऐक, बा ! रामराया ! । तुझ्या वंदितों पायां, ।
आवरीं आपुली हे विश्वमोहिनी माया. ॥ ध्रु० ॥
मी मूढ हीन दीन, । सर्वकर्मक्रियाहीन, ।
तूं क्षमाशील, देवा ! शुद्धचरित, निजाधीन. ॥ १ ॥

घडो सदा साधुसंग, । नसो विषयप्रसंग, ।
सप्रेम भक्ति द्यावी, सत्त्व, वैराग्य, अभंग. ॥ २ ॥
वाटतें नित्य भावें । तुझे साधु गुण गावे, ।
मन हें आवरेना, सांग, काय म्यां करावें? ॥ ३ ॥
करितां संसारकाम, । मुखीं असो तुझें नाम, ।
दयाघना! **मोर** याचा पुरविसी काम. ॥ ४ ॥

### गीति.

तुमच्या आशीर्वादें जन्मोजन्मीं घडो अशी सेवा, ।
हे वाङ्मन:शरीरें करितों विज्ञापना सदा, देवा ! ॥ १ ॥
आतां प्रभो! दयाळा! मज दीनावरि करूनियां करुणा, ।
स्वपदाब्जीं मन्मानसभृंग रमो; उगवुं दे कृपा—अरुणा. ॥ २ ॥
धांव, समर्था! सदया! भवपंकामाजि बुडतसे गाय. ।
*निकटस्था! सर्वज्ञा! कौतुक अद्यापि पाहसी काय?* ॥ ३ ॥
करुणाघन तूं माथां; जाळितसे मज मृगास भववणवा; ।
वृष्टि न करितां, होणें उदास; हें योग्य तूज न सकणवा. ॥ ४ ॥
केलें म्यां मनुजाचें आर्जव बहु, चाटुकारही जालों, ।
परि तेथ ताप पावुनि; पुनरपि तुजलागिं शरण मी आलों. ॥ ५ ॥
मन हेंचि फार इच्छी, कीं आतां सेवणें तुझे पाय, ।
तुजवांचुनि इतरांच्या भजनीं मजलागिं होय फळ काय? ॥ ६ ॥
पाळक तूं विश्वाचा, बाळकसा तोंड पसरितों बा! मी!
*व्याळ कराळ कठिणतर काळ, कसा वारिसी न हा? स्वामी!* ॥ ७ ॥

आधार तूं जनाचा; बाधा हरणार एक तूं दक्ष; ।
साधावया यशातें, वा! धांव; तुला नमस्कृती लक्ष. ॥ ८ ॥

—मोरोपंत.

## २. खरा तीर्थवास.

**अभंग.**

वाराणसी तीर्थ थोर, । तेथें लोक जाती फार. ॥ १ ॥
परी तेथें अधिक काये ?। ऐसें विचारोनी पाहें. ॥ २ ॥
जेथें तेथें देव धोंडा, । तो कां आपुले गांवीं सांडा ? ॥ ३ ॥
येथें लोक, तेथें लोक, । अवघें एकची उदक. ॥ ४ ॥
**देवीदास** म्हणे, वेडें । तीर्था धांवे अवघ्यांपुढें. ॥ ५ ॥

तीर्था जाती देखोदेखीं, । तेथें कैसी होत पाखी ? ॥ १ ॥
पाप गेलें, पुण्य जालें, । प्रत्ययासी कैसें आलें ? ॥ २ ॥
म्हणती, 'जाऊं वैकुंठासी ?' । कैसें येई प्रत्ययासी ? ॥ ३ ॥
**देवीदास** म्हणे, हित । कैसें जाहलें स्वहित ? ॥ ४ ॥

दाढी भादरिती, । केंस मागुते निघंती. ॥ १ ॥
शुचिष्मंत झाला कसा ? । विवेक पाहाना कां ऐसा ? ॥ २ ॥
देवासाठीं तीर्था जाती, । परी कां मागुते फिरती ? ॥ ३ ॥
**देवीदास** म्हणे, भ्रम । ज्ञानेंवीण अवघा श्रम. ॥ ४ ॥

## ओंव्या.

तीर्थीं न वसतां तीर्थवास, । सत्यवंत नित्य निर्दोष; ।
तीर्थीं वसतां पुण्यलेश । तीर्थें एका नेदिती. ॥ १ ॥
मत्सर, नैष्ठुर्य, भूतद्वेष, । भजनमार्गींचा उपहास, ।
तीर्थें त्यांचा घेती त्रास; । कीटकदेशीं त्या वसती. ॥ २ ॥
इंद्रियनियमाचा व्यसनी, । सत्य मधुर असे वाणी, ।
अहंकार ज्याचिया मनीं । संचरेना सर्वथा. ॥ ३ ॥
तो सकल तीर्थांचा धात्रा; । तीर्थें करिती त्याची यात्रा; ।
पादोदकालागीं पवित्रा । तीर्थें माथां वोढविती. ॥ ४ ॥
तीर्थीं नसोनी इच्छारहित, । प्रतिग्रहा न घाली हात, ।
यथालाभें संतोषभरित, । तो तीर्थरूप जाणावा. ॥ ५ ॥
परधनीं अंधत्व ज्याचिया नयनां, । परस्त्री पाहतां क्लीबत्व मना, ।
परापवादीं मूकत्व वदना, । तो जनक जाण तीर्थांचा. ॥ ६ ॥
मनइंद्रियनिग्रहकारी, । तो, गृहीं असोनी, जान्हवीतीरीं; ।
तीर्थीं असोनी अनाचारी, । तो कीटकवासी जाणावा. ॥ ७ ॥
सत्यशील, दृढवृत्ती, । आत्मभावना सर्वभूतीं, ।
क्रोध न कधीं का, नाढळे शांती, । तो तीर्थीं सर्वां सेविजे. ॥ ८ ॥
सुबुद्धशील विद्यातीर्थीं, । साधु सुस्नात सत्यतीर्थीं, ।
कुलांगना लज्जातीर्थीं, । पवित्र होती, जाण पां. ॥ ९ ॥
काम, क्रोध, लोभ, त्रया । स्पर्श न करी जयाची काया, ।
तो तीर्थवासी जाण, राया! । तीर्थें पाय वंदिती. ॥ १० ॥

—मुक्तेश्वर.

## पद.

नाहीं नाहीं रे! त्या मार्गी मोक्ष. ॥ ध्रु० ॥

नाहीं नाहीं जन! दाहि दिशा मन, ठायीं नसून, सदाहि गेल्या. ॥ १ ॥
बुडुनि नित्य जळिं, पढत मंत्र मुखि, उडत उडत गति, पडतांचि गेल्या.॥ २ ॥
देश त्यजुनि, शिरिं केश वाढवुनि, वेश धरुनि, तनु भैक्षव केल्या. ॥ ३ ॥
ध्यास धरुनि, हव्यासग्रहाप्रति नासुनि धन, संन्यास घेतल्या. ॥ ४ ॥
लक्ष बेल, नवलक्ष कमल, दल, लक्ष चुकुनि नवलक्ष वाहिल्या. ॥ ५ ॥
नाक धरुनि, दिठि लावुनियां, जप लाख करुनि, तनु राख लाविल्या. ॥ ६ ॥
पवनबंध अनुभवुनि, सरस पद नव नव जोडुनि कवनहि केल्या. ॥ ७ ॥
भंग पिउनि, जगधिंग गळां, उरिं लिंग बांधुनि, जंगम फिरल्या. ॥ ८ ॥
संग त्यजुनि, निःसंग होउनि, निजरंगभजनविण व्यर्थंचि गेल्या. ॥ ९ ॥

## अभंग.

आली सिंहस्थपर्वणी, । न्हाव्या भटा झाली धणी. ॥ १ ॥
अंतरीं पापाच्या कोडी, । वरिवरी बोडी डोई दाढी. ॥ २ ॥
बोडिलें तें निघालें, । काय पालटलें सांग वहिलें? ॥ ३ ॥
पाप गेल्याची काय खूण? । नाहीं पालटले अवगुण. ॥ ४ ॥
भक्तिभावेंवीण, । तुका म्हणे, अवघा सीण. ॥ ५ ॥

काय काशी करिती गंगा? । भीतरीं चांगा नाहीं तों. ॥ १ ॥
अधणीं कुचर बाहेर तैसा, । न ये रसापाकासी. ॥ २ ॥
काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या? ॥ ६ ॥
तुका म्हणे, प्रेमेंवीण । बोले, भुंके, अवघा शीण. ॥ ४ ॥

जाउनियां तीर्था, तुवां काय केलें ? । चर्म प्रक्षाळिलें वरीवरी. ॥ १ ॥
अंतरींचें शुद्ध कासयानें झालें ? । भूषण त्वां केलें आपणया. ॥ २ ॥
वृंदावन फळ घोळिलें साखरा, । भीतरील थारा मोडेचीना. ॥ ३ ॥
**तुका** म्हणे, नाहीं शांति, क्षमा, दया, । तोंवरी कासया फुंदा तुम्ही ? ॥४॥

### पद.

तीरथ कोन करे ? । हमारे । तीरथ कोन करे ? ॥ ध्रु० ॥
मनमें गंगा, मनमें काशी, मनमें स्नान करे. ॥ हमारे० ॥ १ ॥
मनमें आसन, मनमें कडासन, मनमें मौन धरे, ॥ हमारे० ॥ २ ॥
मनमें माला, मनमें मुद्रा, मनमें ध्यान धरे. ॥ हमारे० ॥ ३ ॥
कहत **कबीरा**, सुन भै साधू, भटकत कोन फिरे ? ॥ हमारे० ॥४॥

---

## ३. प्रपंच.

### अभंग.

वाटे संसार दुस्तर, । होती दुःखाचे डोंगर. ॥ १ ॥
तरी श्रवण करावें, । तेणें दुःख विसरावें. ॥ २ ॥
पुढें काय करूं आतां ? । वाटे संसाराची चिंता. ॥ ३ ॥
येतां उभंड धरेना, । मायाजाळ आवरेना. ॥ ४ ॥
दुरी जाउनी विवेक, । आणि आदळतो शोक. ॥ ५ ॥
**रामी रामदास** म्हणे, । दुःख जीवें धरी उणें. ॥ ६ ॥

वेळे पाऊस पडेना, । नासकवडी उघडेना. ॥ १ ॥
ऐसें कुळवाडियाचें भंड, । दुःख जहालें उदंड. ॥ २ ॥

बहुपरी आलें शेत, । रेड्यांपाड्यांचें आऊत. ॥ ३ ॥
कांहीं केल्यानें पिकेना, । धान्य वेळेसी विकेना. ॥ ४ ॥
फाळा लाविला उदंड, । अवघें जहालें थोतांड. ॥ ५ ॥
वारीं रोगाचीं वाजती, । नाना आभाळें फिरती. ॥ ६ ॥
टोळ, पक्षी, मूषकादिक, । खाती श्वापदें आणीक. ॥ ७ ॥
दावेदारांची यातना, । चोरांपोरां राहवेना. ॥ ८ ॥
नित्य पोटाचें मजूर, । वेठीखालीं निघे ऊर. ॥ ९ ॥
घर खोंपट मोडकें; । एक फटकूर फाटकें. ॥ १० ॥
बहु रोगें गुरें गेलीं, । धारणीनें मुलें मेलीं. ॥ ११ ॥
सर्व संसार बुडाला, । **दास** म्हणे जोगी झाला. ॥ १२ ॥

## ओंव्या.

भवाब्धि भरला परम तुंबळ, । द्वैतभावाचा तटाक सबळ, ।
माजीं कुबुद्धीचे कल्लोळ, । मोहजाळ असंभाव्य. ॥ १ ॥
मदमत्सर थोर आवर्त; । कामक्रोधादि समस्त; ।
आशा, तृष्णा, भ्रांति, तेथ । मगरी थोर तळपती. ॥ २ ॥
लोभ मोह नक्र थोर, । ममतेच्या लाटा अतिदुर्धर, ।
दंभ आणि अहंकार । विरोळे हे तळपती. ॥ ३ ॥
अविवेक ही डांकिणी तत्त्वतां, । अविद्याभ्रांति जळदेवता, ।
पीडिती जीवां समस्तां । आशा, तृष्णा, कल्पना. ॥ ४ ॥

—श्रीधर.

## अभंग.

जन्मवरी शीण केला, । अंतकाळीं व्यर्थ गेला. ॥ १ ॥

काया स्मशानीं घातली, । कन्यापुत्र मुरडलीं. ॥ २ ॥
घरवाडा तो राहिला, । प्राणी जातसे एकला. ॥ ३ ॥
धनधान्य तें राहिलें । प्राणी चर्फडीत गेलें. ॥ ४ ॥
इष्ट, मित्र, आणि सांगाती, । आपुलाले घरा जाती. ॥ ५ ॥
**दास** म्हणे, प्राणी मेले, । कांहीं पुण्य नाहीं केलें. ॥ ६ ॥

प्रपंचीं तें भाग्य, परमार्थीं वैराग्य, । दोन्ही यथासांग दोहींकडे. ॥ १ ॥
दोहींकडे सांग होतां, [ तो ] समर्थ; । नाहीं तरी व्यर्थ तारंबळी. ॥ २ ॥
तारंबळी होते विचार नसतां; । **दास** म्हणे, आतां सावधान. ॥ ३ ॥

## ओंव्या.

कांहीं अर्पावें भगवंता; । अति संचितार्थ नये हाता, ।
त्यावरी स्त्रीपुत्रांची सत्ता, । स्वयें मागतां, नेदिती. ॥ १ ॥
अंतीं मागतां कांहीं नेदिती, । शेखीं 'सन्निपात झाला' म्हणती, ।
संचितार्थीं तोंडीं माती । नागविती स्त्रीपुत्र. ॥ २ ॥
म्हणती, 'आतां हा मरेल, । मरतां द्रव्यार्थ वेंचील, ।
आम्हांसी भिक्षेसी लावील, । याचा बोल नायकावा.' ॥ ३ ॥

–एकनाथ.

## पद.

तो भला भला, रे ! भला भला. ॥
प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्याणें केला. ॥ ध्रु० ॥
मातापिता, गणगोत, बायको, । आपण नामरुपांत नायको, ।
श्रवणीं वेदपुराण आयको । गर्व ज्याचा गेला. ॥ तो भला० ॥ १ ॥

संतीत संपति पुष्कळ भारी, । चतुर्विद्येचा कारभारी, ।
रमाथ ॅची ध्वजा उभारी, । संशय ज्याचा गेला. ॥ तो भला० ॥ २ ॥
अंतरिं ज्ञान विरक्ती धरितो, । बाहिर सांग संपादणि करितो, ।
जिवें जिते मोक्षासी वरितो, । भक्तिसि फार भुकेला. ॥ तो भला० ॥३॥
भजन, पुजन, सत्पात्रीं देणें, । **शिवदिन** याविण कांहिंच नेणे, ।
नांदे उद्बोधार्थसुखानें, । **केसरिगुरुचा** चेला. ॥ तो भला० ॥ ४ ॥

## ओंव्या.

आधीं प्रपंच करावा नेटका, । मग ध्यावें परमार्थविवेका; ।
येथें आळस करूं नका, । विवेकी हो ! ॥ १ ॥

प्रपंच सांडून परमार्थ कराल, । तेणें तुम्ही कष्टी व्हाल, ।
प्रपंच-परमार्थ चालवाल, । तरी तुम्ही विवेकी. ॥ २ ॥

प्रपंच सोडुनी परमार्थ केला, । तरी अन्न मिळेना खायाला, ।
मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ? ॥ ३ ॥

परमार्थ सांडूनी प्रपंच करिसी, । तरी तूं यमयातना भोगिसी, ।
अंतीं परम कष्टी होसी, । यमयातना भोगितां. ॥ ४ ॥

संसारीं असतां मुक्त, । तोची जाणावा सुयुक्त, ।
अखंड पाहे युक्तायुक्त । विचारणा हे. ॥ ५ ॥

प्रपंचीं जो सावधान, । तो परमार्थ करील, जाण, ।
प्रपंचीं जो अप्रमाण, । तो परमार्थीं खोटा. ॥ ६ ॥

म्हणोन सावधपणें । प्रपंच-परमार्थ चालविणें; ।
ऐसें न करितां भोगणें । नाना दुःखें. ॥ ७ ॥

संख्या- ८८

चाळणेचा आळस केला, । तरी अवचितां पडेल घाला, ।
ते वेळे सांवरायाला । अवकाश कैंचा ? ॥ ८ ॥
म्हणोन दीर्घसूचनेचे लोक, । त्यांचा पाहावा विवेक, ।
लोकांकरितां लोक । शाहाणे होती. ॥ ९ ॥
परी ते शाहाणे वोळखावे, । गुणवंताचे गुण घ्यावे, ।
अवगुण देखोन सांडावे । जनामध्यें. ॥ १० ॥
मनुष्य पारखूं राहेना, । आणि कोणाचें मन तोडीना, ।
मनुष्यमात्र अनुमाना । आणून पाहे. ॥ ११ ॥
जाणोन पाहिजेत सर्व । हेंची तयाचें अपूर्व, ।
ज्याचें त्यापरी गौरव । राखों जाणें. ॥ १२ ॥
आपणास आहे मरण, । म्हणोन राखावें बरेंपण, ।
कठिण आहे लक्षण, । विवेकाचें. ॥ १३ ॥
थोर लहान समान, । आपुले पारखे सकळ जन, ।
चढतें वाढतें समाधान, । करितां बरें. ॥ १४ ॥
बरें करितां, बरें होतें, । हें तों प्रत्ययास येतें. ।
आतां पुढें सांगावें तें । कोणास काय ? ॥ १५ ॥
विद्या उदंडची शिकला, । प्रसंगमान चुकला, ।
मग तये विद्येला । कोण पुसे ? ॥ १६ ॥

—रामदास.

## अभंग.

गेला प्रपंच हातींचा, । लाभ नाहीं परमार्थाचा. ॥ १ ॥
दोहींकडे अंतरला, । थोरपणें भांबावला. ॥ २ ॥

गेली अवघी निःस्पृहता, । नाहीं स्वार्थही पुरता. ॥ ३ ॥
क्रोधें गेला संतसंग, । लोभें जाहला विरंग. ॥ ४ ॥
पूर्ण झाली नाहीं आशा, । इकडे, बुडाला अभ्यासा. ॥ ५ ॥
**दास** म्हणे, क्रोधें केलें । अवघें, लाजिरवाणें झालें. ॥ ६ ॥

## श्लोक.

वरें सत्य बोला, यथातथ्य चाला, बहू मानिती लोक येणें तुम्हांला. ।
धरा बुद्धि पोटीं विवेकी, मुलें हो ! बरा गूण तो अंतरामाजि राहो. ॥१॥
सदा दांत घांसोनि, तोंडा धुवावें, कळाहीन तें शूद्रमूखी नसावें. ।
सदा सर्वदा यत्न सोडूं नये, रे ! बहूसाल हा खेळ कामा नये रे ! ॥२॥
दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें, प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें. ।
गुणश्रेष्ठ ऊपास्य त्याचें करावें, बरें बोलणें सत्य जीवीं धरावें. ॥ ३ ॥
बहू खेळ खोटा, सदालस्य खोटा, समस्तांसि भांडेल तोची करंटा. ।
बहुतां जनांलागिं जीवीं भजावें, भल्या संगतीं न्याय, तेथें भजावें.॥४॥
हिशेबीं सदा न्याय सोडूं नये, रे, ! कदाचीत अन्याय होतां धका रे ! ।
जनीं सांडितो न्याय, रे ! दुःख होतें, महा सूख तेंही अकस्मात जातें.॥५॥
प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वाया, विवेकेंविणें सर्वही दंभ वायां. ।
बहू सज्जला नेटका साज केला, विचारेंविणें सर्वही व्यर्थ गेला. ॥६॥
वरी चांगला अंतरीं गोड नाहीं, तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं. ।
वरी चांगला अंतरीं गोड आहे, तयालागिं कोणीतरी शोधिताहे. ॥ ६ ॥
सदा अंतरीं गोड ते सांडवेना, कदा अंतरीं ओखटें देखवेना. ।
म्हणूनी बरा गूण आधीं धरावा, महाघोर संसार हा नीरसावा. ॥ ८ ॥

'भला रे! भला!' बोलती तें करावें, वहूतां जनांचें मुखें येश घ्यावें.
परी शेवटीं सर्व सोडून द्यावें, मरावें परी कीर्तिरूपें उरावें. ॥ ९ ॥
बरा ओखटा सर्व संसार झाला, अकस्मात येईल रे! कालघाला. ॥
म्हणोनी भलेसंगती सत्य चाला. जनीं दास तो बोधिताहे मुलांला. ।१०।

## पद.

जैसें ज्यानें केलें, । तैसें त्याला फळ आलें. ॥
ऐसें अनुभवासि आलें, । यांत अमुचें काय गेलें. ॥ ध्रु० ॥
काळव्याळ हा विक्राळ । डंखू पाहे सर्वकाळ, ॥
त्याचें भय सांडुनियां । मूर्खें स्वहित टोलाविलें. ॥ यांत० ॥ १ ॥
भक्त, विरक्त, योगी, संत, । सिद्ध, ज्ञानी, जीवन्मुक्त, ।
त्यांची सेवा करुनी । देवें वैकुंठासी नेले. ॥ यांत० ॥ २ ॥
अर्थ, स्वार्थ, साधन, अर्थ, । केसरि शिवदिन गुरुपरमार्थ ।
गुरुभक्तांचें गुरुभक्तीनें । जन्ममरण चुकवीलें. ॥ यांत० ॥ ३ ॥

## ओंव्या.

अर्जुना! जरी संन्यासी, । डोई बोडोनी, झालासी, ।
तरी कैसा कर्म टाकिसी । क्षण एकही? ॥ १ ॥
लंगोटीही टाकणें, । आणि नग्न होऊनी असणें, ।
तेंही नव्हे काय करणें । अगा! कर्म? ॥ २ ॥
घट वर्ते, तरीच माती, । न वर्ततां काय अन्य जाती? ।
कर्में रचिलीं देहाकृती, । त्याग कर्मांचा तो कैसा? ॥ ३ ॥
भूचर, 'टाकोनी भूमी' । म्हणे, 'पळोनी जाईन मी.' ।
पळतां पुढें रिकामी । भूमीच दिसे. ॥ ४ ॥

गगन टाकोनी, पक्षी । उडों लागला अंतरिक्षीं, ।
तो तों सर्वत्र लक्षी । तेंची गगन. ॥ ५ ॥

—वामनपंडित.

## गीति.

'वनवासें मुक्ति' अशी येऊं देऊं मनीं नको लहरी; ।
झाले मुक्त खग, हरिण, वृक, जंबुक, कां वनीं न, कोल, हरी ? ॥१॥
जरि सर्वां कर्मांच्या संन्यासेंकरुनि म्हणसि सर्व तरे; ।
व्हावेचि मुक्त राजा! तरि हे निःशेष वृक्षपर्वत, रे! ॥ २ ॥
जे अधन, अशक्त, अलस, नास्तिक, कल्पक, तिहींच संन्यास ।
कल्पुनियां चालविला, तैशांसचि योग्य हा, न अन्यास. ॥ ३ ॥
जरि सर्वाधिक नसतें, गार्हस्थ्या तरि कशास या गाते ? ।
याच्या साधिति, लोकीं नच मिरवाया यशास, यागा ते. ॥ ४ ॥
"एकचि करी तिघांचें, एकाचेंही तिघां नव्हे कार्य, ।
ऐसें तोलुनि वदला धाता;" म्हणतात सर्वही आर्य. ॥ ५ ॥
द्यावीं अर्थिजनाला, बहु करुनि क्रतु नवे नवे, दानें; ।
पाठ असोनिहि तरला, उक्त न करितां, न वेन वेदानें. ॥ ६ ॥
मुक्त्यर्थ ईश्वराचें, त्यागावें राज्य न, भजन कराया; ।
सर्वत्र अलिप्तलें होतें सन्मित्र नभ जनकराया. ॥ ७ ॥
ममकार, अहंकार, त्यागुनि होसील मुक्त गेहींच; ।
भव, अपवर्ग, मम, नमम, हे दोघे नांदतात देहींच. ॥ ८ ॥
त्यांत ज्ञाते म्हणती, "जरि केवळ सोडिला अहंकार, ।
तरि होय शीघ्र सर्वव्यवहारोच्छेद, हें नव्हे सार." ॥ ९ ॥

 2900 कार्य

सर्वहि मुमुक्षु म्हणतो, " जे ममता, हेचि होय मम कारा."
यास्तव आधीं अंजलि जोडीं, सोडींच तोय अपकारा. ॥ १० ॥
सर्व मनःसंकल्पित जरि नाहीं त्यागिलें अगा! राया! ।
तरि, बा! बाह्यद्रव्यत्याग वृथा; त्यजसि कां अगारा या ? ॥ ११ ॥
ज्याच्या मनांत लेशहि शेष वसे कायविषयलोभ, वनीं ।
बाह्यद्रव्य त्यागुनि गेला नाहीं, वसेचि तो भवनीं. ॥ १२ ॥
शोकपरा दे गेह न, देहहि, संताप हाहि कारा; हो! ।
संसारीं निजधर्मीं अचळा संता पहा; हिका राहो. ॥ १३ ॥
सावध सदा असावें, संसारीं स्वहित कृत्य लक्षावें, ।
पुरुषार्थाचें साधन बा! धनसें हें शरीर रक्षावें. ॥ १४ ॥
भीष्म म्हणे, "कुलधर्म त्याग नव्हे उचित, मान्य मज आहे. ।
सत्कुलजाचेंचि सदा स्वकुलाचाराकडेचि मन वाहे. ॥ १५ ॥
संसार दों दिसांचा, यश जोडी जो, कुलीन तोचि तरे, ।
घ्यावें ' बरें' म्हणोनी स्वपरमुखीं, हें कुलीनतोचित रे! ॥ १६ ॥
दुःख परासि न द्यावें, सत्य वदावें, क्षमा न सोडावी, ।
जोडावी कीर्ति, अशी कुलरीति बुधें कधीं न मोडावी." ॥ १७ ॥
मृत्यु हरितसे समयीं अमरासहि, कवण मृत्युला चुकवी ? ।
ऐसें जाणुनि तत्व, व्यसनांत न मोह पावती सुकवी. ॥ १८ ॥

—मोरोपंत.

## पद.

बंदे! हुषार रहना, बे! साहेब राजी रखना, बे! ॥ ध्रु० ॥
गांजा, दारू, मतपीयो, यारे! अक्कल गुंग होती, ।
आपने पलवका दाम खरच कर, मुखमें मटिया जाती. ॥ १ ॥

जुवेबाजी मत करो, यारे! अक्कल गुंग होती, ।
आपने पलवका दाम खरच कर, शिरपर जुतिया पडती. ॥ २ ॥
**एका जनार्दनका** बंदा अक्कल तुजकूं देता, ।
दिल चाहे तों शिकले, प्यारे! नाहितों [ मल ] खाता. ॥ ३ ॥

**अभंग.**

इंद्रियें जिंकल्याविना केलें कर्म, । त्यासी संत 'धर्म' न म्हणती.॥१॥
गृहस्थाश्रमांत सर्व धर्म घडे, । तेणें मळ झडे अंतरींचा. ॥ २ ॥
विषयवासना मळ जातां, ज्ञान । होय सावधान आत्मलाभें. ॥ ३ ॥
गृहस्थाला सोपें, न तसें अन्यास; । न लागे संन्यास ज्ञानासाठीं. ॥४॥

—मोरोपंत.

**ओंव्या.**

संसारत्याग न करितां, । प्रपंचउपाधि न सांडितां, ।
जनांमध्यें सार्थकता । विचारेंची होय. ॥ १ ॥
हें प्रचीतीचें बोलणें, । विवेकें प्रचीत बाणे, ।
प्रचीत पाहतील ते शाहणे, । अन्यथा नव्हे. ॥ २ ॥
प्रचीत आणि अनुमान, । उधार आणि रोकडें धन, ।
मानसपूजा, प्रत्यक्ष दर्शन, । यांस महदंतर. ॥ ३ ॥

—रामदास.

---

# ४. चिंता.

**ओंव्या.**

जेवीं कांजी पडतां बिंदुमात्र । घट भरोनी नासे क्षीर, ।
तेवीं सर्व सुखाचा संहार । चिंता करीत क्षणमात्रें. ॥ १ ॥

जो चिंतार्णवामाजीं पडला, तो परपारासी नसेची गेला, ।
माजीं विश्रांति घ्यावया तयाला । मध्य बेट तें असेना. ॥ २ ॥
जो चिंतावनामाजीं मरला, । तो भ्रांतिलासीनें ग्रासला, ।
तो दुर्गतीतें सहज पावला, । नाहीं आला निजधामा. ॥ ३ ॥

—श्रीधर.

## अभंग.

चित्त समाधानें, । तरी विष वाटे सोनें. ॥ १ ॥
बहु खोटा अतिशय, । जाणा भले, सांगों काय? ॥ २ ॥
मनाच्या तळमळें । चंदनेंही अंग पोळे. ॥ ३ ॥
तुका म्हणे, दुजा । उपचार पीडी पूजा. ॥ ४ ॥

## ओंव्या.

चिंता पुरुषाचें बंधन । चिंताजातीच मरण, ।
चिंता सुखाचें छेदन, । दुःखदाती. ॥ १ ॥
चिंता हृदयींचा रोगू, । चिंता नाशी परम योगू, ।
अंगीं लागला सुखभोगू । भोगूं नेदी. ॥ २ ॥
इंद्रियांतें करी शोषण, देहावरी नये मन, ।
चिंता भ्रमवी वन, । नेदी विश्रांती. ॥ ३ ॥
चिंता हृदयींचा आंधारू । चिंता हा कृष्ण विखारू; ।
चिंता नाशी तोची गुरू । संसारत्राता. ॥ ४ ॥
बाह्यांतरीं व्याकुळता । पुरुषा आणि चिंता; ।
चिंतासागरीं पडतां, । दुजें न पवे. ॥ ५ ॥

दैन्य घडवी वदन, । तटस्थ राहती करचरण, ।
निमिषोन्मेषही नयन । विसरोनी जाती. ॥ ६ ॥
कार्यातें सांडूनी करणें, । उगीची राहतो जडपणें, ।
न स्फुरती विषयज्ञानें । चिंतेमुळें. ॥ ७ ॥
भक्षितां न कळे अन्न, । न कळे बोलतां वचन, ।
आइकतांची दोन्ही श्रवण । बधिर होती. ॥ ८ ॥
अंगीं आदळलेंही न कळे । सुख दुःख-चिंताकाळें; ।
मन इंद्रियां न मिळे, । इंद्रियें अर्थी. ॥ ९ ॥
अंग खुपे शेज, । गंधू न कळे जाणिज, ।
डोळां देखिलें मनुज । वोळखेना. ॥ १० ॥
आगीवीण चिंता जाळी, । सुधांशु अवघा गिळी, ।
चिंतेऐसें भूतळीं । दुष्ट नाहीं. ॥ ११ ॥

—दासोपंत.

## पद.

तोंवरि हळहळ, रे ! हळहळ, रे ! । नाहीं भक्तीबळ रे ! ॥ ध्रु० ॥
उदंड करितो कर्में, । चुकला ब्रह्मार्पण निजवर्मे. ॥ तोंवरि० ॥ १ ॥
विवेक जागा करिना, । जोंवरि शांती दृढ जीवीं धरिना. ॥ तोंवरि० ॥ २
सकळहि विद्या जाणे, । आत्माव्यापक जोंवरि नेणे. ॥ तोंवरि० ॥ ३ ॥
**शिवदिन केसरिपायीं** । जोंवरि शरण रिघाला नाहीं. ॥ तोंवरि० ॥ ४ ॥

# ५. आई.

### अभंग.

नलगे मायेसी बाळ निरवावें, । आपुल्या स्वभावें ओढे त्यासी. ॥ १ ॥
मज कां लागला करणें विचार? । ज्याचा जार भार त्याचे माथां. ॥ २ ॥
गोडधड त्यासी ठेवीन न मागतां, । समाधान खांतां नेदी मना. ॥ ३ ॥
खेळतां गुंतलें उमगोनि आणी, । वैसोनियां स्तनीं लावी बळें. ॥ ४ ॥
त्याच्या दुःखपणें आपण खापरी । लाही तळीं वरी होय जैसी. ॥ ५ ॥
तुका म्हणे, देह विसरे आपुला, । आघात तो त्याला लागों नेदी. ॥ ६ ॥

### ओंव्या.

कुरूप बाळ देखोनी, । प्रीति व पाविजे जननी, ।
जरी माता त्याचे अवगुण आठवील मनीं, । तरी तें कैसें वांचेल? ॥ १ ॥
अति उदार असे बलाहक, । ज्यातें इच्छिती सकळ लोक, ।
तो तुच्छ मानील जरी चातक, । वांचणें केवीं घडे? ॥ २ ॥
पाहतां तो अमृत कर, । जो क्षीराब्धीचा पुत्र, ।
तो जरी तृप्त न करी चकोर, । तरी तेणें कैसें वांचावें? ॥ ३ ॥

—श्रीधर.

धरणी उबगली वृक्षासी, । तरी ठाव नाहीं जावयासी, ।
कीं मायेनें टाकितां बाळकासी, । तरी कोण तयासी सांभाळी? ॥ १ ॥
कासवी न पाहे कृपादृष्टीं । तरी पिलीं कैसेनी वांचती? ।
राजा न करी न्यायनीती, । तरी पावती प्रजा केंवीं सुख? ॥ २ ॥
मातेपुढें नेणतें बाळ । अवाच्यवाणी भलतेंची बरळ, ।
परी जननी कौतुका मानुनी केवळ । पुरवी लळे तयाचे. ॥ ३ ॥

आपुली माया दुर्बळ आहे । तरी ते बाळकें त्यागूं नये, ।
दुसरी सुंदर वनिता पाहे, । तरी पान्हा नये तिजलागीं. ॥ ४ ॥

—महीपति.

## गीति.

मातृस्तन्यावांचुनि शिशुचा कृश होय वरदुधें काय; ।
बालकपालक जननिस्नेहचि, बालोनि बहु बुधें काय ? ॥ १ ॥
स्नेहें शिशुला देइल मातेहुनि अधिक काय सुख दाई ? ।
चंद्रापुढें चकोर ग्रह होइल कोण अन्य सुखदाई ! ॥ २ ॥

## श्लोक.

पिता जरि विटे, विटो; न जननी कुपुत्रीं विटे;
दयामृतरसार्द्रधी न कुलकज्जलें त्या किटे; ।
प्रसादपट झांकिती परि परां गुरूंचे थिटे;
म्हणून म्हणती भले, 'न ऋण जन्मदेचें फिटे!' ॥ १ ॥

—मोरोपंत.

## ओंव्या.

क्षणभरी [ बाळ ] मातेशी न देखे, । तरी आक्रंदोनी रुदन करी दुःखें ।
ते समयीं मातेसारिखें । आणीक कांहींच नाहीं. ॥ १ ॥
आस करोनी, वास पाहे; । मातेवीण कदा न राहे; ।
वियोग पळमात्र न साहे, । स्मरण झालियानंतर. ॥ २ ॥
जरी ब्रह्मादिक देव आले, । अथवा लक्ष्मीनें अवलोकिलें, ।
तरी नवचे बुझाविलें । आपुले मातेवांचोनी. ॥ ३ ॥

कुरुप, अथवा कुलक्षण, । सकळांहून करंटेपण, ।
तरी नाहीं तीसमान । भूमंडळीं कोणीही. ॥ ४ ॥
ऐसें तें केंविलवाणें । मातेवीण दिसे उणें, ।
मागें परतें केलें तिणें, । तरी आक्रंदोनी मिठी घाली. ॥ ५ ॥
दुःख पावे मातेजवळी, । दुरी करितांची तळमळी, ।
अतिप्रीति तये काळीं । मातेवरी लागली. ॥ ६ ॥

—रामदास.

## अभंग.

क्षोभ आणि कृपा मातेची समान, । विभाग जतन करुनी ठेवी. ॥ १ ॥
क्षणभंगुर ते उपजली चिंता, । खरी अखंडता आवडीची. ॥ २ ॥
शिकवूं जाणे ते गोमटियासाटीं, । लोभें नाहीं तुटी निश्चयेंसीं. ॥ ३ ॥
अवघेंची मिथ्या समया आरतें, । देतां तों उचितें काळ जाणे. ॥ ४ ॥
न करी वेव्हार, नेदे गांजूं कोणा, । भेडसावी तान्हा 'हाऊ आला.' ॥ ५ ॥
तुका म्हणे, करी जीवाची जतन, । दचकूनी मन जवळी आणी. ॥ ६ ॥

आळवितां बाळें, । मातेतें सुख आगळें. ॥ १ ॥
द्यावें आवडे भातुकें, । पाहे, निवे कवतुकें. ॥ २ ॥
लेववुनी अळंकार, । दृष्टि करावी सादर. ॥ ३ ॥
आपुलिये पदीं । बैसवूनी, कोडें वंदी. ॥ ४ ॥
नेदे लागों दिठी, उचलोनी लावी कंठीं. ॥ ५ ॥
तुका म्हणे, लाभा । वारी घ्यावो पद्मनाभा. ॥ ६ ॥
मातेचिये चित्तीं । अवघी बाळकाची व्याप्ती. ॥ १ ॥
देह विसरे आपुला । जवळी घेतां, सीण गेला. ॥ २ ॥

दावी प्रेमभातें, । आणि अंगावरी चढतें. ॥ ३ ॥
तुका संतांपुढें । पायीं झोंबे लाडेंकोडें. ॥ ४ ॥
धांवे माते सोई । बाळ, न विचारितां कांहीं. ॥ १ ॥
मग त्याचें जाणें निकें । अंग वोडवी कौतुकें. ॥ २ ॥
नेणे सर्प दोरी, । अंगीं भलतें हातें धरी. ॥ ३ ॥
तीविणें तें नेणे । आणिक कांहीं, तुका म्हणे. ॥ ४ ॥
मायबापें केवळ काशी, । तेणें नच जावें तीर्थासी. ॥ १ ॥
पुंडलीकें काय केलें? । परब्रह्म उभें ठेलें. ॥ २ ॥
तैसा होईं सावधान, । हृदयीं धरीं नारायण. ॥ ३ ॥
तुका म्हणे, मायबापें, । अवघीं देवाचीं स्वरूपें. ॥ ४ ॥
करावें गोमटें । बाळा, माते तें उमटे. ॥ १ ॥
आपुलिया जीवाहुनी । असे वाल्हें तें जननी. ॥ २ ॥
वियोग तों तीस । त्याचा उपचारें तें विष. ॥ ३ ॥
हरणी चुकली पाडसा । धुंडाळिती दाही दिशा. ॥ ४ ॥
रानीं हिंडों गेली गाय, । घरीं वत्स वाट पाहे. ॥ ५ ॥
तुका म्हणे, पायें । डोळा सुखावे ज्या न्यायें. ॥ ६ ॥
जैसें तैसें बाळ मातेसी आवडे, । बोलतां बोबडे शब्द गोड. ॥ १ ॥
आपुले आवडी लेववी, खाववी, । पाहोनियां जिवीं सुख वाटे. ॥ २ ॥
तुका म्हणे, काय देऊं परिहारी? । काय तें साचार जाणतसें? ॥ ३ ॥

**श्लोक.**

बाळकें रुसतसे जननीसीं, । काय माय रुसते परि त्यासी? ॥
वासरां त्यजुन, गाय खडाणी । काय जाय पशुजाति अडाणी? ॥ १ ॥

श्वापदांत भयभीत वराकी । कांय हे हरिणि पाडस टाकी ? ॥
चारया जरि विहंगिणि जाते, । ते फिरोन पिलयांप्रति येते. ॥ २ ॥

—सामराज.

---

## ६. नरदेह.

### पद.

दवें नरतनु सांपडली, । मूढा ! तुज कां भुल पडली ? ॥ ध्रु० ॥
अमोल्य आयुष्य जातें, रे ! कां करितोसी मातेरें ? ॥ दैवें० ॥ १ ॥
मोहमदें तुम्हि कां भुललां ? । काळव्याळ गिळी तुजला. ॥ दैवें० ॥२॥
**शिवदिन** सांगे मृदुवचनें, । सावध होईं श्रुतिवचनें. ॥ दैवें० ॥ ३ ॥

### अभंग.

बहुतां जन्मां अंतीं । जोडी लागलीसे हातीं. ॥ १ ॥
मनुष्यदेहा ऐसा ठाव । धरीं पांडुरंगीं भाव. ॥ २ ॥
बहु केला फेरा, । येथें सांपडला थारा. ॥ ३ ॥
**तुका** म्हणे, जाणें । ऐसे भले ते शाहाणे. ॥ ४ ॥

### लावणी.

नरदेहामधिं येउन, नरहो ! साधन ऐसें करा, ।
जेणें, भवसागर तरुनि, सुखें व्हावें पैलतिरा. ॥ ध्रु० ॥
संसारार्णविं भिजा, गड्यांनो ! संसारार्णविं भिजा ।
परंतु परमार्थसाधनातें साधा यांतचि मजा. ॥ १ ॥

भाव न ठेवुनि दुजा, गड्यांनो! भाव न ठेवुनि दुजा ।
अकपट होउनि थोरलहानां समदृष्टीनें पुजा. ॥ २ ॥
अन्यायपथें न जा, गड्यांनो। अन्यायपथें न जा; ।
सदसद्विचार करुनी लोकीं सत्कीर्तीनें सजा. ॥ ३ ॥
कोणा नच द्या इजा, गड्यांनों! कोणा, नच द्या इजा; ।
परि आश्रय दुःखितास द्यावा, तनमनधनें झिजा. ॥ ४ ॥
संकटसमयीं धजा, गड्यांनो! संकटसमयीं धजा; ।
सत्यवचन राखण्यास न ढळा, कथितों या हितगुजा. ॥ ५ ॥
व्हा सावध, नच निजा, गड्यांनो! व्हा सावध, नच निजा; ।
पळ, घटिका, प्रहर, दिवस, यांहीं आयुष्य होय वजा. ॥ ६ ॥
जगदीशाला भजा, गड्यांनो! जगदीशाला भजा; ।
अनंतफंदी म्हणे, तोचि मग तारिल देउनि करा. ॥ ७ ॥

## ओंव्या.

धन्य, धन्य, हा नरदेहो, । याची अपूर्वता पहा हो! ।
जो जो किजे परमार्थलाहो, । तो तो पावे सिद्धीतें. ॥ १ ॥
या नरदेहाचेनी आधारें, । नाना साधनांचेनी द्वारें, ।
मुख्य सारासारविचारें, । बहुत सुटले. ॥ २ ॥
या नरदेहाचेनी संबंधें । बहुत पावले उत्तम पदें, ।
अहंता सोडोनी स्वानंदें । सुखी झाले. ॥ ३ ॥
'पशुदेहीं नाहीं गती,' । ऐसें सर्वत्र बोलती; ।
म्हणोनी नरदेहींच प्राप्ती । परलोकाची. ॥ ४ ॥

नरदेह हा स्वाधीन, । सहसा नव्हे पराधीन; ।
परंतु परोपकारीं झिजवून, । कीर्तिरूपें उरवावा. ॥ ५ ॥
देह परमार्थीं लाविलें, । तरीच याचें सार्थक झालें; ।
नाहींतरी, व्यर्थंची गेलें, । नाना आघातें मृत्युपंथें. ॥ ६ ॥

—रामदास.

द्विपदत्वें मनुष्य होय, । तरी पक्षियासही दोनची पाय. ।
दाढीनें मनुष्य होय, तरी काय । दाढी नसे बोकडासी? ॥ १ ॥
आहेत हात, यावरूनी । म्हणावें 'मनुष्य' म्हणोनी, ।
तरी मर्कटासही दोनी दोनी । असती हस्त. ॥ २ ॥
[ शरीर ] सुखें म्हणावें 'नर' । तरी तें सुख पावती वानर, खर. ।
मनुष्य निर्मिती म्हणावें घर, । तरी पक्षीही गृह निर्मिती. ॥ ३ ॥
पुढील चिंता कोणासी । नसे, ती एक मनुष्यासी; ।
या गुणें म्हणावें मनुष्यत्व यासी । तरी पक्षियांसही तें असे. ॥ ४ ॥
प्रसूत नाहीं, तोंची चिमणी । आंडियांकारणें गर्भिणी ।
कापूस आणि मृदु तृणीं । सेज करी. ॥ ५ ॥
चारा सांडूनी, वेंची । कापूस, धरधरोनी चोचीं ।
ने; ऐसी चिंता संतानांची । करी, जों उपजलीं तीं नसती. ॥ ६ ॥
ऐसा पाहतां विचार, । पशुपक्षियांसमान विहार; ।
निद्रा, [ सुख ], आहार, । पशूंस तैसे मनुष्यांसही. ॥ ७ ॥
एवं भजन सर्वेश्वराचें । करिती; त्यांचें मनुष्यत्व साचें, ।
म्हणूनी वाक्य भगवंताचें, । कीं 'माझ्या मार्गीं वर्तती मनुष्य सर्व.' ॥ ८

—वामनपंडित.

### गीति.

वा! सर्व सिद्धिकर, परि नश्वर हें नरशरीर जाणोनी, ।
मोक्षार्थ मृत्युपूर्वीं यत्न करावा मनांत आणोनी. ॥ १ ॥
नरदेहीं यम, नियम, व्रत, दान, तप स्वधर्म जे कांहीं, ।
त्यांचें मुख्य फळ मनोनिग्रहचि, ज्ञान वेगळें नाहीं. ॥ २ ॥
वपु कल्पिलें मनें, 'हें मी, माझें हें,' असें म्हणति अंध; ।
भ्रमति भ्रमें अपारीं संसारीं, दृढ गळां करिति बंध. ॥ ३ ॥

—मोरोपंत.

---

## ७. दारिद्र्य व याचना.

### ओंव्या.

दोषी दरिद्री अधम, । दरिद्री तो प्रेतासमान, ।
दरिद्रदोषीं पातक परम, । अधर्म, असत्य, आढळे. ॥ १ ॥
दरिद्रियास नाहीं हर्ष, । सुहृद असल्या ठेविती दोष, ।
जैसा अपुष्पफळ वृक्ष । त्यागी पक्षी सर्वदा. ॥ २ ॥
जैसे शुष्क तडाग थोर । उपेक्षोनी जाती समग्र, ।
तैसा तो पैं दरिद्री नर । परम अपवित्र तिहीं लोकीं. ॥ ३ ॥
वर्तत असतां तो शरीरीं, । तरी प्रेताऐसा तो लोकाचारीं, ।
समयीं भोजना निराहारी, कां । परद्वारीं याचक. ॥ ४ ॥

—शुभानंद.

पद.

अजि तुम्ही ऐका, । सखिसोदर म्हणती पैका. ॥ ध्रु० ॥
पैक्यापासुन काम काज, । पैका मिळवी बहुत व्याज, ।
पैका मायेचें निजबीज, । पैका बहुरक्त महाराज ।
कागद रोखा । सखिसोदर म्हणती पैका. ॥ १ ॥
पैक्यापासुन कारभार, । पैका हिंडवि दारोदार, ।
पैका दुःखाचा डोंगर, । पैका गर्वाचा सागर, ।
बुडवी कटका, । सखिसोदर म्हणती पैका. ॥ २ ॥
पैक्यापासुन पुराणश्रवण, । पैका करी वेदपठण, ।
पैका करी नृत्यगायन, । ज्याला पैका कधीं मिळे न ।
तो नित्य फिका, । सखिसोदर म्हणती पैका. ॥ ३ ॥

—अमृतराय.

आर्या.

कर्मरहित मुख जैसें लोकीं श्रीहीन जीवन स्पष्ट, ।
नष्ट स्वकीर्ति, सत्कृति, जन पावे तो न नारकीं कष्ट. ॥ १ ॥

—मोरोपंत.

श्लोक.

असे जयाला धन तोचि पंडित,
कुलीन तो, तोचि गुणी, बहुश्रुत; ।
तो मान्य, तो सुंदर, तो विचक्षण;
धनाश्रयें राहति सर्वही गुण. ॥ १ ॥

—भर्तृहरि.

## अभंग.

धनवंतालागीं । सर्वमान्यता आहे जगीं. ॥ १ ॥
मातापिता, बंधुजन, । सर्व मानिती वचन. ॥ २ ॥
जंव मोठा चाले धंदा, । तंव बहिण म्हणे 'दादा.' ॥ ३ ॥
सदा शृंगारभूषणें । कांता लवे बहुमानें. ॥ ४ ॥
**तुका** म्हणे, धन । भाग्य अशाश्वत जाण. ॥ ५ ॥

धनवंताघरीं । करी धनची चाकरी. ॥ १ ॥
होय बैसल्या व्यापार । नलगे सांडावेंची घर. ॥ २ ॥
रानीं, वनीं, द्वीपीं, । असतीं, तीं तीं होतीं सोपीं. ॥ ३ ॥
**तुका** म्हणे, मोल । देतां, कांहीं नव्हे खोल. ॥ ४ ॥

## ओंव्या.

जीवंत म्हणावा धनाढ्य नर, । उभय लोकीं तो पवित्र, ।
तिहीं लोकीं अपवित्र । विज्ञानहीन निर्धन. ॥ १ ॥
जो कां सभाग्य धनाढ्य नर, । तोची सबळ बलाढ्य थोर, ।
धर्म, अर्थ, काम, स्वर्गपर, । धनाढ्य नर भोगिती. ॥ २ ॥

—शुभानंद.

द्रव्य नसतां आपुले पदरीं, । बंधु म्हणती, 'आमुचा वैरी' ॥
पिशुन हांसती दुराचारी; । ऐसी परी मायेची. ॥ १ ॥
देखोनी निज पुत्र नयनीं । पिता कंटाळे तये क्षणीं, ।
म्हणे, 'आमुचे पोटीं येउनी, । अपकीर्ति तुवां केली.' ॥ २ ॥
शेजारी लोक होती कष्टी, । म्हणती, 'उगाच पडतो आमुचे दृष्टीं ।
कन्याभगिनींच्या जातां भेटी, । लज्जित पोटीं त्या होती. ॥ ३ ॥

पुरुष झालिया द्रव्यहीन, । त्यासी न पुसती सोयरे पिशुन ।
जेवीं वृक्षाचीं पत्रें गेलिया झडोन, । तेथें विलासी जन न रमती. ॥४॥
कीं, रणें पडतांची नृपती, । देहलोभी रण टाकोनी पळती, ।
तेवीं दरिद्र येतां पुरुषाप्रती, । पिशुन करिती अपमान. ॥ ५ ॥

—महिपति.

## आर्या.

पसरुनि आनन, मानन धरुनि, वरुनि दासता दरिद्र वदे; ।
अकरुण धनिक जनमनीं लेशहि न प्रार्थना परि द्रव दे. ॥ १ ॥

—मोरोपंत.

## श्लोक.

जावो जाति रसातळीं, सुगुण हे राहोत कीं खालते,
शैलाग्राहुनि शील सत्वर पडो, सौजन्य अग्नींत तें, ।
शूरत्वावरि आदळो अशनि का; हें सर्वही नावडे;
अर्थप्राप्ति असो निरंतर मला, त्यावीण हें बापुडें. ॥ १ ॥

पोरें सदैव रडती क्षुधितें कृशांगें; ।
स्त्री, वस्त्र जर्जित नेसुन, दीन वागे; ।
पाहोनि दुःख घरिंचें जठरार्थ कैसें
'देहीति' गद्गदरवें वदिजे प्रयासें ? ॥ २ ॥

—भर्तृहरी.

दातव्यही, स्ववश आपण, जाणताही,
पर्याय उत्तर वदे, न वदेच कांहीं. ।

दाता असा शठ कसा टकसा कदापी ?
जो याचकावर दया न करीच पापी. ॥ १ ॥
गहिंवरत गळाही, चावळे जीभ, वाळे,
विकळपण शरीरीं, कंपही या निराळे, ।
धनिक विमुख होतां, अंतरीं शोक होहे,
हर हर! मज भासे यातना याचना हे. ॥ २ ॥
भ्रांवावला धनमदें भलतेंचि बोले,
तो बोलही सरस मानुनि लोक डोले. ।
मांसेंकरून फुगला गळसाच भावे,
ज्या दीन मीन धरितां वळसाच पावे. ॥ ३ ॥

—रघुनाथपंडित.

ऐश्वर्यें भ्रमले, जगीं मिरवले; थोडे भले देखिले,
नाहीं पारखिले तुवां, वळखिले, गर्वेंचि जे आंखिले; ।
तारुण्यें, पहिले भरें, दडपिले; सौख्यें सदा मातले;
दुष्पंकीं रुतले; बळेंचि उतले; कामी सदा रातले. ॥ १ ॥
देखतां ऋषि तयास न पूजी, वाटतो द्विज तयास रिपू, जी! ।
भौंवया करुनि वक्र पहातो, मित्र भिक्षुक अमान्य अहा! तो. ॥ २ ॥
न तो हालवी मस्तकातें कदापी, दुरूनीच तो शुष्क शब्देंचि दापी; ।
तयीं बोबडी ती वळे भिक्षुकाची; न ते गोष्टिही गोड बोले फुकाची. ॥ ३ ॥
अलक्ष्मीस लक्ष्मीस तो वैरभाव; स्त्रियांचाच नैसर्गिकी तो स्वभाव; ।
म्हणूनीच शत्रुत्व या संततीतें, विचारूनि पाहें सती! तूं मतीतें. ॥ ४ ॥

—साम्राजवामन.

## अभंग.

भिक्षापात्र अवलंबणें, । जळो जिणें लाजिरवाणें ! ।
ऐसियासी नारायणें । उपेक्षिजे सर्वथा. ॥ १ ॥
देवापायीं नाहीं भाव, । भक्ति वरी वरी वाव, ।
समर्पिला जीव । नाहीं, तों व्यभिचार. ॥ २ ॥
जगा घालावें सांकडें, । दीन होऊनी बापुडें, ।
हेंची अभाग्य रोकडें, । मूळ आणीं विश्वास. ॥ ३ ॥
काय न करी विश्वंभर, । सत्य करितां निर्धार, ।
तुका म्हणे, सार । दृढ पाय धरावे. ॥ ४ ॥

## ओंव्या.

अयोग्य व्युत्पन्नासी तंडे, । निशस्त्री शस्त्रधरासी भिडे, ।
दातयासी मागते तोंडें । थरींव बोले आपुली. ॥ १ ॥
अवलोकितां लोकीं तिहीं । मागण्यापरतें हीनत्व नाहीं; ।
तोची जीवनोपाय, पाहीं, । रौरवतुल्य याचका. ॥ २ ॥
चौदा विद्या, चौसष्ट कळा, । चातुर्यज्ञानें गुणागळा, ।
मागों जातां, गोळांगुळा- । प्राय भासे परगृहीं. ॥ ३ ॥
जैशीं आदित्याचीं झाडें । संमुख डोलती सूर्याकडे; ।
कीं पत्रें पसरलीं एरंडें, । आवरूं नेणे सर्वथा; ॥ ४ ॥
तैसा दातयासंमुख । सदा पसरिला हस्तक, ।
नाना अवज्ञेचें दुःख । तो विभाग तयाचा. ॥ ५ ॥

—मुक्तेश्वर.

**अभंग.**

नसावें ओशाळ, । मग मानिती सकळ. ॥ १ ॥
जाय तेथें पावे मान, । चाले बोलिलें वचन. ॥ २ ॥
राहों नेदी बाकी, । दान ज्याचें त्यासी टाकी. ॥ ३ ॥
होवा वाटे जनां, । **तुका** म्हणे, साटीं गुणां. ॥ ४ ॥

कांहीं न मागे कोणासी, । तोची आवडे देवासी. ॥ १ ॥
'देव' तयासी म्हणावें, । त्याचे चरणीं लीन व्हावें. ॥ २ ॥
भूतदया ज्याचे मनीं; । त्याचे घरीं चक्रपाणी. ॥ ३ ॥
नाहीं नाहीं त्यासमान, । **तुका** म्हणे, मी जमान. ॥ ४ ॥

---

## ८. श्रोतावक्ता.

**ओंव्या.**

स्थिरासनी, चिंतारहित, । सात्विक, अर्थज्ञ, प्रेमभरित, ।
कथाश्रवणीं नित्य व्रतस्थ, । वरी उदार सर्वस्वें; ॥ १ ॥

जितेंद्रिय, सदाचारी, । क्षमाशील, परोपकारी, ।
परगुणपरीक्षा व सुविचारी, । दयावंत सर्वदा. ॥ २ ॥

इहीं लक्षणीं जे पुरते, । 'श्रोते' ऐसें वदती त्यांतें, ।
ग्रंथींचा अर्थ काढुनी हातें । हृदयीं लेवूं जाणती. ॥ ३ ॥

त्यांहीं लिहिलें शासनपत्र । जेवीं पाषाणीं कोरिलें चित्र, ।
कीं विंधिलें घटिकायंत्र । मिळे नेणे कल्पान्तीं. ॥ ४ ॥

वांचोनी अभिषेकपात्रापाडें । गळोनी होय कोरडें; ।
पद्मपत्रीं पडे । तैसा ढळे घनबिंदू ; ॥ ५ ॥
रोंवोनी उपडितां दाभणा, । छिद्र शोधितां न दिसे कोणा; ।
हृदयशून्य तैसे जाणा । अनधिकारी श्रोते. ॥ ६ ॥
तुंबीफळ बुडविलें जळीं । राहे जंव धरिलें करतळीं, ।
रोधिलें चित्त घे उसळी । कथा संपतां, अवलोकीं. ॥ ७ ॥
स्वातीतोयबिंदुकणिके । शुक्तीं मुक्ताफळची पिके; ।
कीं उदकीं सिंतोडोन, देखें, । तैल जैसें विस्तारे; ॥ ८ ॥
तैसा श्रवणीं पडतां शब्द, । अर्थगर्भ वाढे विशद, ।
प्रतिपळीं प्रसवे बोध, । सिंधु जैसा लक्ष्मीतें. ॥ ९ ॥
ऐसियां समर्थ श्रोतियां । मान केला बैसावया, ।
अश्रोते अनधिकारियां । ठाय तेथें न मिळेची. ॥ १० ॥

—मुक्तेश्वर.

रोहिणीरमणाचे किरण । लागतां चंद्रकांत द्रवे जाण, ।
नातरी परभृतांचें मौन । वसंतागमनीं फिटतसे. ॥ १ ॥
नातरी दिनमणि देखोन, । सूर्यकांतांतून पडे हुताशन, ।
तेवीं श्रोता झालिया सावधान, । निरसे जडत्व वक्त्याचें. ॥ २ ॥
श्रोता झालिया दुश्चित्त, । व्यग्र होय वक्त्याचें चित्त, ।
निघत असतां कथामृत । कुंठित होतें अवधारा. ॥ ३ ॥
ग्रहा पातलिया ग्राहक, । तयाची पाहोनियां भूक, ।
तैसेंची तया अंशुक । काढोनी दावी व्यवहारी. ॥ ४ ॥

जरी स्नेहदीप पूर्ण असे । तरी दुरील पदार्थ दिसे; ।
निःस्नेहत्वें मंदत्व दिसे; । ही तों प्रचिती सर्वांसी. ॥ ५ ॥
नातरी कंठामाजी निघे उत्थापिनी, । जितका वायु, तितकाच ध्वनी, ।
मंद वायु होतां, त्यालागुनी । शब्द सहजची मंदावला. ॥ ६ ॥
मुरली वाजती गोड, । परी वाजवितांची पुरवी कोड; ।
न वाजवितां, निश्चल जड । अचेतन काष्ठ तें. ॥ ७ ॥
श्रोतयाचें मन दुश्चित्त, । गोड न लागेची कथामृत; ।
रोगें व्यापिल्या जो निश्चित, । मिष्टान्न तया नावडे. ॥ ८ ॥
चिंतोर्मिरहित जरी श्रोता । आशाराक्षसीवियुक्त वक्ता, ।
तेथींची जी भगवत्कथा, । तिचें सुख काय सांगू ? ॥ ९ ॥
जरी पुण्य असेल गांठीं, । तरी उत्तम श्रोत्याची पडेल गांठी, ।
मग वक्त्याचे ओष्ठपुटीं । शब्दरत्नें विकासती. ॥ १० ॥
श्रोता जोडलिया प्रवीण, । वाग्देवी उल्हासे पूर्ण, ।
पदोपदीं प्रेमार्थ गहन । प्रसवे, जाण, अवधाना. ॥ ११ ॥
श्रोता मिळतां अधम, । वाग्देवी संतापे परम, ।
होय अर्थाचें पतन, । श्रवणरस सर्व आटे; ॥ १२ ॥
तान्हयाचें स्तना मुख झगटे, । तेणें तत्काळ पान्हा फुटे; ।
तें निमालिया, तेथेंची आटे । दुग्ध सर्व ज्यापरी. ॥ १३ ॥
त्यापुढें करावें व्याख्यान, । तें वक्त्याचें मूढपण; ।
जेवीं माळभूमीसी कूपखनन, । दरिद्रसेवन काय व्यर्थ ? ॥ १४ ॥
कीं अंधासी दिधलें दर्पण, । कीं बधिरापुढें केलें गायन, ।
कीं रोगियासी मिष्टान्न । देवोनी काय साफल्य ! ॥ १५ ॥

कीं सुगंध तैल कुंजरा । अभ्यंग केलें, अवधारा; ।
कीं महाफळ समर्पितां वानरा, । कीं चंपकमाळा खरासी. ॥१६॥
श्रोता मिळतां मतिमंद, । वाग्वल्लीचा उपडे कंद, ।
कैंचा तयासी श्रवणनाद, । जरी वक्ता व्यासदेव ? ॥ १७ ॥
प्रलयकाळीं जळधर । बळें वर्षतसे अपार, ।
परी पालथे घटामाजीं नीर । बिंदुमात्र नसेची. ॥ १८ ॥
कोकिळेहूनी मधुर स्वर । ऐसे गाती किन्नर, ।
त्यांसी ऐकणार बधिर, । तरी काय सार्थक तयाचें ? ॥ १९ ॥

—श्रीधर.

---

## ९. संतांचा उपदेश व पुण्यकथा.

### अभंग.

राहोनिया संतापासीं, । संतापासीं भांडती. ॥ १ ॥
पावे तोष तोक थानीं, । तो कथांनीं पावनी. ॥ २ ॥
रामतोयदासमोर । दास मोर नाचती. ॥ ३ ॥

### पद.

रसने ! न राघवाच्या थोडी, यशांत गोडी. ॥ ध्रु० ॥
निंदास्तुती जनाच्या, । वार्ता वधूधनाच्या, ।
खोट्या व्यथा मनाच्या, । कांहीं न यांत जोडी. ॥ १
साधूंचिया सदातें, । सुख देतसे सदा तें, ।
श्रवणीं सुधा, मदातें । सोडूनि, हात जोडी. ॥ २ ॥
विनवी मयूर भावें, । सखि ! हेंचि नित्य गावें; ।
मजला, द्रवोनि, पावें; । दुसरें न बंध तोडी. ॥ ३ ॥

## अभंग.

पंडित वाचक जरी झाला पुरता, । तरी कृष्णकथा ऐके भावें. ॥१॥
क्षीरा, तुपा, साकरे, जालिया भेटी, । तैसी पडे मिठी गोडपणें. ॥२॥
जाणोनिया लाभ घेईं हा पदरीं, । गोड गोडावरी सेवीं बापा! ॥३॥
जाणिवेचें मूळ उपडोनी खोड, । जरी तुज चाड आहे तुझी. ॥ ४ ॥
नाना परिमळ द्रव्य उपचार, । अंगीं उटी सार चंदनाची, ॥ ५ ॥
जेवलियावीण शीण ते शृंगारीं, । तैसी गोडी हरिकथेवीण. ॥ ६ ॥
तुका म्हणे, येर दगडांचीं पेवें, । खळखळ अवघें मूळ तेथें. ॥७॥

## पद.

इतुकें दे मजला, दे मजला, । मागतसें, हरि तुजला, ॥ ध्रु० ॥
संतसमागम, अर्चा, । सारासारज्ञानचर्चा, ॥ इतुकें० ॥१॥
भगवद्भजनीं जागो, । मन हें तुझ्या स्वरूपीं लागो, ॥इतुकें०॥२॥
असेंचि वैभव देईं । **शिवदिन केसरि**गुरुचे पायीं. ॥इतुकें०॥३॥

## आर्या.

संतांचे अति हितकर उपदेश, तशाचि पुण्यधर्मकथा, ।
यांतें विमुख न हो तूं, वत्सा! सोडूं नकोचि भव्यपथा. ॥ १ ॥
सुखदुःखस्पर्शपरा होय अहंकार एक ह्या हेतू. ।
सद्बोध हा चतुर्विधभूतभयक्षुब्ध सागरीं सेतू. ॥ २ ॥
श्रमवी, भ्रमवी, मळवी, पळवी सत्कीर्तिला दुराग्रह, रे! ।
सेव्य सदुपदेश सुधाग्रह, असदुपदेश हा सुराग्रह, रे! ॥ ३ ॥
आवड असो कथेची, जसि बाळा फाल्गुनांत पुनवेची; ।
संतीं वेचावें धन, तापसजन तप जसें तपुन वेची. ॥ ४ ॥

मणिकनकभूषणाहुनि सुबहुमता स्त्रीजना गळसरी ती, ।
हो तसि सदुक्ति या, हा दावू एकचि, जसा पळस, रीती. ॥ ५ ॥
रंगावें सद्वचनें मतिनें, चूर्णें जसेंच हळदीनें; ।
भजन न सोडावें म्यां, जेविं कधीं कर्षकें न हळ दीनें. ॥ ६ ॥
चंद्रींच्या अमृतातें सेवायाचें सदार सिकला जो, ।
मज तो चकोर पाहुनि सत्कीर्तिरता सदा रसिक लाजो. ॥ ७ ॥
जो प्रेरील प्रेमें गाया श्रीविष्णुच्या चरित्रास, ।
साक्षात् तो श्रीरामचि संसृतिचा वारिता परित्रास. ॥ ८ ॥
सुकविमन न सोडी हरियश, जैसें तोक थान; यागा या ।
बहुतचि अंतर ; विसरे, जो सुरसिक, तो कथा न या गाया. ॥ ९ ॥
हरिचरिताच्या पानें, गानें, भवपाश सुदृढही उकले; ।
मुकले सुखास, ऐसें जें न करिति; पटुहि फार ते चुकले. ॥ १० ॥
चित्ता ! जेणें कामप्रमुखाहितसहित कळि वदे ‘हा !’, तें ।
हरियश चिंती; ‘लटिकें स्पष्ट स्वप्रेम’ कळिव देहातें. ॥ ११ ॥
वास करिति आनंदें, माहेरीं जेविं लाडक्या कन्या, ।
साधूंत सत्कथा, ज्या श्रोत्यांचें पाप नाशिती धन्या. ॥ १२ ॥
तेजस्वी संतचि हे नेत्रें देतात आंतबाहेर, ।
तुज दिव्य दृष्टि देउनि, म्हणतिल ‘हा सद्विलास बा ! हेर.’ ॥ १३ ॥

—मोरोपंत.

## ओंव्या.

कथा होती तेथें जावें, । दूर दीनासारखें बसावें, ।
तेथील सकळ हार्द घ्यावें । अंतर्यामीं. ॥ १ ॥

तेथें भले आढळती, । व्यापक तेही कळों येती, ।
हळूहळू मंदगती । रीघ करावी. ॥ २ ॥
धूर्तपणें सकळ जाणावें, । अंतरीं अंतर बाणावें, ।
समजल्याविण शिणावें । कासयासी ? ॥ ३ ॥

—रामदास.

## श्लोक.

हरिपादयुगस्मरणप्रवणें, भगवज्जनदिव्यकथाश्रवणें, ।
चतुरें रसिकें समय क्रमणें, सुख अन्य नसेचि भवभ्रमणें. ॥ १ ॥
कथासुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती;
शिशूंस, जरठांसही, निरखितां रसें दाटती; ।
दुहोत भलते सदा तरि न लेशही आटती;
स्ववत्समल भक्षिती, परि न सर्वथा वाटती. ॥ २ ॥
कथा श्रवणचत्वरीं जरि पुनःपुन्हां ये, रते
महारसिक तद्रसीं, विटति ऐकतां येर ते. ।
कथा भुवनमोहिनी, अशि न मोहिनी होय; ती
हरो असुरधी, हिनें कितिक मोहिले हो ! यती. ॥ ३ ॥
सुरासुर नरोरगां भुलवुनी कथा न त्यजी,
न भेद करि पंक्तिचा, अमृत पाजिती सत्य, जी ! ।
तिणें जरि सुधारस स्वरतमानसां पाजिला
वधी अमृत घोटितां, द्रव नयेचि बापा ! जिला. ॥ ४ ॥

—मोरोपंत.

## १०. श्रद्धा, भक्ति, व भक्त.

जाणे भक्तीचा जिव्हाळा, । तोची दैवाचा पुतळा. ॥ १ ॥
आणीक नये माझ्या मना, । हो का पंडीत शहाणा. ॥ २ ॥
नामरूपी जालें चित्त, । त्याचा दास मी अंकित. ॥ ३ ॥
तुका म्हणे, नवविध । भक्ति जाणे तोची शुद्ध. ॥ ४ ॥

नित्य उठोनियां खायाचीच चिंता, । आपुल्या तूं हिता नाठविसी. ॥ १ ॥
जननीचे पोटीं उपजलासी जेव्हां, । चिंता तुझी तेव्हां केली तेणें. ॥ २ ॥
चातकांलागूनी मेघ नित्य वर्षे, । तो तुज उदासें करिल केवीं ! ॥ ३ ॥
पक्षी वनचरें आहेत भूमीवरी, । तयांलागीं हरी उपेक्षीना. ॥ ४ ॥
तुका म्हणे, भाव धरुनी राहे चित्तीं, । तरी तो श्रीपती उपेक्षीना. ॥५॥

मोलें घातलें रडाया, । नाहीं असूं आणि माया. ॥ १ ॥
तया भक्तिवाद काय ? । रंग बेगडेचा न्याय. ॥ २ ॥
वेठी धरल्या दावी भाव, । मार्गे पळावया पाव. ॥ ३ ॥
काजव्याच्या ज्योती, । तुका म्हणे नलगे वाती. ॥ ४ ॥

कृपावंत किती, । दीनें बहु आवडती. ॥ १ ॥
त्यांचा भार वाहे माथां, । करी योगक्षेमचिंता. ॥ २ ॥
भुलों नेदी वाट, । करीं धरुनी दावी नीट. ॥ ३ ॥
तुका म्हणे, जीवें । अनुसरतां एका भावें. ॥ ४ ॥

कांहीं न मागती देवा, । त्यांची करूं धावे सेवा. ॥ १ ॥
हळूहळू फेडी ऋण, । होउनियां रूपें दीन. ॥ २ ॥
होऊं न सके वेगळा । क्षण एक त्यांनिराळा. ॥ ३ ॥
तुका म्हणे, भक्तिभाव । हाची देवाचाही देव. ॥ ४ ॥

तयासी नेणतीं बहु आवडती, । होय जयां चित्तीं एक भाव. ॥ १ ॥
उपमन्यु धुरु हे काय जाणती ? । प्रल्हादाच्या चित्तीं नारायण. ॥२॥
कोळी, भिल्ल, पशु, श्वापदें, अपारें । कृपेच्या सागरें तारियेलीं. ॥ ३ ॥
काय तीं गोपाळें चांगलीं शाहाणीं, । तयां चक्रपाणि जेवी सवें. ॥४॥
**तुका** म्हणे, भोळा भाविक हा देव, । आम्ही त्याचे पाव धरुनी ठेलों.।५

नाहीं काष्ठाचा गुमान, । गोवी भ्रमरा सुमन. ॥ १ ॥
प्रेम प्रीतीचें बांधलें, । तें न सुटे कांहीं केलें. ॥ २ ॥
पदरीं घाली पिळा । बाप, निर्बळ साठीं बाळा. ॥ ३ ॥
**तुका** म्हणे, भावें । भेणें देवें आकारावें. ॥ ४ ॥

भावापुढें बळ । नाहीं कोणाचें सबळ. ॥ १ ॥
करी देवावरी सत्ता, । कोण त्याहुनी परता ? ॥ २ ॥
बैसे तेथें येती । न पाचारितां शक्ती. ॥ ३ ॥
**तुका** म्हणे, राहे । तयाकडे कोण पाहे ? ॥ ४ ॥

कासिया पाषाण पूजिती पितळ । अष्टधातु खळ भावहीन ? ॥ १ ॥
भावची कारण, भावची कारण, । मोक्षाचें साधन बोलियेलें. ॥ २ ॥
काय करील जपमाळा, कंठमाळा ? । करिशी वेळोवेळां विषयजप. ॥ ३
काय करिशील पंडित हे वाणी ? । अक्षराभिमानी थोर होय. ॥४॥
काय करिशील कुशळ गायन ? । अंतरीं मळीण कुबुद्धि ते. ॥ ५ ॥
**तुका** म्हणे, भाव नाहीं, करी सेवा, । तेणें काय देवायोग्य होशी ? ६

### गीति.

श्रद्धाच करितसे हित धर्माचें, जेंवि माय तनयाचें. ।
जप, तप, मख, गुरुपूजा, मुख्य श्रद्धाचि आयतन यांचें. ॥ १ ॥

श्रद्धेनें भजल्यातें पाषाणहि फलद होय, जो अज्ञ ।
तोही सद्गुरु होतो, अश्रद्धेनें वृथा महायज्ञ. ॥ २ ॥
—मोरोपंत.

## ११ यश, कीर्ति.

### ओंव्या.

पुरुषें तंव जगावें जगीं, । जंव अपकीर्ति न शिवे अंगीं, ।
अपयशवंत, तो कुमार्गी । जितची मेल्यासमान. ॥ १ ॥
—मुक्तेश्वर.

जननिंदेचें संभाषण । रायासी हें परम दूषण, ।
सद्यः करी यशहाण, । कीर्तिसदन पाहोनी. ॥ १ ॥
भगीरथ, पुरूरवा, ययाती, । इक्ष्वाकु, हरिश्चंद्र चक्रवर्ती, ।
अद्यापि तयांची कीर्ति । सकळ वर्णिती निजमुखें. ॥ २ ॥
कीर्तिविरहित जन्म, । तो परम दुर्मरणासमान, ।
त्यासी न भेटे सर्वोत्तम, । व्यर्थ वांचणें तयाचें. ॥ ३ ॥
स्त्री, पुत्र, भ्रातृ, प्रिय ज्यास, । परी त्यांच्या योगें घडे अपेश, ।
त्यांचा त्याग करावा निःशेष, । तरीच सौख्य पावावें. ॥ ४ ॥
कीर्तिनिमित्त सोडिती प्राण, । कीर्तिनिमित्त टाकिती राज्यधन, ।
लोकनिंदा तस्कर दारुण । सत्कीर्तिधना चोरिती. ॥ ५ ॥
—श्रीधर.

सत्कीर्ति ज्याची जगीं वाढिती, । त्यातें अक्षय स्वर्गप्राप्ती; ।
अकीर्ति लोकीं चालती, । अधोगति त्या न चुके. ॥ १ ॥
—शुभानंद.

अपकीर्तीचें जें जिणें । लोकांमध्यें लाजिरवाणें, ।
याही परीस भलें जीव देणें, । परी जिणें न ये कामा. ॥ १ ॥
अपकीर्ति निंदिजे जनीं, । कीर्ति वंदिजे वेदीं पुराणीं, ।
कीर्ति आपुली ऐकोनी, । सर्वांसी उत्साह होतसे. ॥ २ ॥
कीर्तिकारणें जे जन । करितातो व्रतें तपें दान, ।
कीर्तिकारणें यज्ञआचरण । स्वयें जाण आचरती. ॥ ३ ॥
कीर्तीकारणें तुळापुरुषदान, । कीर्तीकारणें यजनयाजन, ।
कीर्तीकारणें अन्नदान । घरोघरीं जन करिती. ॥ ४ ॥
कीर्तीकारणें शास्त्रपठण, । कीर्तीकारणें तर्कव्याख्यान, ।
कीर्तीकारणें करिती छळण । वादीं ब्राह्मण एकमेकां. ॥ ५ ॥
कीर्तीकारणें विजनीं पाणी । पाजितात पोयी घालोनी, ।
कीर्तीकारणें पंचाग्निसाधनी । धूम्रपानीं प्रवर्तती. ॥ ६ ॥

—एकनाथ.

## गीति.

यत्नें कीर्तिच जोडीं, बा! होय पदार्थ हाचि बहु धन्य. ।
राजे, पंडित, यांचें भूषण नाहींच कीर्तिहुनि अन्य. ॥ १ ॥
सत्कीर्तिप्रभवा श्री, पुण्यहि सत्कीर्तिचेंचि बा! तोक. ।
ज्योत्स्नेनें चंद्र जसा, शोभे सत्कीर्तिनेंचि हा लोक. ॥ २ ॥
धन मेळविलें, जें हय, गज, कांचन, रत्नराशि, सत्वरतें, ।
त्वां बा! अकीर्ति होतां सोडावें, तृण तसेंचि, सत्वर तें. ॥ ३ ॥

—मोरोपंत.

### अभंग.

दिली मान तरी नेघावी शत्रूची, । शरण आले त्यांसी जतन जीवें. ॥ १ ॥
समर्थांसी असे विचाराची आण, । भलीं पापपुण्य विचारावें. ॥ २ ॥
काकुळतीसाठीं सत्याचा विसर, । पाडिलें अंतर न पाहिजे. ॥ ३ ॥
तुका म्हणे, यश, कीर्ति आणि मान, । करितां जतन, देवा जोडे. ॥ ४ ॥

### श्लोक.

ऐकोनि ऐसें, वदे जानकीजानि,
"लोकापवादेंचि होते यशोहानि, ।
ज्याच्या नसे कीर्तिचा जाहला नाश,
त्याला न मारावया दक्ष कीनाश. ॥ १ ॥
मेले हरिश्चंद्रवैन्यादि जे संत,
ते या जगामाजि आहेत जीवंत; ।
ज्या बंधुयोषित्सुतांहीं यशोभंग,
स्वप्नांतरींही तयासी नसो संग. ॥ २ ॥

—मोरोपंत.

---

## १२ उपकार.

### अभंग.

नका घालूं दूध, जयामध्यें सार, । ताकाचे उपकार तरी करा. ॥ १ ॥
नेदा, तरी हें हो! नका देऊं अन्न, । फुकाचें जीवन तरी पाजा. ॥ २ ॥
तुका म्हणे, मज सगुणाची चाड, । पुरवा कोणी कोड दुर्बळाचें. ॥ ३ ॥

बीज पेरे सेतीं, । मग गाडेवरी वहाती, ॥ १ ॥
वायां गेलें ऐसें दिसे, । लाभ ज्याचे अंगीं वसे. ॥ २ ॥
पाल्याची जतन, । तरी प्रांतीं येती कण. ॥ ३ ॥
तुका म्हणे, आळा । उदक देतां लाभे फळा. ॥ ४ ॥

**ओंव्या.**

आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहानथोर. ।
तैसाची करीं परोपकार । मनापासोनी. ॥ १ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुखावें, । दुसऱ्याच्या सुखें सुखावें, ।
अवघेची सुखी असावे, । ऐशी वासना. ॥ २ ॥
उदंड मुलें नानापरी, । वडिलांचें मन अवघ्यांवरी, ।
तैशी अवघ्यांची चिंता करी । महापुरुष. ॥ ३ ॥
लोकीं अत्यंत क्षमा करिती, । आलिया लोकांचे प्रचीती, ।
मग ते पाठी राखिती । नानाप्रकारीं. ॥ ४ ॥
बहुतांसी वाटे थोर, । सर्वमान्य पाहिजे विचार, ।
धीर, उदार, गंभीर, । महापुरुष. ॥ ५ ॥

—रामदास.

म्हणे पवित्र ये संसारीं । धन्य धन्य परोपकारी, ।
सकळ कीर्तिवंत शरीरीं । शिरोमणी तो एक. ॥ १ ॥
जिहीं आपुल्या सर्व यत्नें । पराचे क्लेश परिहरणें, ।
श्रमोनि पुढिल्या सुख दावणें । तो एक धन्य संसारीं. ॥ २ ॥
प्रेरणा न करितां संकटीं, । कृपेनें अनाथ घाली पोटीं, ।
केला उपकार न बोले ओठीं, । तो एक धन्य पुरुष. ॥ ३ ॥
आपुल्या समान पुढला पाहे, । पराच्या संतोषें संतोष लाहे, ।

अन्यक्लेशें क्लेशत जाये, । तो एक धन्य संसारीं-॥ ४ ॥
परोपकाराविण समर्थ नर, । तो प्रेताचा देहशृंगार, ।
मांडवावांचोनी वाद्यगजर । नेतां सत्वर दहनार्थ. ॥ ५ ॥
जेणें प्रकारें परोपकार । घडे, तोची गा! पवित्राचार; ।
परातें पीडाकारक थोर । तो अधर्म जाणिजे. ॥ ६ ॥

—मुक्तेश्वर.

तोय मधुर आणि गोड, । परी पाषाण फोडी प्रचंड, ।
पुरवी तसें जगाचें कोड । परोपकारी सर्वदा. ॥ १ ॥
धेनु भक्षोनियां तृण, । दुजेया करवी पयःप्राशन, ।
पर्णभक्षक रामभजन । करोनी धन्य ते झाले. ॥ २ ॥
चंदन झिजोनी आपण, । निववी दुजया देहींचें उष्ण, ।
सुगंधें उपचारी संपूर्ण । परोपकारालागोनी. ॥ ३ ॥
कर्पूर विरोनी सुगंध करवी, । आगरू जळोनी परिमळ दावी, ।
परोपकारी सत्कीर्ति बरवी । घेती देहलाभ सांडोनी. ॥ ४ ॥
परोपकारीं वावरे पवन, । परोपकारीं दाहक यज्ञ, ।
परोपकारीं वर्षे जीवन, । हें तूं सज्ञान जाणसी? ॥ ५ ॥
परोपकारीं हे मेदिनी, । खननहननमलमूत्रविसर्जनीं ।
भूतत्रास न घेतां मनीं । परोपकारी सर्वदा. ॥ ६ ॥
पिकवी अठरा परींचीं धान्यें, । पशुपक्षियां फळतृणें, ।
करोनी भूतांचें रक्षणें । पृथ्वी वाहे संतोषें. ॥ ७ ॥
शेष फणाग्रीं मेदिनी । धरोनी परोपकारालागोनी ।
सर्वदा वसे पाताळभुवनीं, । हें त्वां कां न परिशिलें? ॥ ८ ॥

परोपकारालागीं हरी । वराह होवोनी भूमि दाढे धरी ।
कांसवरूपें पृष्ठीवरी । हे वसुमती आवरिली. ॥ १ ॥

—शुभानंद.

## श्लोक.

श्रुतेंचि कीं श्रोत्र न कुंडलानें, । दानेंचि कीं पाणि न कंकणानें, ॥
साजे तसा देहहि हा न आनें, । परोपकारेंचि न चंदनानें. ॥ १ ॥

—भर्तृहरि.

## गीति.

श्लाघ्य उदारपणचि वहु, धनवंतांसचि न, अल्प धनिकांही. ।
तैसेंहि सहिष्णुत्वहि उचित समर्था, तसें न जनिं कांहीं. ॥१॥
प्रिय भाषणसह दान, ज्ञानहि गतगर्व, वित्त सत्याग, ।
शौर्य क्षमासहित, या पावे चहुं मंगलां महाभाग. ॥२॥
दुःखित जनीं कृपेचा प्रभुस न येईल कां बरा ऊत ? ।
चोरत्रस्ता सोडुनि, न भला राहेल लांब राऊत. ॥३॥
येतील समर्थांच्या कार्यास समर्थ, काय तें चित्र ? ।
तो धन्य स्तवनोचित, जो दीनजळासि दुग्ध सन्मित्र. ॥४॥
जरि सिंधु जीवनाचीं क्षणहि न दे करुनियां दया, दानें, ।
तरि वांचावें कैसें ? रक्षावें वा स्वयाद यादानें ? ॥५॥
दवडाया दीनांचीं दुःखें, सर्वस्व वेंचिती संत, ।
संतता निववी घन, वन शृंगारी 'व'कारवान् संत. ॥६॥
पंकांत दैवयोगें जी पावाया श्रमा रुते गाय, ।
तीचा उद्धर्ता जो, त्यासि सकल लोक [ मारुते ! ] गाय. ॥७॥

करिती सकुटुंब महादुष्काळीं दीन जन उपासा जे, ।
तैशांवरि सकृपांहीं जी केली, तीच बहु कृपा साजे. ॥८॥
चुकल्या जनासि कोणी, सांगुनि, निजहितपथास जो लावी, ।
धनदेंही उपकृतिशीं त्याच्या निज संपदा न तोलावी. ॥९॥
जरि याचितार्थ न पवे, सुखरोमांचाढ्य आंतवरि काय ।
तत्काळ याचकाचा जें न करी दान, तेंहि तरि काय? ॥१०॥
युद्धीं देह त्यजिते अनिवर्ती पुरुष जे, सुलभ आजि ते; ।
अति दुर्लभ सत्पात्रीं श्रद्धेनें सर्वही धन त्यजिते. ॥११॥
दुर्गति जशांतशांचे सर्वस्वें काम पुरवितां आली, ।
कल्याणसंपदा ती, साक्षात् श्रीची खरीखुरी आली. ॥१२॥
वसतो आत्मा, यास्तव सर्वां भूतीं दया करा, नमुनी; ।
करिति उपाया इतरा, सुखवाया या दयाकरा, न मुनी. ॥ १३ ॥
ते योगयाग रुचति न, भूतदया हे जशी रुचे हरिला; ।
प्रभु तुष्ट इणें होतां, अर्थ कवण जड मना! मनीं धरिला? ॥१४॥
मोक्षद म्हणे, "सदय जो, कोणाचाही करीचना द्रोह, ।
नांदे क्षमा जयाच्या हृदयीं, तो साधु नाशितो मोह, ॥१५॥
भव्य बळ सत्य ज्याचें, नित्य असूयादिरहित जो काय, ।
सुखदुःखांत सम सदा, ज्याचा सर्वोपकाररत काय, ॥१६॥
वाहे ना मान, करीं इतरांचा मान, बोधनीं दक्ष, ।
वंचक नव्हे, प्रवर्ते धरुनि दयेचाचि नित्य जो पक्ष." ॥१७॥

**श्लोक.**

जैसें असाधूस अकार्य नाहीं,
किंवा तितिक्षूंस असह्य कांहीं, ।

न अन्य त्या, ज्या समदृष्टि मान्या,
अदेय तैसेंच नसे वदान्या. ।। १ ।।

—मोरोपंत.

**ओंव्या.**

जे अत्यंत उदार, । चित्त त्यांचें म्हणावें थोर, ।
स्पृहा नसणें हा प्रकार । उदारत्वाचा. ।। १ ।।
स्पृहा धरोनी लाभाची, । व्यवहारें धन उदंड वेची, ।
तेही काय तयाची । उदारता म्हणावी ? ।। २ ।।

—वामनपंडित.

---

## १३. पंडित.

**ओंव्या.**

शोकभयाचे आघात । क्षणक्षणां होती प्राप्त, ।
मूर्ख होती व्याकुळचित्त, । ज्ञानें पंडित भ्रमेना. ।। १ ।।
आपत्काळ देखोनी पुढें, । ज्ञानिया अंगीं वीरश्री चढे, ।
कोटी दुःखाचें दळ वाडें । विवेकलता विभांडी. ।। २ ।।

—मुक्तेश्वर.

ज्यासी शांति आणि समाधान, । साचार बंधमोक्षाचें ज्ञान, ।
तो महापंडित जाण, । ऐसें श्रीकृष्ण बोलिला. ।। १ ।।

—एकनाथ.

विदुर म्हणे लोकविरुद्ध । कर्म नाचरती प्रबुद्ध, ।
अधर्म, असत्य, निषिद्ध, । नाचरे तोची पंडित. ।। १ ।।

नित्य नैमित्तिक फळाशा न धरी, । क्रोध हर्ष नातळे तिळभरी, ।
सुखदु:ख पातलें तिळभरी । तोची पंडित जाणिजे. ॥ २ ॥
ऐश्वर्यकाळीं न फुगे मनीं, । दु:ख आलेया नाफळी मूर्ध्नीं, ।
शीतउष्ण मानापमानीं । तोची पंडित जाणिजे. ॥ ३ ॥
वर्णाश्रमकर्म आचरण, । धर्मार्थ अर्थपरिग्रहण, ।
कामना सांडोनी करी दान, । तोची पंडित जाणिजे. ॥ ४ ॥
स्वशक्तिऐशी अद्वैतभक्ती, । आगळा सोस न मनी चित्तीं, ।
परानुदु:ख न मानिती । तोची पंडित जाणिजे. ॥ ५ ॥
परपैशून्य नायके कानीं, । परिसुनी न बोले वदनीं, ।
स्नेह वाढवी सज्जनीं, । तोची पंडित जाणिजे. ॥ ६ ॥
अप्राप्य त्याची इच्छा न करी, । गेलेयाचा शोक मनीं न धरी, ।
आपत्काळीं धैर्य धरी, । तोची पंडित जाणिजे. ॥ ७ ॥
विभागासी आली पाळी, । वर्ते संतसज्जनमेळीं, ।
ज्ञानदृष्टीं आत्मा न्याहाळी, । तोची पंडित जाणिजे. ॥ ८ ॥
अनायासी हो सायासी, । अर्थ आलेया हातासी, ।
अद्वैतभक्तीं तोषवी जनासी । तोची पंडित जाणिजे. ॥ ९ ॥
नित्यानित्यविवेक, । मनीं सांडिला संकल्प, ।
सर्वदा आत्मा उपासक, । तोची पंडित जाणिजे. ॥ १० ॥
अंतरीं वेधिला ब्रह्मबोधें, । बाहेरी चाले जनाचे छंदें, ।
मुख न विटाळे नीच शब्दें, । तोची पंडित जाणिजे. ॥ ११ ॥
ऐश्वर्य आलेया संपूर्ण, । निरभिमानें आत्मा सज्जन, ।
भजोनी पावे समाधान । तोची पंडित जाणिजे. ॥ १२ ॥

आश्रय झालेया समर्थाचा, । परोपकारीं वर्ते वाचा, ।
चाळा लावी हरिभजनाचा, । तोची पंडित जाणावा. ॥ १३ ॥
आपणासमान सर्वांतरीं । सुखदुःख मानी संसारीं, ।
भूतकृपाळ सदाचारी, । तोची पंडित म्हणावा. ॥ १४ ॥
सर्वदा हरिनामजप, । निववी दुजयाचा संताप, ।
परातें नेदी पश्चात्ताप, । तोची पंडित जाणिजे. ॥ १५ ॥
या नश्वर संसारीं । न तोडी धर्मगळसरी, ।
केल्या कर्मीं कामना न धरी, । तोची पंडित जाणिजे. ॥ १६ ॥
नित्यनैमित्तिक कर्मादिक । यथाशक्ति करी साधक, ।
तें ब्रह्मार्पण करी सकळिक, । तोची पंडित जाणिजे. ॥ १७ ॥
सुखदुःखीं नव्हे निमग्न, । पराचे दुःखें दुखवे मन, ।
आत्मवत् सर्वभूतीं मानी जन, । तोची पंडित म्हणावा. ॥ १८ ॥
जैसी गंगा, का धरणी, । परी अनुपकार नाणी मनीं, ।
त्यापरी क्षमाशील जनीं । तोची पंडित म्हणावा. ॥ १९ ॥
नाठवी आपण उचित केलें, । न स्मरे दुजयानें दुःख दिधलें, ।
ईश्वरसूत्रातें ओळखिलें । तोची पंडित म्हणावा. ॥ २० ॥
शास्त्रमर्यादा सदा पाळी, । पुराणश्रवणीं प्रीति आगळी, ।
परातें तोषवी सर्वकाळीं, । तोची पंडित जाणिजे. ॥ २१ ॥

—शुभानंद.

## गीति.

विदुर म्हणे, जो आस्तिक, गुरुवेदोक्तीं जयास विश्वास, ।
मीपण ज्यास न शिवलें, तो पंडित मान्य होय विश्वास. ॥ १ ॥

दुर्लभ वस्तु न वांछी, न करी जो नष्ट वस्तुचा शोक, ।
आपत्तींत न मोहे, त्या पंडित म्हणति जाणते लोक. ॥ २ ॥
बहु कर्म करी, पंडित कथनावसरींहि थोडकेंच वदे; ।
शाकांत प्रवर जसें, पथ्यहि, तैसेंच दोडकें चव दे. ॥ ३ ॥
चुकवी कुगति, यशें उत्सुकवी सन्मन, असन्मनें सुकवी, ।
सुखवी मातेला निजमुखवीक्षामृतरसेंचि तो सुकवी. ॥ ४ ॥
देहादि द्वैत मृषा, जाणोनि परस्वभाव कर्मातें, ।
जो न स्तवी, न निंदी, पावतसे तोचि सुज्ञ शर्मातें. ॥ ५ ॥
गलिताहंकृति जाणे बंधामोक्षासि, अनुभवीं चढला, ।
तो पंडित, इतर नव्हे, जरि पुष्कळ शास्त्र सर्वही पढला. ॥६॥

—मोरोपंत.

श्लोक.

जे का ज्ञानें लाधले सद्विचारा, । संपत्तीचा त्यांपुढें काय तोरा; ।
पद्माचा जो तंतु तो वारणाला । वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला. ॥१॥

—भर्तृहरि.

---

## १४. देवतुल्य सत्पुरुष.

ओंव्या.

जो ऐश्वर्यें न चढे मदा, । दरिद्रत्वें दीनत्व न शिवे कदा, ।
निंदी त्याची न करी निंदा, । तो नारायण नररूपें. ॥ १ ॥
कामक्रोधभूतसंचारीं । न चळे सुविचारपंचाक्षरी, ।
परधनपरस्त्रीपासोनी दुरी । तो नारायण नररूपें. ॥ २ ॥

परोत्कर्षें निर्वैर मनीं, । समानबुद्धि मानापमानीं, ।
दंभाचार सांडिला मनीं, । तो नारायण नररूपें. ॥ ३ ॥
सज्जन श्रोत्रियां देखोनी नेत्रीं, । जो गर्व स्वयेंची दवडी दुरी, ।
शीर्षें वाट झाडी पुढारी । तो नारायण नररूपें. ॥ ४ ॥
सत्य आणि सहनशील, । तेणें जिंकिलें विश्व सकळ, ।
ऐशिया गुणीं सर्व कुशळ । म्हणोनी वंद्य विश्वातें. ॥ ५ ॥
सर्वां भूतीं समान दया, । निर्जर नमस्कारिती तया, ।
ऐशिया गुणीं भूषित काया, । म्हणोनी प्रिय देवातें. ॥ ६ ॥
विजनीं भरलीं कनकें पाहे, । देखिल्यावरी लोटी पायें, ।
ऐशी निर्लोभता लाहे, । तोची शंकर म्हणों ये. ॥ ७ ॥
जया अधीन मन इंद्रियें, । न मनीं सुखदु:खाचे घाये, ।
छळितांही परक्रोधा नये । तोची शंकर म्हणों ये. ॥ ८ ॥
विश्व हे अवयव आपुले, । यांहीं केल्या आपण केलें, ।
ऐसें साचार जया कळलें, । तोची निश्चयें जगदात्मा. ॥ ९ ॥
दोषियाचे दोष अनेक । बोलणें तो अविवेक, ।
न बोले, नाठवी, तो देख, । मूर्तिमंत ईश्वर. ॥ १० ॥

—मुक्तेश्वर.

## अभंग.

जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपले, ॥ १ ॥
तोची साधु ओळखावा, । देव तेथेंची जाणावा. ॥ २ ॥
मृदु सबाह्य नवनीत, । तैसें सज्जनाचें चित्त. ॥ ३ ॥
ज्यासी अपंगिता नाहीं, । त्यासी धरी जो हृदयीं. ॥ ४ ॥

दया करी जे पुत्रासी, । तेची दासा आणि दासी. ॥ ५ ॥
**तुका** म्हणे, सांगूं किती ? । तोची भगवंताची मूर्ती. ॥ ६ ॥

जाणावा तो नर देवची साचार, । वाचे निरंतर 'राम राम.' ॥ १ ॥
सगुणीं सद्भाव, नाहीं ज्ञानगर्व, । तयालागीं सर्व सारिखेची. ॥ २ ॥
निंदका वंदका सगट सांभाळी, । मन सर्वकाळीं पालटेना. ॥ ३ ॥
पालटेना मन परस्त्रीकांचनीं, । निववी वचनीं पुढल्यासी. ॥ ४ ॥
पुढिल्यासी तोची सुख देत आहे, । उपकारीं देहे लावितसे. ॥ ५ ॥
लावितसे देहे रामभजनास, । **रामी रामदास** हरिभक्त. ॥ ६ ॥

**पद.**

आम्ही नमुं त्याला, नमुं त्याला, । उपाधि नाहीं ज्याला. ॥ ध्रु० ॥
संशय उरला नाहीं, । अवघा ब्रह्मचि झाला पाहीं. ॥ आम्ही० ॥१॥
स्वयंभु मुळिंचा आहे, । द्वैतपणास गिळूनी राहे. ॥ आम्ही० ॥ २ ॥
समूळ अवघें हरलें, । पूर्ण निर्गुण जयासी कळलें. ॥ आम्ही० ॥३॥
**रंगनाथ** गुरु पाहे, । त्याचा अनुभव दुसरा नोहे. ॥ आम्ही० ॥४॥

---

## १५. संतमहिमा.

**ओंव्या.**

आतां वंदूं संत सज्जन, । जे वैराग्यवनींचे पंचानन, ।
कीं ज्ञानांबरींचे चंडकिरण, । उदयअस्त नसे जयां. ॥ १ ॥
जे भक्तसरोवरींचे राजहंस, । जे का अविद्यारण्यहुताश, ।
कीं ते पद्महस्ती विशेष । भवरोगवैद्य होती. ॥ २ ॥
कीं जीव पावे आपुले पदासी, । ऐसा मुहूर्त देणार ज्योतिषी, ।
कीं ते पंचाक्षरी स्वप्रतापेंसी । पंचभूतांसीं पळवीत जे. ॥ ३ ॥

कीं दैवी संपत्तीचे भाग्यवंत, । मुमुक्षां करिती दारिद्र्यरहित, ।
कीं ते दयेचीं अद्भुत । गोपुरें काय उंचावलीं ! ॥ ४ ॥
संत आणि इतर जन । दिसती जैसे समसमान, ।
परी संत सदा आनंदघन । ब्रह्मानंदें डोलती. ॥ ५ ॥
बकासंगें असतो मराळ, । दिसती सारखे शुद्ध धवळ, ।
परी क्षीर आणि जळ । करिती वेगळे हंसची. ॥ ६ ॥
वायसांत बसे कोकिळ, । त्याचसारखा दिसे केवळ, ।
परी येतां वसंतकाळ । पंचमस्वर आळवी. ॥ ७ ॥
जंबुकवनांत वाढला केसरी, । परी काय तया जंबुकसरी ? ॥
क्षणमात्रें गज विदारी, । हाकें भरी निराळ. ॥ ८ ॥
स्फटिकांत मुक्ताफळ जाण । दिसे सारिखें समसमान, ।
मुक्त जोहरी काढी निवडून, । करितो जतन जीवेंसीं. ॥ ९ ॥
पाषाणांत परिस पूर्ण । दिसे तैसाची जड कठिण, ।
परी तो करी लोहाचें सुवर्ण, । कृष्णवर्णातें लपवी. ॥ १० ॥
कस्तुरी आणि मृत्तिका, । दिसे रंग एकसारिखा, ।
परी मृगमद सुवासें सकळिकां । श्रीमंतांसी निववितसे. ॥ ११ ॥
तक्र दुग्ध एक वर्ण, । परी दुग्ध गोड सकळांसी मान्य, ।
तैसें संतांचें रूप जाण, । इतरांसमान न गणावें. ॥ १२ ॥
जे चातुर्यार्णवींचीं रत्नें, । कीं शांतिभूमीचीं निधानें, ।
कीं भक्तिवनींचीं सुमनें । विकासिलीं साजिरीं. ॥ १३ ॥
कीं ते वैराग्यांबरांचे दिनकर, । कीं अक्षय्य विज्ञानानंदचंद्र, ।
कीं अपरोक्ष ज्ञानसमुद्र, । नलगे अंत कोणातें. ॥ १४ ॥

कीं ते प्रेमगंगेचे ओघ, । कीं स्वानंदसुखाचे मेघ, ।
अखंड धारा अमोघ, । वर्षती मुमुक्षुचातकां. ॥ १५ ॥
कीं ते श्रवणामृताचे कुंभ, । कीं ते कीर्तनाचे अचळ स्वयंभ, ।
कीं ते स्मरणाचे सुप्रभ । ध्वजची पूर्ण उभारिले. ॥ १६ ॥
कीं ते हरिपद्मींचे भ्रमर, । कीं विवेकमेरूचीं शृंगें सुंदर, ।
कीं ते क्षमेचे तरुवर, । चिदाकाशीं उंचावले. ॥ १७ ॥
कीं ते मननजळींचे मीन, । कीं ते भवगजारि पंचानन, ।
कीं परमार्थाचीं सदनें पूर्ण, । निर्मळ शीतळ सर्वदा. ॥ १८ ॥
कीं ते दयेचें भांडार, । कीं उपरतीचें माहेर, ।
कीं कीर्तिजहाजें थोर । भक्तिशीड फडके वरी. ॥ १९ ॥
कीं ते परलोकींचे सखे, । कीं ते अंतकाळींचे पाठिराखे, ।
वैकुंठनाथ ज्यांचे भाके । गुंतोनी तिष्ठे त्यांपाशीं. ॥ २० ॥

—श्रीधर.

ब्रह्मसाधनाचा श्रेष्ठोपाय । निगर्वें धरावे संतपाय, ।
त्याविना करितां बहु उपाय । एकही नये उपेगा. ॥ १ ॥
शरण अनन्य होतां संतां, । संत ते अनन्य शरणागता, ।
कृपा उपजे ज्यांच्या चित्ता, । उद्धरती पैं क्षणैकें. ॥ २ ॥
संत ते साकार अनंतरूप, । संत ते पूर्ण परब्रह्मस्वरूप, ।
संत ते केवळ ज्ञानदीप । दवडिती पापतम प्रकटोनी. ॥ ३ ॥
संत तोची अनंत जाण, । संतपूजेनें संतोषे भगवान, ।
फळ बाळका अर्पण । केल्या, वडील ज्यापरी. ॥ ४ ॥
लालवितां अर्भकातें, । स्नेह उपजे पैं जननीतें, ।
भक्त पाववितां सुखातें, । ईश्वरातें सुख त्यापरी. ॥ ५ ॥

—शुभानंद.

## अभंग.

सर्वत्र अद्रोह, अनुग्रह, दान, । हें त्रय निधान कल्याणाचें. ॥ १ ॥
संतांच्या ठायीं हें धर्मत्रय वसे, । इतरत्र नसे क्षणमात्र. ॥ २ ॥
संतासी जो आला शत्रुही शरण, । तयासी मरण न ते देती. ॥ ३ ॥
फळतो दगड, धरितां विश्वास, । हें आहे विश्वास अवगत. ॥ ४ ॥
मग संतीं दृढ ठेवूनी विश्वास, । सोडिला निश्वास उष्ण कोणी?॥५॥
संतांची शाश्वत धर्मीं चित्तवृत्ती, । अधर्मी प्रवृत्ती स्वप्नीं नसे. ॥६॥
संतांची संसारनदीनौका कथा, । त्या संतांसीं व्यथा कासयाची?॥७॥
साधुसंत गंगायमुनांचे ओघ, । हा संगम मोघ कधीं नाहीं. ॥ ८ ॥
संतांपासुनियां संतां भय झालें, । असें काना आलें नाहीं कधीं. ॥९॥
संत चालविती सत्यें तरणीतें, । तपें धरणीतें धरताती. ॥ १० ॥
किंबहुना संत सर्वांचीही गती, । संत मुक्तिपती, संत ज्ञान. ॥ ११ ॥
व्रत चालवीते एक संतराय, । नामें अंतराय जाती दूर. ॥ १२ ॥
प्रसाद शाश्वत, अर्थ बहुमान, । यांचें मूलस्थान संत तुम्ही. ॥ १३ ॥

## श्लोक.

वरि दिसे मृदु मौक्तिक पोवळें, । परि न लेश तदंतर कोवळें. ॥
न तुळवे विधु, अंकित जो मळें, । सरस साधुमनें शुचि कोमळें. ॥१॥
मित्रातां म्लानि देतो, जरि अमृतरसांलागिं हा चांद वीतो; ।
साधू तैसा कसा? जो सुखवुनि सकळ प्राणियां नांदवीतो; ॥
साधूच्या दर्शनानें अशिव तिथि अशी सर्वथा आढळेना; ।
साधूचें तेज रात्रंदिवस समचि, तें सोडुनी त्या ढळेना. ॥ २ ॥

—मोरोपंत.

## सवाई.

नम्रपणेंचि महोन्नत जे, गुण वर्णुनियां परकीय जनांचे; ।
सांगितल्याविण दाविति कौशल सर्वजनांप्रति जे स्वगुणांचें; ॥
स्वार्थ परार्थहि साधिति; जिंकिति शांतिबलें मुखरत्व खलांचें; ।
संत महाद्भुत भाजन यापरि, सेवन कोण करी न तयांचें? ॥ १ ॥

—भर्तृहरी.

## गीति.

करुणेचें वतन तुम्ही, शांतीचें भाग्यवंत माहेर, ।
सुघन ज्ञानरसाचे संत रवे मधुर आंतबाहेर. ॥ १ ॥
स्मरभूतभूतवैद्य, स्पर्शमणी सर्व पापिलोहाचे, ।
ब्रह्मग्रह संत तुम्ही प्रणतजनाच्या अनादि मोहाचे. ॥ २ ॥
सुरभि, स्वर्द्रुम, चिंतामणि, शिष्याचे दयानिधी पंत, ।
निजबिंब प्रतिबिंबा अमृतकराचे खरे तुम्ही संत. ॥ ३ ॥
साधुगुणग्राहकता, भूतीं सर्वत्र सर्वदा समता, ।
गुरुरीति वसे संतापांशीं, हे उक्ति सर्व दासमता. ॥ ४ ॥
विमल सकल गुण तुमचे, कां न सुधाधिक म्हणों? निवे दास ।
ज्यांच्या श्रवणेंचि; असे अद्भुत, रुचले म्हणोनि वेदास. ॥ ५ ॥
अनता अपवित्राही, साधु हित सदा नता पवित्रास. ।
साधु सुहृत् सर्वांचा, कोणासहि दे न तापवित्रास. ॥ ६ ॥
मातेचे पाय जसे, छळ करित्याचे तसेच जो पाहे, ।
साधु निवे, नच कोपे, न दुरुक्तक्षोभ मानसीं वाहे. ॥ ७ ॥
वाढवि अन्याणुगुणा साधु सदा वायु जेविं फुणगीतें, ।

सुयशानें जरि साजे, लाजे परि फार आत्मगुणगीतें. ॥ ८ ॥
ज्यासह घडतें दैवें सहज पथीं चालणें पदें सात, ।
त्या 'मित्र' साधु म्हणती, देतीच व्यसनसागरीं हात. ॥ ९ ॥

–मोरोपंत.

## अभंग.

हिरा ठेवितां ऐरणीं, । वांचे मारितां जो घणीं. ॥ १ ॥
तोची मोल पावे खरा, । करणीचा होय चुरा. ॥ २ ॥
मोहरा होय तोची अंगें, । सूत न जळे ज्याचे संगें. ॥ ३ ॥
**तुका** म्हणे, तोची संत, । सोसी जगाचे आघात. ॥ ४ ॥

पवित्र सोंवळीं । एक तींच भूमंडळीं, ॥ १ ॥
ज्यांचा आवडता देव, । अखंडित प्रेमभाव. ॥ २ ॥
तींच भाग्यवंतें, । सरतीं पुरतीं धनवित्तें. ॥ ३ ॥
**तुका** म्हणे, देवा ! । त्यांची केली पावे सेवा. ॥ ४ ॥

चंदनाचे हात, पायही चंदन; । परिसा, नाहीं हीन कोणी अंग. ॥१॥
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार, । सर्वांगीं साकर अवघी गोड. ॥२॥
**तुका** म्हणे, तैसा सज्जनापासून । पाहतां अवगुण मिळेचीना. ॥ ३ ॥

नाहीं संतपण मिळत हें हाटीं, । हिंडतां कपाटीं रानीं वनीं. ॥ १ ॥
न ये मोल देतां धनाचिया राशी, । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें.॥२॥
**तुका** म्हणे, मिळे जिवाचिये साठीं, । नाहीं तरी गोष्टी बोलों नये.॥३॥

घेसी तरी घेई संतांची हे भेटी, । आणीक ते गोष्टी नको मना. ॥१॥
सर्व भावें त्यांचें देव भांडवल, । आणीक ते बोल न बोलती. ॥२॥

करिसील तों करीं संतांचा सांगात, । आणीक ते मात नको, मना! ॥३॥
बैससी तरी बैस संताचे मधीं, । आणीक ते बुद्धि नको, मना! ॥ ४ ॥
जासी तरी जाई संताचिया गांवां, । होईल विसावा तेथें, मना! ॥५॥
**तुका** म्हणे, संत सुखाचे सागर, । मना! निरंतर धणी घेई. ॥ ६ ॥

संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ, । नाहीं तळमळ दुःख लेश. ॥ १ ॥
तेथें मी राहीन होऊन याचक, । घालितील भीक तेची मज. ॥ २ ॥
संतांचिये गांवीं वरो भांडवल, । अवघा विठ्ठल धनवित्त. ॥ ३ ॥
संतांचें भोजन अमृताचें पान, । करिती कीर्तन सर्वकाळ. ॥ ४ ॥
संताचा उदीम उपदेशाची पेंठ, । प्रेमसुखसाटी घेती देती. ॥ ५ ॥
**तुका** म्हणे, तेथें आणीक नाहीं परी, । म्हणोनि भिकारी झालों त्यांचा.॥६

रवि, दीप, हिरा, दाविती देखणें, । अदृश्य दर्शनें संतांचेनी. ॥ १ ॥
त्यांचा महिमा काय वर्णूं मी पामर? । न कळे तो साचार ब्रह्मादिकां.॥२
तापली चंदन निववितो कुडी, । त्रिगुण तो काढी संतसंग. ॥ ३ ॥
मायबापें पिंड पाळियेला माया, । जन्ममरण जाया संतसंग. ॥ ४ ॥
संतांचें वचन वारी जन्मदु:ख । मिष्टान्न तें भूकनिवारण. ॥ ५ ॥
**तुका** म्हणे, जवळी न पाचारितां जावें, । संतचरणीं भावें रिघावया. ॥

तृष्णाकाळीं उदकें भेटी । पडे मिठी आवडीची. ॥ १ ॥
ऐसियाचा हो कां संग, । जिवलग संतांचा. ॥ २ ॥
मिष्टान्नाचा योग भुके, । म्हणतां चुके पुरेसें ॥ ३ ॥
**तुका** म्हणे, माते बाळा । कळवळा भेटीचा. ॥ ४ ॥

काय वाणूं आतां? न पुरे हे वाणी, । मस्तक चरणीं ठेवितसें. ॥ १ ॥

थोरींव सांडिली आपुली परिसें, । नेणे सिवों कैसें लोखंडासी. ॥ २ ॥
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, । देह कष्टविती उपकारें. ॥ ३ ॥
भूतांची दया हें भांडवल संतां, । आपुली ममता नाहीं देहीं. ॥ ४ ॥
**तुका** म्हणे, सुख पराविया सुखें, । अमृत हें मुखें श्रवतसे. ॥ ५ ॥

### पद.

संत दयाळ कसे ? । राजा रंक जयां सरिसे. ॥ ध्रु० ॥
देउनि भेटी, तोडिति माया, । नेउनि दाविति निजपदठाया. ॥ संत० ॥
श्रवणीं पाजुनि अमृतवाणी, । नेउनि दाविति चिन्मयखाणी. ॥ संत० ॥
**शिवरामा**चें अभिनव लेणें । लेवविलें मज पूर्णकृपेनें. ॥ संत० ॥

---

## १६. साधुच्छळाचें फळ.

### ओंव्या.

साकरेचें वृंदावनफळ केलें । कडू म्हणतां, तें स्वयें मुकलें, ।
तेवीं साधूचें कर्म निंदोनी बोले, । ते ते गेले अधःपाता. ॥ १ ॥

—एकनाथ.

संतांसी देतां संतोष, । त्यावरी संतोषे जगदीश, ।
संतांतें पावलिया क्लेश । नाशी जनदीश त्या समूळीं. ॥ १ ॥
घेतां संतांचें प्रसन्न वचन, । मनोभीष्ट दे त्या जनार्दन, ।
भक्तद्वेषियाचें हनन । श्रीनारायण पैं करी. ॥ २ ॥

—शुभानंद.

### गीति.

जें साधूंसि दिलें, तें आपण भोगील दुःख आमरण; ।
उदकीं पक्क घटासीं सुघटितहि करील काय आम रण ? ॥ १ ॥

करितां साधूच्छेद, स्वोच्छेदाचि होय, हो! यश न राहे, ।
खल कामकोपलोभ च्छळिति बळें, करुनियां वश नरा, हे. ॥ २ ॥
व्यसनीं न पडेल कसा, व्याघ्रबिळीं जो मदांध ओतु निघे? ।
कीं पद्मराग मानुनि जो पदरीं विंगळाशि ओतुनि घे? ॥ ३ ॥
जरि कोंडिला तरि हिरा, स्तविलाचि शिरीं चढे न शिरगोळा ।
तो हारवील निजशिर, जो खळ करणार साधु शिर गोळा. ॥ ४ ॥
काय नृसिंहोपासक, कीं शरभमनुज्ञ, भील वेताळा; ।
जंभें उगारिल्या कीं वज्रकर स्वर्पती लवे ताळा? ॥ ५ ॥
यदनुग्रहें अनळविधु ज्या दुःसह, त्याहि अंधकारा ती ।
धाकेल चंडकररुचि? किंवा कामासि अंधका राती? ॥ ६ ॥
सद्वृत्तीस खळाच्या धाकें न कदापि साधु सोडील; ।
चोरभयास्तव लोभी जन कोण बरें धनें न जोडील? ॥ ७ ॥
धरिलें नसेचि चित्तीं कलिचें भय एक वल्ल भागवतें; ।
जिंकावें केंवि कधीं स्वाहेच्या प्राणवल्लभा गवतें? ॥ ८ ॥

—मोरोपंत.

## श्लोक.

साधूंच्या लंघनीं होतो नीचाचा घात रोकडा ।
बोकडा मारक नव्हे मेरूचा काय हो ! कडा? ॥ १ ॥
होतोचि प्राप्त मृत्यु स्वभुजबळमदें लंघितां अर्णवातें;
पावे, गर्वें उडे, तो पतन, उडविलें ज्यापरी पर्ण वातें; ।
ज्या दुष्टें सज्जनांचा अकरुणहृदयें चिंतिला घात, ‘ लागा ।
पाठीं त्या खा,’ न साधू म्हणति, परि अघीं तो मुखीं घातला गा. ॥२

अत्युग्र ब्रह्मशापादिकहि हरिजनां ताप नेदीच कांहीं,
जो कोणी देवदासच्छळक खळ, तया रक्षिता अन्य नाहीं; ।
रक्षी साधूंचि, येतां शरण, निपटुनी त्यागितां उद्धतत्व ।
ज्ञाते हें अंबरीषक्षितिपतिचरितीं पाहती शुद्ध तत्व. ॥ ३ ॥

—मोरोपंत.

## अभंग.

संतांचे गुणदोष आणितां या मना, । केलिया उगाणा सुकृताचा. ॥१॥
पिळोनियां पाहे पुष्पाचा परिमळ, । चिरोनी केळी केळ गाढव तो.॥२॥
तुका म्हणे, गंगे अग्नीस विटाळ । लावी, तो चांडाळ दुःख पावे. ॥३॥

दुर्जनाची जाती, । त्याचे तोंडीं पडे माती. ॥ १ ॥
त्याची बुद्धि त्यासी नाडी, । वाचे अनुचित बडबडी. ॥ २ ॥
पाहे, संतांकडे । दोषदृष्टी पाहे, भिंड. ॥ ३ ॥
उंचानिंच नाहीं, । तुका म्हणे, खळा कांहीं. ॥ ४ ॥

भुंकोनियां सुनें लागे हस्तीपाठी, । होऊनी हिंपुटी दुःख पावे. ॥१॥
काय त्या मशकें तयाचें करावें ? । आपुल्या स्वभावें पीडतसे. ॥२॥
मातलें बोकड विटवी पंचानना, । घेतलें मरणा धरणें तें. ॥ ३ ॥
तुका म्हणे, संतां पीडितील खळ, । घेती तोंड काळें करूनियां. ॥४॥

संतांसी क्षोभवी कोण्याही प्रकारें, । त्याचें नव्हे बरें उभय लोकीं.॥१॥
देवाचा तो वैरी शत्रु दावेदार, । पृथिवीही थार नेदी तया. ॥ २ ॥
संतांपाशीं ज्याचा नुरेची विश्वास, । त्याचे जाले दोष बळिवंत. ॥३॥
तुका म्हणे, क्षीर वासराच्या अंगें । किंवा धांवे लागे विषमें मारू. ॥४

हरिजनाची कोणां न घडावी निंदा, । साहात गोविंदा नाहीं त्याचें.॥१॥

रूपा घेऊनीयां, धरी अवतार, । भक्तां अभयंकर, खळां कष्ट. ॥ २ ॥
दुर्वास हा छळों आला अंबरीषी, । सुदर्शन त्यासी जाळीत फिरे. ॥३॥
द्रौपदीच्या क्षोभें कौरवांची शांती । होउनी श्रीपति साह्य केलें. ॥४॥
न साहेची बभ्रु पांडवां पारिखा, । घुडविला सखा बळिभद्र. ॥ ५ ॥
तुका म्हणे, अंगीं राखिली दुर्गंधी । अश्वत्थामा वधी पांडवपुत्रां. ॥६॥

---

## १७. साधुरीति.

### ओंव्या.

कुंजरदशन वाढतां पुढें । ते लोटितां नव्हती मागिलीकडे; ।
सज्जनवचन तेणें पाडें । पालटों नेणे कल्पांतीं. ॥ १ ॥
जो सन्मानें न पावे हर्षा, । अवमानें न ये संतापरोषा, ।
त्या देवलोकीं पवित्र पुरुषा । पूजा पावे विशेष. ॥ २ ॥
गेलें हृदयीं नाठवावें, केलें मुखीं न बोलावें, ॥
सत्य सर्वथा न सांडावें, । साधुवर्तन या नांवें. ॥ ३ ॥

—मुक्तेश्वर.

सज्जनाचा स्वभाव पूर्ण, । दीनदयाळ चातकघन, ।
अनाथासी देखतां जाण । घेती धावोनी उचलोनी ॥ १ ॥
गोड लागे निजमानसीं । तें वंचोनी स्वगोत्रासी, ।
नेदोनी स्त्रीपुत्रासी । अनाथासी अर्पीत. ॥ २ ॥
सज्जनाचें मुख्य लक्षण, । ब्रह्मस्वरूप स्वयें आपण ।
जग देखणें ब्रह्मपूर्ण, । कपटचिन्ह तो नेणे. ॥ ३ ॥

बाळकाच्या अति प्रीती । माउली शौचाशौच न विचारिती, ।
प्रेमें उचलोनी खांदीं घेती, । मळ क्षाळिती निजकरीं. ॥ ४ ॥
परी तेथेंही एक नवल । जननीजनकें धुतले मळ, ।
ते पुनरपि होय कश्मल, । सज्जनाचे करकमळ ते सबाह्य मळ क्षाळिती.
सज्जनाचा हात माथां । पडतां झाली पतिव्रता, ।
ब्रह्मादिक निजमाथां । वंदी तत्वतां पूज्यत्वें. ॥ ६ ॥
परीस फोडावया जाण । सबळ बळें हाणिती घण ।
त्यासी करितां सुवर्ण । न लगे क्षण तत्वतां. ॥ ७ ॥
तरी परीस बापुडें तें किती ? । लोहाचे ठायीं सुवर्णस्फूर्ती, ।
परीस न करीच निश्चिती, । निज स्थिति वंचिली. ॥ ८ ॥
तैसा नव्हेची चंदन, । अंगवात झगटतांची पूर्ण, ।
उद्यान केलें आपणासमान, । न्यूनपूर्ण असेना. ॥ ९ ॥
खैर घामोडे समग्र, । वेहळकटी टाकिली अत्युग्र, ।
आदि करोनी पांगार । जाले समग्र चंदन. ॥ १० ॥
आणिक गुण अलौलिक, । जो छेदावया आला, देख, ।
त्यासी परिमळ अधिक, । जाळित्या देख तयाहोनी. ॥ ११ ॥
तेवीं सज्जनाचें लक्षण, । छळें द्वेषभावें पूर्ण, ।
जो आला, तयासी जाण, । त्यासी समाधान सारखेंची ॥ १२ ॥
सूर्याचें सामर्थ्य गगनीं । स्वयें नेणे दिनमणी, ।
तें जाणतसे कमळिणी । सुखविकासिनी पैं झाली. ॥ १३ ॥
चुंबकाची चाळकशक्ति । स्वतां नेणें निजस्थिती, ।
जडें लोहें सुखेंची जाणती । ते चळण पावती दर्शनें ॥ १४ ॥

चंद्रकिरणांची अमृतधार । स्वतां नेणे दिनकर, ।
सेवूनी जाती चकोर, । दर्शनें अपार आनंद. ॥ १५ ॥
परासी न द्यावें दुःख, । परपीडेपरी नाहीं पातक, ।
यालागीं साधु सज्जन लोक । प्राणांतीं दुःख न देती. ॥ १६ ॥
जो प्राणी जन्मा आला, । तो गर्भींच जाण मेला, ।
या कारणें साधुमेळा । निःसंग होउनी राहतसे. ॥ १७ ॥
नद्या पर्जन्यें भरोनी येती, । तेणें सिंधु प्रवाहेना क्षितीं, ।
उष्णकाळीं नद्या सुकती । तेणें अपांपती आटेना. ॥ १८ ॥
नाना सरितांचे खळाळ । आणूनी घालिती सबळ जळ, ।
तो तिळभरी नव्हे डहूळ, । अति निर्मळ निजांगें. ॥ १९ ॥

—एकनाथ.

## गीति.

सुकृतातेंचि स्मरति, न कुकृतातें, याचि साधुरीतीची ।
रुचि रसिका, न सुधेची, कीं केवळ अल्प माधुरी तीची. ॥ १ ॥
छळकासि कवि न शापिति, देतें जड कनक काय हो ! गाळी ? ।
पाळी जो त्यासि मधुर इक्षु, तसा त्याहि अदय जो गाळी. ॥ २ ॥
सदय हितकाम जो, त्या असमंजस कर्म पाहवेना, गा ! ।
कैसें लावूं द्यावें पद, ज्या लंघन न साहवे नागा ? ॥ ३ ॥
रवि न ढळेचि, गिळी परि उगळी खळ मळिन मंद राहु, टळे; ।
गुर्वापदेंहि साधु न भी, न चळे जेंवि अचळ वाहुटळें. ॥ ४ ॥
सुखदुःखप्राप्तीनें कवि हर्षविषाद लेश न धरीती, ।
वर्षावर्षीं जेवीं वृद्धिक्षय सिंधु; हेचि बुधरीती. ॥ ५ ॥

पंकांत पद्म न मळे; काकाच्या दुर्गुणा शिवे न पिक, ।
चंदन परगंध न घे, होय तृणामाजि तृणचि काय पिक ? ॥ ६ ॥
विसरति अपकारातें, उपकारातेंचि साधु आठविती. ।
बा ! सोशितां न सा विति होय वपु, न सोशितां न आठ विती. ७
स्वकरें कापुनि देतां निजमांसहि, उबगला न शिबि कांहीं. ।
सुख साधुरीतिहीं जें दिधलें श्रांतास, तें न शिबिकांहीं. ॥ ८ ॥
साधू मन न, परहिताचरणीं घडल्याहि मरण, तळमळवी. ।
मदकर्दमीं न सन्मति तिळभर डावेंहि चरणतळ मळवी. ॥ ९ ॥
रक्षावाचि, उपेक्षा व्यसनीं अरिचीहि न करिती संत; ।
पाहों नयेचि, अंगीं बळ असतां, दीन जंतुचा अंत. ॥ १० ॥
दुष्ट जना, शरणागत व्हावें साधूंसि, हें रुचेनाच; ।
दैवें रुचतां, न रुचे स्वगुण; रुचे सत्कथा, रुचे नाच. ॥ ११ ॥
देते जरि भलत्याला भलतें, जें ज्यास अर्थजात रुचे, ।
तरि कां कवी न म्हणते कीं, 'संत सखे समुद्रजा तरुचे'? ॥ १२ ॥
संत विवेकी, करिती, पाहुनि अधिकार, जी दया साजे, ।
ऐसे प्रसाद त्यांचे, देती अन्योन्य न प्रयाश जे. ॥ १३ ॥
वेंचिति परोपकारीं सर्वस्व, अनित्य जीवितहि, संत; ।
वचनाची काय कथा ? जोडिति सयश अनंत मतिमंत. ॥ १४ ॥

—मोरोपंत.

## श्लोक.

वाणी खरी, दान बरें, अहिंसा,
नसे परद्रव्यसतीपिपासा, ।

दया, अतृष्णा, नतिभाव जो कां,
    सन्मार्ग हा घोपट सर्व लोकां. ॥ १ ॥
विपत्कालीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें,
    सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवे, ।
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्या व्यसन जें,
    तयांचे हे स्वाभाविक गुण सहा, सत्पुरुष जे. ॥ २ ॥
वानोत, निंदोत, सुनीतिमंत,
    चलो, असो वा, कमला घरांत, ।
हो मृत्यु आजीच, घडो युगांतीं,
    सन्मार्ग टाकूनि भले न जाती. ॥ ३ ॥
सुनीतिपथ सेवणें, मलिन कर्म मानेचना,
    घडो मरण, नावडे खलजनांप्रति प्रार्थना, ।
विपत्तिसमयीं परी प्रकटवीचना दीनता,
    भल्याविण असें असिव्रत करूं शके कोणता ? ॥ ४ ॥
ज्यांचीं देहमनें, तशींच वचनें, पुण्यामृतें ओतिलीं;
    कीं जेंहीं स्वकृतोपकारविभवें सर्वत्र विस्तारिलीं, ।
लोकांचे परमाणुतुल्य गुण जे मेरूपरी वानिती,
    चित्तीं तोषहि पावती; सुजन ते नेणों किती नांदती ? ॥५॥
संपत्काळीं कोवळीं सज्जनांचीं,
    होती चित्तें जाति पंकेरुहाचीं ।
आपत्काळीं शैलही आदळो कां,
    धाकेना जें गाजवी धैर्य डंका. ॥ ६ ॥

दे दान गुप्त, उपकार करी, न बोले,
मानी प्रमोद, जरि मान्य घरास आले, ।
दावी न गर्व विभवें, गुण घे पराचे,
खड्गाग्रतुल्य विषम व्रत हें भल्याचें. ॥ ७ ॥
कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें,
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें, ।
जाणोनि हें, सुजन ज्या दुबळीक आली,
त्याशीं कदा न करिती सहसा टवाळी. ॥ ८ ॥
आली जरी कष्टदशा अपार,
न टाकिती धैर्य तथापि थोर, ।
केला जरी पोत बळेंचि खालें,
ज्वाळा तरी ते वरती उफाळे. ॥ ९ ॥
करीं साजे त्याग, श्रवणयुगलीं सच्छ्रवण जें,
मुखीं सत्य, स्वच्छाचरण विलसे, शौर्यहि भुजे, ।
स्वशीर्षें थोराला नमन विभवावांचुनि, पहा,
भल्याचा कीं स्वाभाविक शुभ अलंकार विधि हा. ।१०।
—भर्तृहरी.

## १८. मूर्खपण.

### ओंव्या.

मी श्रेष्ठ, श्रेष्ठाचा कुमर, । धरी विद्येचा अहंकार, ।
सुज्ञ सुविद्या न करी नर, । तो शतमूर्ख जाणावा. ॥ १ ॥

साखरेतें स्वादिष्ट करणें, । कर्पूरातें सुवास देणें, ।
चतुर पुरुषातें शिकविणें, । हेची नेणीव सांगतिया. ॥ २ ॥
नलगे अवज्ञेचा पावो, । तंवची आसनीं सेविजे रावो, ।
सोसोनी मानहानीचा घावो । लाभ इच्छी तो महामूर्ख. ॥ ३ ॥
कारणेंवीण वाढवी द्वेष, । ऐश्वर्य नसतां म्हणवी ईश, ।
पुरुषांमाजी अधम पुरुष, । ऐसें ज्ञाते बोलती. ॥ ४ ॥
विद्यामदें वाढवी मान, । तोची फळे होवोनी अवमान, ।
निस्तेज म्हणतां हुताशन । प्राणनाश पतंगा. ॥ ५ ॥
सिंहासंमुख मुक्ताफळें । दावितां भंगी कुंभस्थळें, ।
कस्तूरीचेनी परिमळें । हरिण व्याधा हिणावी. ॥ ६ ॥
मद्यप्याहातीं नागवें खड्ग । झाडितां निवटी आपलें आंग, ।
तेवीं अहंकार मिरवितां चांग, । मूळ होय नाशातें. ॥ ७ ॥

—मुक्तेश्वर.

एकग्रासीं आवश्यक । आपुलाची जाणे स्वार्थ एक, ।
एक भोजनीं मानी सुख । तोची मूर्ख पापात्मा. ॥ १ ॥
सर्व काळ श्रद्धारहित, । नेणे धर्मनिरोपणपंथ, ।
कथाश्रवणीं नाहीं चित्त । तोची मूर्ख दुरात्मा. ॥ २ ॥
स्वधर्म आपला सांडोन, । होवोनी वर्ते विषयाधीन, ।
परस्त्री परधनीं घाली मन । तोची मूर्ख दुरात्मा. ॥ ३ ॥
जेथ अविद्याकल्पना, । आवडी नसे ईश्वरभजना, ।
नायके श्रेष्ठांच्या वचना । तोची मूर्ख दुरात्मा. ॥ ४ ॥
सदा प्रवृत्ति कल्पी चित्तीं, । विषय सेवितां अतृप्ती, ।

चित्तीं वसे विषयभक्ति । तोची मूर्ख दुरात्मा. ॥ ५ ॥
स्पर्धा करी बळिष्ठातें, । बळ न तुळे आपुल्या चित्तें, ।
अकारण उदित होय मरणातें, । तोची मूर्ख दुरात्मा. ॥ ६ ॥
साधुगुरूची निंदा करी, । देवब्राह्मणद्वेष करी, ।
मिथ्याभिमान वाहे शरीरीं, । तोची मूर्ख दुरात्मा. ॥ ७ ॥
सांडोनी अनादि कुळाचार, । आचरे परधर्म अनाचार, ।
परनिंदानुवादें गाजे वक्र, । तोची मूर्ख दुरात्मा ॥ ८ ॥
सायासें एक मिळवीतसे, । लाधलें तें सर्वा सरिसें, ।
तेथ देहलोभ करी विशेषें, । तोची मूर्ख दुरात्मा. ॥ ९ ॥
भक्ष्य भक्षीत पंथीं चाले, । हांसत हांसत मुखें बोले, ।
दोघे बोलतां ऐकों चाले, । तो शतमूर्ख दुरात्मा ॥ १० ॥
श्रेष्ठीं वर्जितां करी दुष्कृती, । कर्म प्रतिष्ठी अनाहुतीं, ।
जपतपकर्मीं अश्रद्धा हितीं, । तोची मूर्ख दुरात्मा ॥ ११ ॥
आपण प्रतिष्ठित म्हणोन, । करी अन्याय आचरण, ।
धर्मनीति करी खंडण, । तोची पाषाण दुरात्मा. ॥ १२ ॥
आपणामाजीं दैवेंकरून । येकदां झाला संपन्न, ॥
त्यावरी अनहित कल्पी मन, । तोची पाषाण पापात्मा. ॥ १३ ॥
येवोनियां नरशरीरीं । आपुली आपण ओळखी न करी, ।
विषयीं लोळे श्वानापरी । तो निर्धारीं दुरात्मा. ॥ १४ ॥

—शुभानंद.

आद्यंत न पाहतां अर्थ, । द्वेषें दोष ठेवी अकस्मात, ।
जाणिजे तो शतमूर्ख, । नव्हे पंडित विवेकी. ॥ १ ॥

केवढी खळ आहे आपुली बुद्धि, । महाचतुराचे ग्रंथ निंदी; ।
नसता दोष ठेवी कुबुद्धि, । तो पडेल बंदीं यमाचे. ॥ २ ॥

—श्रीधर.

## गीति.

जिष्णु म्हणे न वहातां जाताति महाजनांत दाटूनी, ।
बोलतिहि न बोलवितां, ते घडले मूर्खकोटि वाटूनी ॥ १ ॥
मुग्धपणें पंगु म्हणे जरि, 'करितों हेमभूधरारूढ'; ।
तद्विश्वासें जो जन परिकर बांधील, तो खरा मूढ. ॥ २ ॥
विद्या नसोनि उद्धत, धन नसतां जो उदारपण वाहे, ।
अर्थासि नीच कर्मे जो संपादावयासि जन पाहे. ॥ ३ ॥
नसतां लाभ यशाचा दाटून करी परार्थ जो यत्न, ।
मित्रार्थी कपट करी, तो साक्षान्मूढजनशिरोरत्न. ॥ ४ ॥
मित्रत्व दे अमित्रा, जो मित्रद्वेष दुष्ट कर्म करी, ।
'तो मूर्ख' असें म्हणती पुरुष, परीक्षा कळे जयांस बरी. ॥ ॥

—मोरोपंत.

## अभंग.

माकडें मुठी धरिले फुटाणे, । गुंतले ते नेणे हात जेथें. ॥ १ ॥
काय तो तयाचा लेखावा अन्याय ! । हित नेणे काय आपुलें तें ! ॥ २
शुकें नळिकेशीं गोंवियेले पाय, । विसरोनी जाय पक्ष दोन्ही. ॥ ३ ॥
तुका म्हणे, ऐक, ऐसे पशु जीव, । न चले उपाव कांहीं तेथें. ॥ ४ ॥

## ओंव्या.

समर्थावरी अहंता, । अंतरीं मानी ममता, ।
सामर्थ्येंवीण करी सत्ता । तो एक मूर्ख. ॥ १ ॥

अकारण हास्य करी, । विवेक सांगतां न धरी, ।
जो बहुतांचा वैरी, । तो एक मूर्ख. ॥ २ ॥
घरीं विवेक उमजे, । आणि सभेमध्यें लाजे, ।
शब्द बोलतां निर्बुजे, । तो एक मूर्ख. ॥ ३ ॥
नायके त्यास शिकवी, । वडिलांसी जाणीव दावी, ।
जो सात्विकासी गोंवी, । तो एक मूर्ख. ॥ ४ ॥
आपणाहून जो श्रेष्ठ, । तयासीं अत्यंत निकट, ।
शिकवणीचा मानी वीट, । तो एक मूर्ख. ॥ ५ ॥
आपणासी जेथें मान, । तेथें अखंड करी गमन, ।
रक्षूं नेणे मानाभिमान, । तो एक मूर्ख. ॥ ६ ॥
विचार न करितां कारण, । दंड करी अपराधावीण, ।
स्वल्पासाठीं जो कृपण, । तो एक मूर्ख. ॥ ७ ॥
घरींच्यावरी खाय दादा, । बाहेर दीन बापुडा, ।
ऐसा जो कां मूढ वेडा, । तो एक मूर्ख. ॥ ८ ॥
स्वयें नेणे परोपकार, । उपकाराचा अनुपकार, ।
करी थोडें बोले फार, । तो एक मूर्ख. ॥ ९ ॥
विद्या, वैभव, ना धन, । पुरुषार्थ, सामर्थ्य, ना मान, ।
कोरडाच वाहे अभिमान, । तो एक मूर्ख. ॥ १० ॥
क्रोध, अभिमान, कुबुद्धि, । आपण आपणांसी वधी, ।
जयासी नाहीं दृढबुद्धि, । तो एक मूर्ख. ॥ ११ ॥
आदरेंवीण बोलणें, । न पुसतां साक्ष देणें, ।
निंद्य वस्तु अंगीकारणें, । तो एक मूर्ख. ॥ १२ ॥

समर्थासी मत्सर धरी, । अलभ्य वस्तूचा हेवा करी, ।
घरींच्या घरीं करी चोरी, । तो एक मूर्ख. ॥ १३ ॥
सांडोनियां जगदीशा, । मनुष्याचा मानी भरोंसा, ।
सार्थकेंवीण वेंची वयसा, । तो एक मूर्ख. ॥ १४ ॥
संसारदु:खाचेनी गुणें, । देवासी गाळी देणें, ।
मैत्राचें बोलणें उणें, । तो एक मूर्ख. ॥ १५ ॥
बहुत दिवसांचे सेवक । त्यागून, ठेवी आणीक, ।
ज्याची सभा निर्नायक, । तो एक मूर्ख. ॥ १६ ॥
अनीतिनें द्रव्य जोडी, । धर्म, नीति, न्याय सोडी, ।
संगतीचें मनुष्य तोडी, । तो एक मूर्ख. ॥ १७ ॥
आपले अर्थ दुसऱ्यापाशीं, । आणि दुसऱ्याचे अभिलाषी, ।
पर्वत करी हीनासी, । तो एक मूर्ख. ॥ १८ ॥
कलह पाहत उभा राहे, । सोडवीना, कौतुक पाहे, ।
खरें असतां खोटें साहे, । तो एक मूर्ख. ॥ १९ ॥
आपुलें कार्य होय तोंवरी, । बहुसाल नम्रता धरी, ।
पुढिलांचें कार्य न करी, । तो एक मूर्ख. ॥ २० ॥

—रामदास.

---

## १९. उद्योग व आळस.

### ओंव्या.

वेळेसारखें यश अपेश, । याचा न कांहीं कीजे क्लेश, ।
अनालस्यें दिवसेंदिवस । वृद्धि कीजे बळाची. ॥ १ ॥

वारंवार पडतां क्षितीं, । शेवटीं कीटक चढे भिंती, ।
खणत खणत पर्वतीं, । खचोनी जाय एकदां. ॥ २ ॥
शेळीगळींचे गळस्तन, । तेवीं पुरुष करणीहीन. ।
स्मशानींचें भग्न भाजन, । जळो जिणें तयाचें. ॥ ३ ॥

—मुक्तेश्वर.

जय अथवा पराजय । महावीरांसी पडे हा समय, ।
पुरुषें पुरुषार्थ सांडूं नये, । करावा उपाय मागुती. ॥

—श्रीधर.

जैसा एकचक्र रथ । क्रमण करावया नव्हे पंथ, ।
तैसा देवें नेमस्त । प्रयत्नावीण निर्मिला. ॥ १ ॥
प्रयत्न म्हणजे दुजें चक्र, । लागतां गमनीं झाला सत्वर, ।
यत्नाविना दैव थोर । परी तें होय निर्फल. ॥ २ ॥
उद्योग केल्याविना कांहीं । तोची प्रेत जिता पाहीं, ।
अपायीं अथवा उपायीं । करणी बापा! त्यागूं नये. ॥ ३ ॥
कर्तृत्वहीन नर संसारीं, । नव्हे पुरुष तो नारी, ।
जंववरी प्राण वर्ते शरीरीं । तंववरी करणी न त्यागिजे. ॥ ४ ॥
मी मरेन हें सांडी मनीं, । सती जैशी पडे यज्ञीं, ।
तैसा देह हुताशनीं । संसारीं लोटी कर्तृत्वें. ॥ ५ ॥
तेव्हां तया आलेया हाण, । ते नव्हे हाणी, साधिलें पुण्य, ।
सहजें सफळ झालेया यत्न, । सर्व संपत्ति सांपडे. ॥ ६ ॥

—शुभानंद.

## श्लोक.

आलस्य जें कार्यविघातकारी, । असूं नये तो रिपु या शरीरीं; ॥
उद्योग सद्बंधु तया न टाकीं । त्या सेवितां पावसि सौख्य लोकीं. ॥ १ ॥

—भर्तृहरी.

## गीति.

अश्वतर म्हणे, "सुत हो! जरि जन जाणुनि अशक्य कर्मातें ।
न करितिल, अनुद्योगें पावतिल न कार्यसिद्धिशर्मातें. ॥ १ ॥
पुरुषें आरंभावें कर्म, न पौरुष कदापि सोडावें ।
कर्मफळ जसें दैवें, स्पष्ट तसें पौरुषेंहि जोडावें. ॥ २ ॥
उत्साहें वीरांहीं, करुनि विकत्थन, यथेच्छ गर्जावें; ।
फल न दिसतां बुधांहीं काय प्रारब्ध कर्म वर्जावें?" ॥ ३ ॥
"स्वामी! वैरी कोण?" "च्छात्रा! तो शत्रु, जो अनुद्योग, ।
ज्या उद्योगाभावें पावति विलयास सर्व सुखभोग." ॥ ४ ॥

—मोरोपंत.

## ओंव्या.

आळसियातें नाहीं सुख, । उभयलोकीं पावे दुःख, ।
आलस्यें कर्म निरर्थक । जन्मा आलेया संसारीं. ॥ १ ॥
आलस्यें वित्तीं होय नाश, । इहत्रीं नाहीं सुख तयास, ।.
आळसें मुक्तिपंथ वोस, । निरयवास सहजेंच. ॥ २ ॥

—शुभानंद.

## अभंग.

कष्ट करितां मनीं विटे, । तरी तो कळेल शेवटें. ॥ १ ॥
कष्टें उदंड आटोपावें, । तरी मग पुढें सुखी व्हावें. ॥ २ ॥

असतां परधन वेडें, । काय निवेल बापुडें ? ॥ ३ ॥
शहाणे उदंड कष्टती, । वडील उपकारें दाटती. ॥ ४ ॥
बहुत राखिलें लौकिक, । त्यांचें जिणें अलोकिक. ॥ ५ ॥
ज्यास त्यास पाहिजे तो, । जनीं वाटपास येतो. ॥ ६ ॥
मनोगत जाणे सूत्रें, । जेथें तेथें जगमित्रें. ॥ ७ ॥
न सांगतां काम करी । ज्ञान उदंड विवरी, ॥ ८ ॥
स्तुति कोणाची न करी, प्राणिमात्रा लोभ करी, ॥ ९ ॥
कदा विश्वास मोडिना, । कोणी माणूस तोडिना, ॥ १० ॥
जनीं बहुतची साहतो, । कीर्तिरूपेंची राहतो, ॥ ११ ॥
**दास** म्हणे, नव्हे दुःखी । आपण सुखी लोक सुखी. ॥ १२ ॥

आळसें पिंडाचें पालन, । परी अवघें नागवण. ॥ १ ॥
देह केलें तैसें होतें, । वेंचलें जे करितां तें. ॥ २ ॥
शक्ति आहे तों करावें, । विश्व कीर्तीनें भरावें. ॥ ३ ॥
पुण्यवंत तो सापेक्षी, । आळसी महालोकीं पापी. ॥ ४ ॥
आपलाची घात करी, । सदा कठोर वैखरी. ॥ ५ ॥
माणुस राजी राखों नेणे, । त्यासी न मानिती शहाणे. ॥ ६ ॥
गुणें माणुस भेगतें, । अवगुणें थीतें जातें. ॥ ७ ॥
**दास** म्हणे, भला भला । जेथें तेथें पवाडा केला. ॥ ८ ॥

सुंदर आळसाची बाईल, । पुढें काळ रे खाईल. ॥ १ ॥
ज्याचे वडील आळसी, । कोणें शिकवावें तयासी ? ॥ २ ॥
घरीं खाया न जेवाया, । नाहीं लेया, न नेसाया. ॥ ३ ॥

यत्नी उदंडची खाती, । आळसी उपवासीं मरती. ॥ ४ ॥
**दास** म्हणे, सांगों काय. । होता प्रगट उपाय. ॥ ५ ॥

## ओंव्या.

जो जेथें उपजला, । तो तेथें व्यवसायी उमजला, ।
तयास लोक म्हणती, 'भला । कार्यकर्ता.' ॥ १ ॥
जाणता तो कार्य करी, । नेणता कांहींच न करी, ।
जाणता तो पोट भरी, । नेणता भीक मागे. ॥ २ ॥
हें तों प्रकटची असे, । जनीं पाहतां प्रत्यक्षची दिसे, ।
विद्येविण करंटा वसे, । विद्या तो भाग्यवंत. ॥ ३ ॥
'आपुली विद्या न सिकसी, । तरी काय भीक मागसी?' ।
जेथें तेथें बुद्धि ऐसी । वडिलें सांगती. ॥ ४ ॥
वडील आहे करंटा, । आणि समय होय धाकुटा, ।
कां जो विद्येनें मोठा, । म्हणूनियां. ॥ ५ ॥
विद्या नाहीं, बुद्धि नाहीं, । विवेक नाहीं, साक्षेप नाहीं, ।
कुशलता नाहीं, व्याप नाहीं, । म्हणोन प्राणी करंटा. ॥ ६ ॥
साक्षेप करितां कष्टती, । परंतु पुढें सुखाउनी खाती, ।
जेविती, सुखी होती, । यत्नेंकरुनी. ॥ ७ ॥
आळस उदास नागवणा, । आळस यत्नबुडवणा, ।
आळसें करंटपणाच्या खुणा । प्रकट होती. ॥ ८ ॥
म्हणोन आळस नसावा, । तरीच पाविजे वैभवा, ।
अत्रीं परत्रीं जीवा । समाधान. ॥ ९ ॥

ज्याचा जो व्यापार, । तेथें असावें खबरदार, ।
दुश्चितपणें तरी पोर । ओढा लावी. ॥ १० ॥
चुके, ठसे, विसरी, सांडी, । आठवण झालिया चरफडी, ।
दुश्चित आळसाची रोकडी । प्रचीत पहा. ॥ ११ ॥
सदैवपणाचें लक्षण । रिकामा जाऊं नेदी क्षण, ।
प्रपंचव्यवसायाचें ज्ञान । बरें पाहे. ॥ १२ ॥
कांहीं मेळवी, मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी, ।
शरीर कारणीं लावी । कांहीं तरी. ॥ १३ ॥

—रामदास.

---

## २०. षड्रिपु.

### श्लोक.

तृष्णेतें निवटीं, क्षमेस जवटीं, गर्वादिकांतें पिटीं,
सत्यातें उमटीं हृदंबुजपुटीं, सेवीं दया गोमटी, ।
विद्वत्स्नेहतुटी नको करुं, भले त्यांच्या गुणांतें लुटीं,
वंशीं कीर्तिवटी उभारिं. अरिषड्वर्गासि तूं आपटीं. ॥ १ ॥
कांताकटाक्षशर हे रुतती न ज्याला,
तावी न कोपज हुताशनही जयाला, ।
ज्याच्या मनीं न जडती विषयादि पाश,
तो धीर चिंतित जगत्रय सावकाश. ॥ २ ॥

—भर्तृहरी.

## ओंव्या.

काम, क्रोध, मद, मत्सर । साधक त्यांसी राखिती दूर; ।
विवेकबळें त्यांचा संहार । करूनी, विजयी मग होती. ॥ १ ॥
अनेक गुणांच्या राशी । एक मोह विभांडी क्षणार्धेसीं, ।
कीं क्रोध संचरतां मानसीं । तयांचिया कोटी विनाशती. ॥ २ ॥

—श्रीधर.

उदंड तपस्वी असेल आथिला, । आणि कामक्रोधां वरपडा झाला,।
तरी तो निजसुकृतासी मुकला । यथार्थ बोला मानिजे. ॥ १ ॥
अथवा ऋद्धिसिद्धींची लोलंगता, । तयासी लागली जरी अवचिता,।
तरी अंतरला परम स्वार्था, । झाला गुंता तयासी. ॥ २ ॥

—महीपति.

आडमार्गें गाई धांवती, । नाना कडे कपाटीं रिघती, ।
तृष्णेच्या खळ्यामाजीं पडती । कदा न सरती माघारा. ॥ १ ॥
वासनेच्या जाळ्या थोर, । त्यांत तोंडें घालिती वारंवार, ।
तेथें कामक्रोधादि किरडें अपार । कडकडोनी डंखिती. ॥ २ ॥
द्वेष, गर्व, मद, मत्सर, । हींच सावजें भयंकर; ।
विकल्प गुल्में अति घोर । निर्गम नोहेच तेथोनी. ॥ ३ ॥
निंदेचे बोरबडती कांटे, । नाना कुतर्क आड फांटे, ।
त्रिविध तापाचे चपेटे, । भयंकर वणवा हा. ॥ ४ ॥

—श्रीधर.

## गीति.

वायांचि गर्व धरिती, किति, 'आपण जिंकिल्या दिशा' म्हणती; ।
न जिणुनि देहींचे जे लाविति कामादि चोर सा खणती. ॥ १ ॥

कामें, कोपें, लोभें नागविले अमित यांस जे भुलले. ।
यांच्या कुदृष्टिपातें तेजस्वी पुरुषहीरही उलले ॥ २ ॥
कामी, क्रोधी, लोभी प्राणी तो विषय सेवुनीच मरे; ।
यांसम नसतीच, जरी गमती हे उग्र दहन, विष, यम रे! ॥ ३ ॥
बा! कोप, लोभ, शठता, असताग्रह, पिशुनता, कुटिलभाव, ।
उद्वेग, दंभ. यत्नें झोडीं, जोडीं महाजनीं ठाव. ॥ ४ ॥
व्याघ्रवृकहरिव्याळप्रभृतिंचा जो समूह हानिकर, ।
त्यांहूनि कामकोपप्रमुखांचा निपट दुष्ट हा निकर. ॥ ५ ॥
कामाची, कोपाची, ज्यांहीं केली जपोनि आज्ञा, ते ।
चुकले, स्वहिता मुकले, त्यांतें पाहोनि म्हणति 'हा!' ज्ञाते. ॥ ६ ॥
कामा, क्रोधा, लोभा, अनुसरतां लोक फार बा! ठकले, ।
न करावा सद्वेष, स्वहिता देऊं नयेचि पाठ, कळे! ॥ ७ ॥
ढाळितिल, जाळितिल हिमहेममया कामकोपलोभनगा, ।
बा! तनया! वात न या पापांचा या पथांत शोधन, गा! ॥ ८ ॥
म्हणवूनि अनुसरावें सुज्ञें न क्रोध लोभ काममता, ।
पतनार्थ कां अहंता पोसावी? गा! तशीच कां ममता? ॥ ९ ॥
ज्या शापवर्षणादिक संस्कार, चढे गुणासि तोचि मणी; ।
यश सारिकाचि पावे, पंजरबद्धाहि काय हो! चिमणी? ॥ १० ॥
कामक्रोध तपाचे नाशक, या भिउनि अंतरायांतें, ।
जे सावधान वर्तति, धन्यपण तयांचि संतरायांतें. ॥ ११ ॥
हें ब्रह्मकर्म दुष्कर, संरक्षण तों सुदुष्करचि आहे, ।
कीं यांत च्छळ पुष्कळ, जो सावध तोचि शुद्ध यश लाहे. ॥ १२ ॥

—मोरोपंत.

## अभंग.

कामक्रोध आवरावे, । मदमत्सर वारावे. ॥ १ ॥
सांडोनियां कुलक्षणें, । शुद्ध धरावीं लक्षणें. ॥ २ ॥
लोभदंभांसी लुटावें, । मीपणासी आटोपावें. ॥ ३ ॥
विवेक वैराग्य विश्वास । धरणें, म्हणे **रामदास.** ॥ ४ ॥

## श्लोक.

नसे अंतरीं काम नानाविकारी,
उदासीन तो तापसी ब्रह्मचारी. ॥
निवाला मनीं लेश नाहीं तमाचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. ॥ १ ॥
मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धी,
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी. ॥
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. ॥ २ ॥
क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादें,
न लिंपे कदा दंभवादें विवादें. ॥
करी सूखसंवाद जो ऊगमाचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. ॥ ३ ॥
सदा आर्जवी, प्रीय जो सर्व लोकीं,
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी, ॥
न बोले कदा मिथ्यवाचा त्रिवाचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. ॥ ४ ॥

सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं,
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं. ॥
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. ॥ ५ ॥
नसे मानसीं दुष्ट आशा दुराशा,
वसे अंतरीं प्रेमपाशा विपाशा. ॥
ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा,
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. ॥ ६ ॥
दिनाचा दयाळू, मनाचा मवाळू,
स्नेहाळू, कृपाळू, जगीं दासपाळू. ॥
जया अंतरीं क्रोध संताप कैंचा?
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. ॥ ७ ।
अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना,
अती काम त्या राम चित्तीं वसेना. ॥
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा,
अती विषयी सर्वदा दैन्यवाणा. ॥ ८ ॥

—रामदास.

## पदें.

तोंवरि सुख नाहीं, सुख नाहीं, । सत्य सांगतों, पाहीं. ॥ ध्रुवपद ॥
विषयकामना बाधी, । तेथें कैंची होय समाधी? ॥ तोंवरि० ॥ १ ॥
संतां शरण रिघेना भावें, । तोंवरि मुक्ति कधीं त्या नोव्हे. ॥तोंवरि०॥२॥
भूतदया नाहीं ज्याला, । शिवदिन काय करील तयाला? ॥तोंवरि०॥३॥

फिरोनियां काय वण वण वण ? ॥ ध्रुवपद. ॥
गोड दिसे बहु रंग जनांप्रति, । अंतरिं उद्वस वन वन वन. ॥फिरो०॥१॥
तीर्थाटणें बहु केलीं, जरि ते । जागति षड्रिपु दण दण दण. ॥फिरो०॥२॥
पूर्णरंगपदिं शांति नये जरि, । कामज्वरें तनु फण फण फण. ॥फिरो०॥३॥

सावध सावध सावध मनुजा ! । निजरूपिं सावध रे ! ॥ ध्रुवपद ॥
हिताहित मना न विचारिसि कां ? । झांकुनि नेत्र सदा. ।
कामकर्दमीं लोळसि निशिदिनिं, । मानुनि सौख्यमदा. ।
वीज लवोनि सरे सुख तेंवी, । वेगिं घडे आपदा. ।
इंद्रियराम विराम पडे, मग । बोलसि राम कदा ?॥ सावध० ॥१॥
सिंह जळीं प्रतिबिंब विलोकुनि, । निरखुनि देत बुडी. ।
हंस गगनिंच्या तारा उदकीं, । घालित तेथ उडी. ।
मूढ कसा मृग नाभि उपेक्षुनि । हिंडत बुद्धि कुडी. ।
तेंवि सखा हरि सांडुनियां दुरि । फिरसी देशधडी. ॥ सावध० ॥२॥
इंद्रजाल मृगतोय तसें जग । दंभरसें विलसे. ।
स्वप्निं दिसे मज मत्त तुरंगम, । संभ्रम तेंवि दिसे. ।
क्रूर भवार्णवि कर्णधार गुरु, । आन उपाय नसे. ।
पूर्णरंग निज रामपदीं, मग । दुर्गम काय असे ? ॥ सावध० ॥ ३ ॥

## अभंग.

शांतीपरतें नाहीं सुख, । येर अवघेंची दुःख. ॥ १ ॥
म्हणउनी शांति धरा, । उतराल पैल तीरा. ॥ २ ॥
खवळलिया कामक्रोधीं, । अंगीं भरती आधिव्याधी. ॥ ३ ॥
तुका म्हणे, त्रिविध ताप । जाती मग आपेंआप. ॥ ४ ॥

गति अधोगति मनाची युक्ती, । मन लावी एकांतीं साधुसंगें. ॥ १ ॥
जतन तें करा, जतन तें करा, । धांवतसे सैरा ओढाळ तें. ॥ २ ॥
मान अपमान मनाचें लक्षण, । लावलिया ध्यान, तेंची करी. ॥ ३ ॥
तुका म्हणे, मन उतरी भवसिंधु, । करितसे बंधु चौऱ्यांशीचा. ॥ ४ ॥

---

## २१. कामादिकांचा सदुपयोग.

### गीति.

काम त्यागावा, जरि न त्यजवे सर्वथा तदीय जया, ।
तरि तोचि मुमुक्षेप्रति करिजे, कीं तीच होय ओखद या. ॥ १ ॥
सक्रोध हो अरिजनीं, स्वकलत्रीं हो सकाम तूं बापा ! ।
सकृप सलोभहि चित्तीं हो स्वजनांच्या हरावया तापा. ॥ २ ॥
हो द्वेषी पाखंडीं, साधुजनीं हो सराग तूं बा ! गा ! ।
दुर्मंत्रीं केवळ जड, पिशुनोक्तीं बधिर हो महाभागा ! ॥ ३ ॥
जी सत्कथा, सदागम, सुवृत्त, सद्धर्म, जें सदाचरण, ।
बा ! याची तृष्णा धर, भावें स्मर शंभुचे सदा चरण. ॥ ४ ॥
संग त्यागावा, जरि न त्यजवे, साधुसीं तरि करावा, ।
कीं संगाचें ओखद संत, मनीं बोध हा हित धरावा. ॥ ५ ॥

—मोरोपंत.

### ओंव्या.

यासी प्रपंचीं करूनी विमुख, । परमार्थीं ठेवावें करूनी नेमक,
कामासी परमात्मभजनीं सुख । भक्तिकामीं लाविजे. ॥ १ ॥

क्रोधासी लाविजे उद्योग, । विषयपशूंचें वोळावें आग, ।
नासिकीं वेसण दमोनी चांग । मन आधीन करावें. ॥ २ ॥
तीर्थप्रसाद, हरिकथाश्रवण, । दान, भूतकृपा, संतपूजन, ।
लोभासी घालावें दमोन, । मग सावधान बैसावें. ॥ ३ ॥
मोहो असावा सज्जनीं, । देवब्राह्मणअतिथिपूजनीं, ।
स्नानसंध्यादिनिष्ठाभजनीं, । मोहो तेथ लाविजे. ॥ ४ ॥
मदें दंडावे दुर्गुण, । मदें मर्दावें दुर्व्यसन, ।
भक्तिमदें उन्मत्त होऊन । परमानंद निर्लज्ज नाचावें ॥ ५ ॥
मत्सरासी नाशवंत खुण । दावोनी करावा विचक्षण, ।
संसारमत्सर करोन । व्हावें समाधान परमार्थीं. ॥ ६ ॥
करितां षड्रिपु उफराटे, । तेची नेती मुक्तिवाटे, ।
तेची प्रपंचीं महा खोटे । महा नरकीं लोटिती. ॥ ७ ॥
जैसा नाळिकेवरील शुक । नाळिकेसवें भोगी दुःख, ।
तेची नाळिका निश्शंक । सोडितां होय सुखरूप. ॥ ८ ॥
लोभें न सोडी मुष्टीसी, । मुष्टि बांधोनी पडे फांसीं. ।
तेची मुष्टि सोडितां त्यासी । वानरासी भय कैचें? ॥ ९ ॥
नातरी आदर्शांचे सदनीं । प्रतिरूपसंभवा पाहोनी श्वानीं, ।
भुंकभुंकोनियां वदनीं । प्राणांत व्यथा पावले. ॥ १० ॥

—शुभानंद.

# २२. द्रव्यलोभ.

## ओंव्या.

देवीं अल्पही लोभाची जे वस्ती, । नाशी गुणौदार्य यश कीर्ती; ।।
लोभाऐसा त्रिजगतीं । कर्ता अपकीर्ति आन नाहीं. ।। १ ।।
धनलोभीं सदा विरोधू, । धनलोभ तोडी सखे बंधू, ।
धनलोभाऐसा नाहीं बाधूं । आणिक अशुद्धू असेना. ।। २ ।।
प्रथम शिणावें द्रव्य जोडितां, । दुसरें शिणावें तें वाढवितां, ।
द्रव्य जरी झालें उत्कर्षता, । तरी लोभ सर्वथा 'पुरे' न म्हणे. ।। ३ ।।
द्रव्यलोभ देखे ज्यापाशीं, । सदा ओळखे तयासी, ।
अणुमात्र नुल्लंघी वचनासी, । म्हणे 'सर्वस्वेंसीं दास तुझा.' ।। ४ ।।
दे घे धनवंत वेव्हारें, । सौजन्य त्यासी अत्यादरें, ।
विरक्त देखोनी एकसरें । स्वयें दातारे बैसवी. ।। ५ ।।
म्हणे 'भगवंताची कोण सत्ता? । सिद्ध ईश्वरदत्त भोग असतां, ।
सांडूनी धरिली तापसता । अभाग्यता केवढी पां?' ।। ६ ।।
धनलोभीं जे लुब्धक, । स्वप्नीं न देखती सुख, ।
या जन्मादारभ्य देख । भोगिती नरक अनिवार. ।। ७ ।।
जैं धनाचा वेंच होये, । तैं प्राणची जाऊं पाहे, ।
सणावाराची नेणे सोये, । अतिथी तये काय करील? ।। ८ ।।
कष्टें जोडिली संपत्ती । ते ठेविती अति निगुती, ।
तोंडीं दगडमाती घालिती, । आपण मरती धुळी खात. ।। ९ ।।
लोभें ऐहिकीं न मानी कोणी, । लोभें निंद्य होइजे जनीं, ।
लोभें परलोकाची हानी, । निंद्य पतनीं पडे लोभें. ।। १० ।।

जेथें दृढत्वें लोभाची वस्ती, । तेथें कैंची विवेकस्थिती ? ॥
अंध होऊनी ठाके वृत्ती, । दृढ विषयार्थीं लोभिष्ठ. ॥ ११ ॥
लोभ तेथें कैंचें ज्ञान ? । लोभ तेथें कैंचें ध्यान ? ।
लोभ तेथें समाधान । सर्वथा जाण पैं नाहीं. ॥ १२ ॥
लोभ तेथें कैंची भक्ती ? । लोभ तेथें कैंची मुक्ती ? ।
जेथें लोभ तेथें विरक्ती । नाहीं निश्चितीं सर्वथा. ॥ १३ ॥
लोभाचें ठाणें अंतरीं असतां, । सकळें साधनें होती वृथा ; ।
गुरूसी चाळी विकल्पता, । ज्याचेनी तत्वतां मोक्ष लाभे. ॥ १४ ॥
मातापिता इतर जन । त्यांची कथा गणी कोण ? ।
हें लोभाचें स्वाभाविक चिन्ह, । कुबेर जाण तैसा नव्हे. ॥ १५ ॥
राज्यलोभाची जाती पाहीं, । धर्माधर्म नाठवे कांहीं, ।
ज्येष्ठाचा तेथें पाड काई ? । अंध लवलाहीं बुद्धि होय. ॥ १६ ॥
राज्यभोग देखतां पुढें, । मन होवोनी ठाके वेडें, ।
साखरेवरोनी माशी नुडे, । तेवीं जडे विषयार्थीं. ॥ १७ ॥

—एकनाथ.

## गीति.

वित्त प्रयोजनाधिक जें, तें संरक्षणें असुख रचितें, ।
किंबहुना जो लोभी जन, त्याचें सर्वथा असु खरचितें. ॥ १ ॥
'दारिद्य कोण ? सांगा, बहु पुसतों कीं तुम्हां नसे रोष ? ' ।
'शिष्या ! बरवें पुशिलें; दरिद्रपण तेंचि जो असंतोष.' ॥ २ ॥
संतुष्ट पुरुष सहजें लाभेंचि सुखेंकरूनि वर्ततसे, ।
होतात असंतुष्टा प्राप्त सकळ लोक असुख गर्त तसे. ॥ ३ ॥
भवहेतु असंतोषचि, संतोषचि मुक्तिकारणें होतो, ।

ह्याचि अमृतरस, दुसरा यापरि फेडी न पारणें हो! तो. ॥ ४ ॥
जो संतुष्ट यदृच्छालाभें ब्राह्मण सदैवही असतो, ।
वाढे तत्तेज, असा बहु तेजस्कर नव्हे सुधारस तो. ॥ ५ ॥
द्विजतेज असंतोषें शमतेंचि, ज्वलन जेविं तोयांत, ।
हालाहलांत दुर्गण जो जैसा काय, तेविं तो यांत. ॥ ६ ॥

श्लोक.

सत्ता दत्तावरि करि असा कोण योगींद्र आहे? ।
मत्ता लत्ताप्रद अहिवरा कोण कल्याण वाहे? ॥
लोभा शोभासुमति हरित्या सुज्ञ चित्तीं न वाहे, ।
हो भा क्षोभास्तव नच उणी, भाग्य पापें न राहे. ॥ ७ ॥
आत्मप्राप्तिसुख प्रसिद्ध परम श्रेष्ठ श्रुतींच्या मतें,
जेथें त्यागुनि अन्य, चित्त कविचें सुश्रांत विश्रामतें, ।
तें द्रव्यें न मिळेचि, दास्यचि तुझें त्याचें खरें साधन,
सेवेनेंचि सुखी असे, हरि! नको या पाददासा धन. ॥ ८ ॥

—मोरोपंत.

द्रव्यास हे गमनमार्ग यथावकाश,
कीं दान, भोग, अथवा तिसरा विनाश. ।
जो घे न भोग, जरि पात्रकरीं न देई,
त्याच्या धनास मग केवळ नाश पाहीं. ॥ १ ॥

—भर्तृहरि.

ओंव्या.

ऐक दरिद्र्याचें लक्षण, । गांठीं असतां कोटी धन, ।
ज्याचें संतुष्ट नाहीं मन, । परम दरिद्री जाण या नांव. ॥ १ ॥

ज्याचे गांठी नाहीं कांचवटी, । परी संतुष्ट आहे नित्य पोटीं, ।
त्यांची संतुष्ट सकळ सृष्टीं, । सत्य गोष्टी हे उद्धवा! ॥ २ ॥

—एकनाथ

---

## २३. विषयलोभ-तृष्णा-आशाळभूतपणा.

### गीति.

मन हें घातक वेडें विषयव्याळासवें करी क्रीडा, ।
पीडाचि पावतें, परि सावध नोहे, न तें धरी व्रीडा. ॥ १ ॥
जें पृथ्वीवरि धान्य, स्वर्ण, मणि, पशु, स्त्रिया, असे कांहीं; ।
तें सर्वहि एकाच्या तृप्तिस पर्याप्त सर्वथा नाहीं. ॥ २ ॥
वामन म्हणे, ' प्रिय विषय जितुके या त्रिभुवनांत आहेत, ।
तेही अजिता! याचा पूर्ण कराया न शकति बा! हेत. ॥ ३ ॥
जो त्रिपदमहीलाभें संतुष्ट त्रिभुवनेश्वरा! नाहीं, ।
होईल न नववर्षद्वीपेंहीं पूर्णकाम तो कांहीं. ॥ ४ ॥
सप्तद्वीपवरांच्या इच्छेनें सर्वदा तळमळेल, ।
तृष्णामळें न पावुनि सुविवेका, चित्तिंचें जळ मळेल. ॥ ५ ॥
सप्तद्वीपवरेश्वर, ऐकतसों पृथुगयादिही बा! जे, ।
अर्थांहीं, कामांहीं, तृष्णान्ता ते न पावले राजे. ॥ ६ ॥
बहु विषयसेवन जसें, स्रोत तसें मानवा न वाहवितें; ।
न शमे स्मर विषयातें पावोनि, शिखी नवा नवा हवितें. ॥ ७ ॥
कविस रुचे घालावें विषयसुख, करोनि घोर तप, डावें; ।
मूढासि आवडे बहु जेऊनि सस्त्रीक घोरत पडावें. ॥ ८ ॥

जी दुस्त्यजा कुमतिंहीं, जीर्णांचीही न जी जिरे लेश, ।
जो प्राणांतिक गद ती तृष्णा त्यजि, त्यासि सर्व सुख देश. ॥ ९ ॥
जीर्णांचे केश जिरति, जीर्णांचे जिरति सर्वही दन्त, ।
परि जीर्णांच्या जीवितधनवांच्छा ज्या, तयां नसे अन्त. ॥ १० ॥
कामसुख असें लोकीं, दिव्य महत्सुखहि जें असे भोग्य, ।
तृष्णानाशसुखाच्या सोळाव्याहि न कळेसि तें योग्य. ॥ ११ ॥
वाढवितो विषयांची तृष्णा, संतुष्ट जो नसे प्राणी, ।
तोचि जन दरिद्र, क्षम न स्वत्राणीं, न वा परत्राणीं. ॥ १२ ॥
सत्संगशाणनिशितें विद्याशस्त्रेंकरूनियां ज्यांहीं ।
ममताद्रु तोडिला, बा! नाहीं भय या भवीं तया कांहीं. ॥ १३ ॥
जे वरिति विषयभोगा, योगाभ्यासप्रसंग ज्यां न रुचे, ।
ते सरस इक्षुचेहि त्यागुनि सुग्रास, चोखिती बरुचे, ॥ १४ ॥
'तस्कर कोण स्वामी?' 'वत्सा! जे विषय दस्यु ते जाण.' ।
'कोण भवाची वल्ली?' 'शिष्या! तृष्णाचि रे! तुझी आण.' ॥१५॥
'मद्यापरि मोहप्रद काय? स्वामी! दया करूनि वदा.' ।
'शिष्या! पुत्रकलत्रीं सुरेहुनि स्नेह दे अपार मदा.' ॥ १६ ॥
'ज्याचें अनर्थ फळतें काय? श्रीगुरुवरें निवेदावें.' ।
'शिष्या! विषयांपासुनि न निवारित चित्त तें, असो ठावें.' ॥ १७ ॥

## श्लोक.

अनावर पिशाच्चिका विषयवासना सत्य जी, ।
असें करवि कृत्य जी, भुलविते, कधीं न त्यजी, ॥

म्हणोनि तुज जाणत्या विनवितों, 'इला काढ गा!', ।
करीन मग तूं जरी म्हणसि 'आपणा गाढ गा.' ॥ १ ॥
—मोरोपंत.

आशा थोर नदी, मनोरथ तिचें पानीय, वीचि तृषा, ।
स्त्रीपुत्राद्यनुराग हीं जलचरें, जे पूर्ण कूलंकषा, ॥
संसारभ्रम भोंवरा गरगरी, चिंताच जीचीं तटें, ।
तीतें जे तरले मुनीश, न कधीं ते पावती संकटें. ॥ १ ॥
न भोगिले भोगहि, मीच भोगिलों; । न साधिलेही तप, मीच तापलों; ॥
न काल गेला, तरि मीच चाललों; । न खुंटली आसहि, मीच खुंटलों.॥२॥
शिणोनि फिरलों महाविषम दुर्ग देशान्तरीं; ।
तथा प्रभुहि सेविले, न फल लाधलें कीं तरी; ॥
सशंक जरि जेविलों परगृहीं जसा कावळा; ।
परंतु न दिसे मला कठिण आस हे दुर्बळा. ॥ ३ ॥
म्यां साहिली खलजनोक्ति कठोर पाहीं; ।
पोटांत दुःख वरचेवर हांसलोंही; ॥
कीं प्रार्थिलें स्वजठरार्थ मदांध लोकां; ।
आशे! अशीच मज नाचविशी कितीकां? ॥ ४ ॥
वदना रदनावलिनें त्यजिलें; ।
शिर सर्वहि शुभ्रपणें पिकलें; ।
उठतां बसतां अणु शक्ति नसे; ।
परि आस निरंतर माजतसे. ॥ ५ ॥
भिक्षाटणें अशन तें क्षण एकवार; ।
शय्या महीवरि, जयासि न रांड पोर; ।

कंथा जया वसन कीं शतखंड तेंही; ।
टाकीचना तदपि तो विषयास देही. ॥ ६ ॥
न जाणतां टोळ पडे हुताशीं, ।
नेणोनियां मीन गिळी गळाशी, ॥
अभिज्ञ आम्ही विषयांस जेव्हां ।
सांडूच ना, मोह बलिष्ठ तेव्हां. ॥ ७ ॥
हे नानाविध भोग भंगुर वृथा, तन्मूल संसार रे ! ।
कां मूढा ! भ्रमसी तदर्थ सहसा ? हें सर्व आतां पुरे. ॥
आशापाशशतासि टाकिं परतें, कामासही, हो भला, ।
हा असद्वचनार्थ रे ! जरि तुला आहे खरा मानला. ॥ ८ ॥

—भर्तृहरी

## ओंव्या.

लोभाल्लोभश्च वर्धते, । ऐशी आहे शास्त्ररीति, ।
जितुका जितुका लाभ क्षिति, । लोभ वाढे मागुती. ॥
लाभें लोभासी-होय वृद्धी, । कोण तरेल तृष्णानदी ? ।
जो पावला ब्रह्मानंदीं, । नैराश्य तो एक उतरला. ॥ १ ॥
सिंधु 'नको' न म्हणे जैसा । नदी प्राशितां, पुढती तैसा ।
कष्टें वोपितां हुताशा । 'नको' न म्हणे तत्वतां. ॥ २ ॥
तयापरी विषयात्मा मानव । विषयभोग भोगितां सर्व, ।
तृप्ती न म्हणे दुर्जीव, । पुढें पुढें मग धावे. ॥ ३ ॥
मृगें पाहती जळ फार, । धावतां पुढें दिसे नीर, ।
भोगितां विषय पामर नर । पुढां पुढां सुख भोगी. ॥ ४ ॥

एवं तृष्णासागर । न पावे कोणी पर पार, ।
मायें बुडाले जीव समग्र, । जैसे मत्स्य मगर सागरीं. ॥ ५ ॥
माया तृष्णा तें वो नीर, । मत्स्यरूपें सकळ जीव पामर, ।
हिंडतां नेणती पर पार । या अघोर भवसिंधूचा. ॥ ६ ॥
भोगीत असतां विषयच्छंद, । वय जावोनी झाला वृद्ध, ।
अंतरीं तेव्हांही कल्पनाछंद, । तृष्णा वृद्ध पैं नव्हे. ॥ ७ ॥
मान हाले भरभराटी, । चरणीं न चले, धरी काठी, ।
झुळ झुळ लाळ वाहे ओठीं, । परी तृष्णा पोटीं तरुणी ते. ॥ ८ ॥
दंत पडोनी बोचरखेडी, । केंस पिकोनी झडली शेंडी, ।
परी अंतरीं न सुटे विषयवोढी, । तृष्णा गाढी तरुणी ते. ॥ ९ ॥
कर चरण वेगळे काढी, । पाठ मोडोनी झाली घडी, ।
सकळ इंद्रियांची गेली प्रौढी, । परी तृष्णा गाढी तरुणी ते. ॥१०॥
दृष्टी जावोनी झाला अंध, । बधिरत्व पावला बुद्धिमंद, ।
परी अंतरीं न सुटे विषयच्छंद, । तृष्णा पोटीं तरुणी ते. ॥ ११ ॥
आप्त सुहृद मित्रजन । गेले स्वर्गाप्रति सांडोन, ।
परी न इच्छी पैं मरण । पाठीं, तृष्णा तरुणा ते. ॥ १२ ॥
विषयलोभिया भक्ति नाहीं, । विषयलोभिया सत्य नाहीं, ।
विषयलोभिया देव नाहीं, । मित्र नाहीं लोभिया. ॥ १३ ॥
नाहीं विषयलोभिया कुळ, । नाहीं विषयलोभिया स्थळ, ।
विषयलोभी आंधळा केवळ, । आपपर हेंही नाहीं. ॥ १४ ॥

—शुभानंद.

आशापाशें नाडले बहुत, । आशेकरितां अपमान होत, ।
आशावंत जो कां संत, । लोक निंदिती त्यालागीं. ॥ १ ॥

आशावंत घराचारी । यजमानाचे आर्जव करी, ।
कुटुंब त्याचें अनुपकारी । अनुताप अंतरीं न होय. ॥ २ ॥
वेद शास्त्रेंही पढिन्नला, । विद्वान पंडित निपुण झाला,
परी तो परमार्थासी मुकला, । द्वेष वाढला आशेनें. ॥ ३ ॥
एक नग्न दिगंबर अवधूत । होऊनी फिरती अरण्यांत, ।
परी आशापाशें नाडिलें त्यांतें, । जनासी हात पसरिती. ॥ ४ ॥
-एकीं घेतलें संन्यासग्रहण, । परी जिव्हेसी नावडे कदन्न, ।
त्याची आशा धरितां जाण । नारायण अंतरला. ॥ ५ ॥

एक करिती तपाचरण; । वरते हात धूम्रपान, ।
हात पसरिती जनांकारणें । तेही आशेनें नाडिले. ॥ १ ॥
ऐशी आशा महावैरीण, । मुमुक्षु साधक ठकविले येण, ।
श्रीहरिकृपा करील, जाण, । तरीच मन स्वस्थ राहे. ॥ २ ॥
सेवितां प्राण्यास वाटतें सुख, । परी परिणामीं होय दु:ख, ।
विषय सेवितां थकले लोक, । अंतीं नरक प्राप्त तयांसी. ॥ ३ ॥
शब्दविषय मृगांकारणें । परम आवडे जीवाहून, ।
नादीं लुब्ध होतांची जाण । प रधी विंधोन मारिती ॥ ४ ॥
रसविषय मत्स्याकारणें । आमिष गिळितां सुखावे मन, ।
गळ आसुडितां हिंसकानें । अचुक मरण चुकेना. ॥ ५ ॥
गंधविषय भ्रमर सेविती, । कमळमकरंदीं लुब्ध होती, ।
अस्तमानासी जातां गभस्ती । गुंतती त्यामाजी. ॥ ६ ॥
एक एक आवड एकाचे ठायीं, । त्यांची गती ऐशीच पाहीं, ।
आणि पंचविषय नरदेहीं । परिणाम नाहीं उत्तम. ॥ ७ ॥

परी रसनाविषय अवघ्यांत दुष्ट, । याचेनी इंद्रियें होतात पुष्ट, ।
यालागीं जे कां सज्ञान श्रेष्ठ, । रसना स्पष्ट जिंकावी. ॥ ८ ॥
वासनाक्षय नव्हेची ज्यासी । गोड अन्न पाहिजे खावयासी, ।
यास्तव जाहले संन्यासी । वृथा गुरूसी नाडिलें. ॥ ९ ॥
मरणसमयीं इंद्रियें क्षीण । तिळमात्र न खाववे अन्न, ।
परी वासना 'म्हणे मी पदार्थ सेवीन,'। तरी जन्म घेणें चुकेचिना.॥१०॥
सहज समयीं मिळेल जैसें, । क्षुधाहरणार्थ सेविजे तैसें, ।
तरीच निर्विघ्न मुमुक्षूस । वासनानाश सहजची. ॥ ११ ॥

—महीपति.

## अभंग.

जरी आलें राज्य मोळविक्या हाता, । तरी तो मागुता व्यवसायी. ॥१
तृष्णेचीं मजुरें नेणती विसांवा, । वाढे हांव हांवां काम कामीं. ॥ २ ॥
वैभवाचीं सुखें नातळतां अंगा, । चिंता करी भोगा विघ्नजाळी. ॥ ३ ॥
तुका म्हणे, वाहे मरणाचें भय, । रक्षणउपाय करुनी असे. ॥ ४ ॥

सर्प भुलोन गुंतला नादा, । गारुडियें फंदा घातलासे. ॥ १ ॥
हिंडवुनि पोट भरी दारोदारीं, । कोंडुनी पेटारीं असे रया. ॥ २ ॥
तैसी परी मज झाली, पांडुरंगा ! । गुंतलों तो मी गा ! सोडीं आतां.॥३॥
माझें मज कांहीं न चालेसे झालें, । कृपा तुज [दयाळे] न करितां.॥४॥
आविसें मीन लावियला गळीं, । भक्ष तों तो गिळी म्हणुनियां ॥५॥
काढूनी बाहेरी प्राण घेऊं पाहे, । तेथें बापमाये कवण रया ? ॥ ६ ॥
पक्षी पिलयां पातलें आशा । देखोनियां फांसा गुंते बळें. ॥ ७ ॥
मरण नेणे माया धांवोनी वोसरे । जीवित्व [उरे] ना जाळीं बाळें.॥८॥

गोडपणें मासीं गुंतली लिगाडीं, । सांपडे फडफडीं अधिकाधिक ॥९॥
**तुका** म्हणे, प्राण घेतला आशा । पंढरीनिवासा! धांव घालीं. ॥१०॥

" जातों वाराणशी, । निरवीं गाई, घोडे, म्हैशी. ॥ १ ॥
गेलों, येतों नाहीं ऐसा, । सत्य मानावा भरवसा. ॥ २ ॥
नका काढूं माझीं पेंवें । तुम्हीं वरळा भूस खावें. ॥ ३ ॥
भिकारियाचे पाठी । तुम्ही घेऊन लागा काठी. ॥ ४ ॥
सांगाल जेवाया ब्राह्मण । तरी कापाल माझी मान. ॥ ५ ॥
बोकलिया बोका । म्यां खर्चिला नाहीं रुका. ॥ ६ ॥
तुम्हीं खावें ताकपाणी, । जतन करा तूप लोणी. ॥ ७ ॥
नाहीं माझे मनीं । पोरें रांडा नागवणी." ॥ ८ ॥
**तुका** म्हणे, नष्ट । होतें तैसें बोले स्पष्ट. ॥ ९ ॥

**श्लोक.**

अखंड कामिनी मनांत दामिनीसमान ते.
कुभोगपंक्ति सर्वही तयांसि साच वाटते. ।
अनश्वरत्व नश्वरीं विलोकितातिं देखतां
परस्परें जगांत याच मृत्युदु:ख भोगितां. ॥ १ ॥
शरीर हेंच आत्मभान जाहलें तयांप्रती;
तदर्थ इच्छितात सौख्य, नाशिवंत संपती. ।
अमित्रमित्रभाव आपुल्या गुणेंचि जाणती,
समस्तभूतमात्रकीं दया कदापि नेणती. ॥ २ ॥
न साधुवाद ठाउका असे तयांसि पामरां;
तदा विवेक, सद्विचार, केंवि त्यां घडे नरां! ।

गुरांहुनी खरांहुनी तयांसि नीच बोलिजे,
अपार भार वाहते प्रकाम पुष्ट जाणिजे. ॥ ३ ॥
नसे जयांसि साधुसंग, कामना मनांतरीं,
सदैव लोभपाशबद्ध गुंतले धनांतरीं,
न वेद, धर्म, कर्म, तीर्थ, यश, दान, साधणें
व्रतादिही न जाणताति; सज्जनांसि बाधणें. ॥ ४ ॥
कुलांत कज्जलासमान तेचि शोभती खरे,
तयांस वाहती धरा भरें बहूत हुंबरे. ।
वृथाचि वृक्षजीवनासमान दुष्ट वांचती,
पिशाचभूतराक्षसांसमान नीच नाचती. ॥ ५ ॥
कलींत ते कलिप्रियत्व पावले, सुशोभले;
तयांसि त्यांसमान लोक वानिती, 'भले, भले!' ।
मरोनि ते कृतांतधाम पावती न चूकतां,
अनर्थ काळदंडदुःख भोगिती यथार्थता. ॥ ६ ॥

—निरंजनमाधव योगी.

## अभंग.

आशा हे समूळ खाणोनी काढावी, । तेव्हांची गोसावी व्हावें तेणें. ॥ १ ॥
नाहीं तरी सुखें असावें संसारीं, । फजेती दुसरी करूं नये. ॥ २ ॥
आशा मारूनियां जयवंत व्हावें, । तेव्हांची निघावें सर्वांतुनी. ॥ ३ ॥
तुका म्हणे, जरी योगाची तांतडी, । आशेची बीबुडी करीं आधीं. ॥ ४ ॥

आशाबद्ध वक्ता । भय श्रोतियाच्या चित्ता. ॥ १ ॥
गातों तेंही नाहीं ठावें, । तोंड वासी 'कांहीं द्यावें.' ॥ २ ॥

झाला लोभाचें मांजर, । भीक मागे दारोदार. ॥ ३ ॥
उभयतां लोभी मन, । वायां गेलें तें भजन. ॥ ४ ॥
बहिरे मुके एके ठायीं, । तैसें झालें तया दोहीं. ॥ ५ ॥
माप आणि गोणी, । तुका म्हणे, रितीं दोन्ही. ॥ ६ ॥

आशाबद्ध जन । काय जाणे नारायण? ॥ १ ॥
करी इंद्रियांची सेवा, । पाहे आवडीचा हेवा. ॥ २ ॥
भ्रमलें चावळे, । तैसें उचित न कळे. ॥ ३ ॥
तुका म्हणे, विषें । अन्न नाशियेलें जैसें. ॥ ४ ॥

आशाबद्ध तो जगाचा दास, । पूज्य तो उदास सर्व जना. ॥ १ ॥
आहे तें आधीन आपुलाले हातीं, । आणिकां ठेविती काय बोल? ॥ २ ॥
जाणितिया पाठीं लागला उपाध, । नेणता तो सावध भोजनासी. ॥ ३ ॥
तुका म्हणे, भय बांधिलेंसे गांठी । चोर लागे पाठी दुम तया. ॥ ४ ॥

आशा तृष्णा माया अपमानाचें बीज, । नासिलिया पूज्य होईजेतें. ॥ १ ॥
अधीरासी नाहीं चालों जातां मान, । दुर्लभ दर्शन धीर त्याचें. ॥ २ ॥
तुका म्हणे, नाहीं आणिकासी बोल, । वायां जाय मोल बुद्धीपासी. ॥३॥

---

## २४. ताठा-अभिमान-अहंकार.

### ओंव्या.

येतां योग्यता अभिमान । सत्संग नावडे मनांतून, ।
चित्त उठे कुतर्क घेऊन, । तरी हरिचरण अंतरले. ॥ १ ॥
जेथें गर्व अभिमान, । तेथें सर्वदा भ्रमण, ।
न चुके त्याचें जन्ममरण, । केलिया जाण निजमुक्ति. ॥ २ ॥

अल्प विद्या, अल्प धन, । यासीं असे दुरभिमान, ।
ऐसा जो सर्व गुणीं संपन्न । त्यासी अभिमान पैं नाहीं. ॥ ३ ॥

अल्पोदकें कुंभ भरित । उच्चंबळोनी होय रिक्त, ।
सर्व गुणें जो भरित । तो निःशब्द निरभिमानी. ॥ ४ ॥

'मी शिवभक्त', म्हणतां रावण । गर्वें गेला त्याचा प्राण, ।
गर्व धरितां दुर्योधन । सहपरिवारें निमाला. ॥ ५ ॥

'मी थोर दुजा सान', । हा न धरावा अभिमान, ।
सर्वथा न करावें पापाचरण, । काळ नसे एकरूप. ॥ ६ ॥

पिपीलिका अत्यंत सान, । हर्षे पावोनियां जाण, ।
महास्थूळ कुंजराकारण । कर्णी जातांची मारी ती. ॥ ७ ॥

'मी थोर', हा धरूनी अभिमान, । बळें दीनाचें करितां छळण, ।
न चाले त्याचा अभिमान, । दीनरक्षक परमात्मा. ॥ ८ ॥

दीन हीन साहे अपमान, । परी त्याचे मनीं दीर्घ अभिमान, ।
चरणें ताडितां रजःकण । मस्तकीं त्याचेच बैसती. ॥ ९ ॥

मुळींच उठतां अभिमान, । अभिमानें होय बंधन, ।
मग विघ्नें येऊन । तयावरी कोसळती. ॥ १० ॥

म्हणोनी लहानथोरें अभिमान । सर्वथा न करावा जाण, ।
सर्वांतर्यामीं भगवान । भरोनियां राहिला. ॥ ११ ॥

ज्याची वृत्ति निरभिमान, । तो सर्वांचें दुःख करी हरण, ।
जो अहंकारी पूर्ण । त्यासी नारायण दुरावे. ॥ १२ ॥

—श्रीधर.

अभिमानाची जाती कैशी? । अधिक खवळे सज्ञानापाशीं, ।
जो दाखवी गुणदोषांसी । निंदास्तवनासी उपजवी. ॥ १ ॥
अहंकार जडला जीवीं । तो साधूनी रिघोनी गोवीं, ।
अहंकार जीवभावीं । उघड नागवी जगातें. ॥ २ ॥
मुख्य घातक अहंता, । तीसी साह्य झाली ममता, ।
अहंमता न जाणतां । सुख सर्वदा असेना. ॥ ३ ॥
अहमात्मा जें मीपण, । तें मुख्य भ्रमाचें निजकारण. ।
'तूं' म्हणणें हा भ्रम दारुण, । मीतूंपण भ्रममूळ. ॥ ४ ॥
अहंता कर्मसिद्धि न वचे, । अहंता सुख न घडे स्वर्गीचें, ।
अहंता सार न पावे वेदाचें, । अहंता साच घातक. ॥ ५ ॥
अहंता न साधे स्वामिकार्य, । अहंतेनें साधन हत होय, ।
अहंता यश न लाहे, । निंद्य होय अहंता. ॥ ६ ॥
ऐहिक सुख नव्हे देख, । अभावा पवे पारत्रिक, ।
अहंता भोगिजे नरक, । अहंता घातक जगा झाली. ॥ ७ ॥
अभिमानाची जाती पाहीं । साधुसंता न मानी कांहीं, ।
ज्ञानगर्वें बुडाले तेही । शुद्धि नाहीं तयांची. ॥ ८ ॥
धांवणें नागवी आपण, । तरी कोण करील सोडवण? ।
अभिमानें यापरी जाण । सकळ जन नागविले. ॥ ९ ॥
ज्ञानगर्वें नागविले । ते काळातें देखती वहिले, ।
सिद्ध आयुष्य वायां गेलें, । तें जोडितां न मिळे पुण्यकोटीं. ॥ १० ॥
गर्वाचा ताठा चढला, । तेणें विवेक बुडविला, ।
अभिमदें अति मातला । घात केला स्वयेंची. ॥ ११ ॥

धनमद, पानमद, । अति मान्यतेचा राज्यमद, ।
तेणें प्राणी होय अंध, । कार्यानुवाद नाठवे. ॥ १२ ॥

—एकनाथ.

### गीति.

बहु पुरुषजन्म दुर्लभ, तेथें अत्यंत सर्व हानिकर ।
पापांचा, शापांचा, तापांचा होय गर्व हा निकर. ॥ १ ॥
अर्थीहीं मद होतो, होय पुरुष बहु अनम्र बा! धात्या! ।
अवमानितो जनांतें, [हरितेंही,] ती पिशाचबाधा त्या. ॥ २ ॥
जो ज्ञाता हितकर्ता, म्हणतो, 'कुलजीं न दर्प राहो' तो; ।
कीं, या सर्वस्वहरा भजतां, जन पात्र खर्परा होतो. ॥ ३ ॥

### श्लोक.

जो भाग्यमत्त जड, तो जन अंधसा, हें ।
त्यातें म्हणे व्यसन 'दुःसह बंध साहें.' ॥
सामर्थ्यपूर्ण असतांहि कधीं नयाचे ।
न त्यागिती पथ, सुकीर्ति अधीन याचे. ॥ १ ॥

—मोरोपंत.

### ओंव्या.

माताभिमानी, देहाभिमानी, । भाषाभिमानी, धर्माभिमानी, ।
कुळाभिमानी, ज्ञानाभिमानी, । चौऱ्यायशीं लक्ष योनी बांधी तया.॥१॥
जे अभिमानातीत झाले, । संतवचनीं विश्वासले, ।
ते मोक्ष निशाण लावोनी गेले । जन्ममरण त्यां नाहीं.॥ २ ॥

—शुभानंद.

साधु सर्वांगीं चैतन्यघन । त्यांसी न भजतां धरी ध्यान, ।
तें ध्यान नव्हे, परम विघ्न । अधःपतन ध्यानगर्वें. ॥ १ ॥

उपेक्षोनी साधुसज्जन, । जो साक्षेपें करी ध्यान, ।
ध्यान नव्हे तें नागवण, । आपणा आपण नाडिलें. ॥ २ ॥

ध्यानगर्व ज्याचे ठायीं, । ज्ञानगर्वें जो उताणा पाहीं, ।
विद्यागर्व मुसमुसे देहीं, । तो नर पाहीं अधःपाती. ॥ ३ ॥

साधु सच्चिदानंद व्यक्ती, । ध्यानाची काल्पनिक मूर्ती; ।
साधुउपेक्षा ध्यानीं प्रीती, । ते अधःपाती ज्ञानगर्वें. ॥ ४ ॥

—एकनाथ.

## श्लोक.

वृक्ष फार लवती फलभारें, । लोंवती जलद घेउनि नीरें. ॥
थोर गर्व न धरी विभवाचा, । हा स्वभाव उपकारपराचा. ॥ १ ॥

विपुळ हृदय ज्यांचें, निर्मिलें विश्व तींहीं; ।
निज शिरिंहि परांहीं वाहिलें सर्व पाहीं; ॥
तृणसम दिधलें हें विश्व जितून एकीं; ।
कितिक असति भोक्ते; गर्व कां क्षुद्र लोकीं? ॥ २ ॥

स्वर्गापासुनि शर्वमस्तकतटीं, तेथूनियां भूधरीं, ।
ग्रावाग्राहुनि भूतळीं उतरली ते स्वर्नदी सत्वरीं; ॥
गेली तेथुनि अर्णवाप्रति; मदें ते वंद्यही कष्टली; ।
जे कां दुर्मद त्यां अधःपतनता आहे बरी निर्मिली. ॥ ३ ॥

—भर्तृहरि.

## अभंग.

मुंगी होउनी साकर खावी, । निजवस्तूची भेटी घ्यावी. ॥ १ ॥
वाळवंटीं साकर पडे, । गज येउनी काय रडे ! ॥ २ ॥
जाला हरिदास गोसावी, । अवघी मायिक क्रिया दावी. ॥ ३ ॥
पाठ पाठांतरिक विद्या । जनरंजवणी संध्या. ॥ ४ ॥
प्रेम नसतां अंगा आणी, । दृढ भाव नाहीं मनीं. ॥ ५ ॥
ब्रम्हज्ञान वाचे बोले, । करणी पाहतां न निवती डोळे. ॥ ६ ॥
मिथ्या भगल वाढविती, । आपुली आपण पूजा घेती. ॥ ७ ॥
तुका म्हणे, धाकुटें व्हावें, । निजवस्तूसी मागुनी घ्यावें. ॥ ८ ॥

वसोनी थिल्लरीं, । बेडुक सागरा धिक्कारी. ॥ १ ॥
नाहीं देखिला ना ठावा, । तोंडपिटी करी हांवा. ॥ २ ॥
फुगतें काउळें, । म्हणे 'मी राजहंसाआगळें.' ॥ ३ ॥
'गजाहूनी' खर, । म्हणे 'चांगला मी फार.' ॥ ४ ॥
मुलाम्याचें नाणें, । तुका म्हणे, नव्हे सोनें. ॥ ५ ॥

विद्या अल्प परी गर्वशिरोमणी, । मजहुनी ज्ञानी कोण आहे ! ॥ १ ॥
अंगीं भरला ताठा कोणाचें मानीना, । साधूची छळणा स्वयें करी. ॥ २ ॥
साधूचे देहाचा मानी जो विटाळ, । त्रिलोकीं चांडाळ तोची एक. ॥ ३ ॥
संतांची जो निंदा करितो या मुखें, । खतेला सकळिकें तोची एक. ॥ ४ ॥
तुका म्हणे, ऐसे मावेचे मइंद, । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं. ॥ ५ ॥

कवण दिस येईल कैसा ! । न कळे संपत्तीचा भरंवसा. ॥ १ ॥
चौदा चौकडिया लंकापती, । त्याची कोण जाली गती. ॥ २ ॥

लंकेसारिखें वतन, । त्याचें त्यासी पारखें जाण. ॥ ३ ॥
तेहतीस कोटी बांदवडी, । राज्य जातां नलगे घडी. ॥ ४ ॥
ऐसे अहंतेनें नाडिले, । **तुका** म्हणे, वायां गेले. ॥ ५ ॥

अहंकार तो नासाभेद, । जगीं निंद्य ओंवळा. ॥ १ ॥
नातळे तो धन्य त्यासी, । जाला वंशीं दीपक. ॥ २ ॥
करवितो आत्महत्या, । नेदी सत्या आतळों. ॥ ३ ॥
**तुका** म्हणे, गुरुगुरी । माथां थोरी धरुनी. ॥ ४ ॥

हीन माझी याती, । वरी स्तुति केली संतीं, ॥ १ ॥
अंगीं वसूं पाहे गर्व, । माझें हरावया सर्व. ॥ २ ॥
मी एक जाणता, । ऐसें वाटतसे चित्ता. ॥ ३ ॥
राख, राख, गेलों वायां, ॥ **तुका** म्हणे, पंढरीराया ! ॥ ४ ॥

## २५. क्रोध.

### ओंव्या.

क्रोध आधीवीण आधी, । क्रोध तोची महाव्याधी, ।
क्रोधें सूदिले अप्रमादी । सारासार जाणते. ॥ १ ॥
क्रोध तोची अपस्मार, । क्रोध तोची भूतसंचार ।
क्रोधें किजे पिशाच नर । परम चतुर विवेकी. ॥ २ ॥

—मुक्तेश्वर.

अंतरीं असतां क्रोधखळ, । त्या अवघेंची भासे अमंगळ, ।
दृष्टीं कोणी न दिसे निर्मळ । विकल्प जाळांत पडियेले. ॥ ३ ॥

—महीपति.

क्रोध पित्यापुत्रातें बाधी, । क्रोध स्त्रीपुरुषां विरोधी, ।
क्रोध प्रियाप्रिय उच्छेदी, । क्रोध त्रिशुद्धीं अनर्थी. ॥ ४ ॥
क्रोध निजज्ञाना निर्दाळी, । क्रोध स्वार्थाची करी होळी, ।
क्रोध तापसातें छळी, । क्रोध महाबळी अनर्थ. ॥ ५ ॥
क्रोध केवळ महा मांग, । जिवें मारिलें वैराग्य, ।
सकळ योगां होय भंग, । क्रोध सर्वांग अति अपवित्र. ॥ ६ ॥
मातंगविटाळ जळें निवृत्ती, । क्रोधाची चित्तामाजी वस्ती, ।
त्याचे क्षाळणीं न चले युक्ती । क्रोध सर्वार्थीं घातक. ॥ ७ ॥
क्रोधाऐसा वैरी । बैसला असतां जिव्हारीं, ।
जो तयाची मानी थोरी, । तो चराचरीं अतिमूर्ख. ॥ ८ ॥
अपकारियावरी कोप करिती, । कोणी कोपावरी कोप न करिती, ।
क्रोध वाटपाडा निश्चिती । चहूं पुरुषार्थीं नागवी. ॥ ९ ॥
अल्प अन्याय देखिल्यावरी । त्यावरी जो तो कोप करी, ।
क्रोधाएवढा अपकारी । क्रोध क्रोधावरी न करिती. ॥ १० ॥
क्रोध संचरल्या देहीं, । अणुमात्र हित नाहीं, ।
पापाच्या कोटी पाहीं । क्रोधाच्या पायीं तोडरी. ॥ ११ ॥
कोप आलिया दुर्धर, । जयाचा लोपेना विचार, ।
तोची मोक्षाचा अधिकार । परम धीर तो एकू. ॥ १२ ॥
कोपामाजी सावधान, । अवतारपुरुषाचें हें चिन्ह, ।
तें चालतें ब्रह्मज्ञान, । जग पावन त्याचेनी. ॥ १३ ॥
आंगा येतां क्रोधसंग, । अपवित्र होय सर्वांग, ।
ब्रह्मचर्या होय भंग, । तपा संहार होय क्रोधें. ॥ १४ ॥

यज्ञ, दान, व्रत, दक्षणा, । कोप येतांची पैं, जाणा, ।
सर्व क्रियाकर्म व्यर्थ, जाणा, । करी उगाणा तपाचा. ॥ १५

छिद्र पडतां घट गळे, । क्रोधानळें तप जळे, ।
योगी संन्यासी पडती मेळे । क्रोधें निजबळें बांधिलें पैं. ॥ १६ ॥

क्रोध येऊं न देती दृष्टी, । धन्य धन्य ते नरश्रेष्ठी, ।
क्रोध आलिया पोटीं । ते विवेकदृष्टी निर्दाळिती.॥ १७ ॥

ऐशिये दृष्टीचे जे नर, । चैतन्याचें निजमंदिर, ।
परब्रह्माचें भांडार, । ब्रह्म साकार ते पुरुष. ॥ १८ ॥

भूतीं पाहतां भगवद्भाव, । कामक्रोधासी कैंचा ठाव ? ।
ऐसा ज्याचा निजसद्भाव । तोची स्वयमेव परब्रह्म. ॥ १९ ॥

उन्मत्त गज जेवीं मारी, । त्यासी सिंह पाडी धरेवरी, ।
परी कोपावरी कोप करी । ऐसा संसारीं वीर नाहीं. ॥ २० ॥

क्रोध आलिया धर्मसंधीं, । मुख्य ब्राह्मणातें स्वयें निंदी, ।
परापवादाच्या अनुवादीं । क्रोधें धर्मसिद्धि कदा न घडे. ॥ २१ ॥

क्रोध धर्मातें उच्छेदी, । क्रोध धर्मातें निंदी, ।
क्रोध पापी हा दुर्बुद्धि । निंदानुवादी जल्पोनी. ॥ २२ ॥

क्रोध पित्यातें निर्भर्त्सी, । क्रोध मातेतें म्हणे दासी, ।
क्रोध स्वधर्मातें नासी । क्रोधापासीं अधर्म. ॥ २३ ॥

बंधु बंधु अति आप्त । अर्थस्वार्थें क्रोधाभिभूत ।
स्वबंधूसी हाणवी लाथ । अति अनर्थ तो क्रोधु. ॥ २४ ॥

—एकनाथ.

संग तोची काम, । काम तीव्र कामाचें नाम, ।
तीव्र कामची धाम । क्रोधाचें. ॥ २५ ॥
काम तेथें विघ्न कोटी, । विघ्न होतां क्रोध पोटीं, ।
उपजे ते वृत्ति खोटी । तमोगुणाची. ॥ २६ ॥
क्रोधें मोह उपजे, । कार्य अकार्य तेव्हां न समजे, ।
बरें वाईट कांहीं नुमजे । निजस्मृति मग कैंची ? ॥ २७ ॥
जो रागद्वेषयुक्त, । तो केवीं होय जीवन्मुक्त ।
याकारणें रागद्वेषरहित । इंद्रियसमूह ज्ञानियाचा. ॥ २९ ॥

—वामनपंडित.

## गीति.

व्यास, द्रोण, विदुर, कृप, भीष्म, श्रीकृष्णनाथ हे सुकवी ।
म्हणति, 'क्षमा शिवतरुप्रति पोषी, क्रोध सर्वथा सुकवी.' ॥ १ ॥
या क्रोधदस्युतिलकें कोण तपोधन जगीं नसे लुटिला ? ।
बा ! गा ! विचक्षणा ! तूं कैसा विश्वाससास या कुटिला ? ॥ २ ॥
नाशी स्वसेवनकरा, अन्य जनाही, म्हणोन कोपानें ।
बहु अहित होय, तैसें अहित विषाच्या म्हणों नको पानें. ॥ ३ ॥

—मोरोपंत.

## अभंग.

लांब लांब जटा काय वाढवूनी ? । पावडें घेऊनी क्रोधें चाले. ॥ १ ॥
खायाचा वळसा शिव्या दे जनांला, । ऐशा तामसाला बोध कैंचा ? ॥
सेवी भांग अफू तमाखू उदंड, । फिरतो अखंड भ्रांतीमाजी. ॥ ३ ॥
तुका म्हणे, ऐसा सर्वस्वें बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग. ॥ ४ ॥

जळो त्याचें तोंड, । ऐसी कां गे! व्याली रांड? ॥ १ ॥
सदा भोंवयांसी गांठी, । क्रोध धडधडीत पोटीं. ॥ २ ॥
फोडली गोंवरी । ऐसी दिसे तोंडावरी. ॥ ३ ॥
तुका म्हणे, नाहीं । चित्तसमाधान कांहीं. ॥ ४ ॥

श्वान शीघ्रकोपी । आपणा घातकर पापी. ॥ १ ॥
नाहीं भीड आणि धीर, । उपदेश न जिरे क्षीर. ॥ २ ॥
माणसासी भुंके, । विजातीनें घ्यावे थुंके. ॥ ३ ॥
तुका म्हणे, चित्त । मळिण, करा तें फजीत. ॥ ४ ॥

---

## २६. विवेक व शांति.

### ओंव्या.

अंतरवेधी अंतर जाणें, । बाहेर मुद्रा कांहींच नेणे, ।
म्हणोनी विवेकी शहाणे । अंतर शोधिती. ॥ १ ॥
विवेकेंवीण जो भाव, । तो भावची अभाव, ।
'मूर्खांस प्रतिमा देव,' । ऐसें वचन. ॥ २ ॥

### गीति.

जी शीतागाध जळा सरिता, शिरतां निवे करी तींत, ।
निवतो प्रवेशतां जन सर्वहि तैसा विवेकरीतींत. ॥ १ ॥
हळु हळु झडो अहंता सन्मनीं, वार्धकीं जशी शेंडी; ।
केंडू विवेक विषया, निस्पृह जन वस्तुतें जसा केंडी. ॥ २ ॥

—मोरोपंत.

**श्लोक.**

कर्मानुसार घडते मति सर्व लोकां, ।
कर्मा अधीन फल तेथ, नसेच शंका. ॥
हें सत्य यद्यपि, तरी असतां विवेकें, ।
होणार हो मग सुखें निजकर्मपाकें. ॥ १ ॥
खोटें बरें कार्य असो, तयाचा ।
विचारिजे कीं परिणाम साचा; ॥
कर्तव्य कीजे विबुधें विवेकें, ।
तें अन्यथा शल्य घडे विपाकें. ॥ २ ॥

—भर्तृहरि.

**अभंग.**

माजीं बांधावा भोंपळा, । तैशी बांधों नये शिळा. ॥ १ ॥
सारासार निवडावें, । तैसें जाणोनीयां घ्यावें. ॥ २ ॥
रत्न खडे, येर खडे, । सगट देतां प्राणी रडे. ॥ ३ ॥
एका ठायीं सोनें लाख, । लाख देतां मारी हाक. ॥ ४ ॥
मनुष्य गोड घांस घेतें, । कडु अवघें सांडितें. ॥ ५ ॥
**दास** म्हणे, भक्तिसारा । नको अभक्ता गव्हारा. ॥ ६ ॥

माजीं बांधावा भोंपळा । तैशी बांधों नये शिळा. ॥ १ ॥
घेऊं येई तेंची घ्यावें, । येर अवघेंची सांडावें. ॥ २ ॥
विषवल्ली अमरवल्ली । अवघी देवेंची निर्मिली. ॥ ३ ॥
अवघी सृष्टीची लगट, । करूं नये कीं झगट. ॥ ४ ॥
अवघेंची केलें देवें, । जें जें माने, तेंची घ्यावें. ॥ ५ ॥

अवघें सगट सारिखेंची, । वाट मोडे साधनाची. ॥ ६ ॥
**दास** म्हणे हरिजन । धन्य जाणे तो सज्जन. ॥ ७ ॥

## पदें.

आधीं मन मुंडा, बा! मन मुंडा, । मग तुम्ही ब्रह्मचि धुंडा. ॥ ध्रुवपद ॥
मनची हातीं नाहीं, । तेथें ब्रह्म करील कायी! ॥ आधीं० ॥ १ ॥
मनची मुंडलें नाहीं, । तेथें सद्गुरु करील कायी? ॥ आधीं० ॥ २ ॥
**गोपाळनाथ** सांगतो, सोई । लागा तुम्हि सद्गुरुपायीं. ॥ आधीं० ॥ ३ ॥

वैद्यें गुण केला, बा! गुण केला, । संशय अवघा हरला. ॥ ध्रुवपद ॥
भवरोगाचा झाडा । आत्मप्रचीति देऊनि पुढां, ॥ वैद्यें० ॥ १ ॥
तळमळ जीवपणाची भारी । औषध देउनि केली दूरी. ॥ वैद्यें० ॥ २ ॥
शांतिसुखाचें पथ्य, । मन मारुनि केलें हित. ॥ वैद्यें० ॥ ३ ॥
**गोपाळनाथ** म्हणे, मी रोगी । सद्गुरु वैद्य मिळाला वेगीं. ॥ वैद्यें० ॥ ४

## अभंग.

मान-अपमान-गोवें । अवघें गुंडूनी ठेवावें. ॥ १ ॥
हेंची देवाचें दर्शन, । सदा राहे समाधान. ॥ २ ॥
शांतीची वसती । तेथें खुंटे काळगती. ॥ ३ ॥
आली उर्मी साहे, । **तुका** म्हणे, थोडें आहे. ॥ ४ ॥

कई वाहावें जीवन, । कई पलंगीं शयन. ॥ १ ॥
जैसी जैसी वेळ पडे, । तैसें तैसें होणें घडे. ॥ २ ॥
कई भोज्य नानापरी, । कई कोरड्या भाकरी. ॥ ३ ॥
कई बैसावें आसनीं, । कई पायीं अनवाणी. ॥ ४ ॥
कई उत्तम प्रावणें, । कई वसनें तींही जीर्णें. ॥ ५ ॥

कई सकल संपत्ती, । कई भोगणें आपत्ती. ॥ ६ ॥
कई सज्जनाशीं संग, । कई दुर्जनाशीं योग. ॥ ७ ॥
तुका म्हणे, जाण । सुख दुःख तें समान. ॥ ८ ॥

## १७. पराक्रम, खरें तत्त्व.

**ओंव्या.**

दृष्टीस न भरे केसरी, । परी क्षणें गज विदारी, ।
वज्र धाकुटें परी । चूर्ण करी सकळ जगाचें. ॥ १ ॥
खुजट दिसे वामन, । परी ढेंगांत आटी त्रिभुवन, ।
घटोद्भवाची तनु सान, । परी सागर समग्र प्राशिला. ॥ २ ॥
सूर्य काय मुष्टींत झांके, । चंद्र न लपे कदा कांखे, ।
ऐरावत शक्राचा देखें । लपेल कैसा पर्णकुटीं? ॥ ३ ॥
सिंधु न माये रांजणीं, । बोचक्यांत लपेल कदा अग्नी? ।
मेरु कांखेसी घालुनी । कोणा लपवे, सांग, पाहीं? ॥ ४ ॥
लवणाचा घट थोर । आवरूं न शके गंगापूर, ।
वानरांमाजी रघुवीर । कदाकाळीं झांकेना. ॥ ५ ॥
भूतांमाजी शंकर, । किरडांमाजी धरणीधर, ।
रंकांमाजी राजेंद्र । कदा झांकिला जाईना. ॥ ६ ॥
पहा दीपककळा असे केव्हढी, । परी अंधकाराचीं नगरें मोडी, ।
लघु वज्र, परी आपुले प्रौढी । कडेन्चि पाडी पर्वताचे. ॥ ७ ॥
नातरी केवढा अंकुश, । स्थूल देहासी करी कासावीस, ।
म्हणोनी तेजस्वी पुरुष । नसे वयाची अपेक्षा. ॥ ८ ॥

अग्निस्फुलिंग केव्हढा । परी क्षणमात्रें जाळी तृणहुडा, ।
म्हणोनी स्थूळ नसे तो गाढा, । जो तेजस्वी तोची थोर. ॥ ९ ॥
जरी मातली जंबुकावळी, । तरी केसरीपुढें ते काय बळी ? ।
नातरी उगवलिया अंशुमाळी । काय तिमिरें मांडती ? ॥ १० ॥
—श्रीधर.

अहंकामादिक राक्षस । मारोनी पावला जो यश, ।
सुरवर पूजिती जयास । तोची एक पुरुषार्थी. ॥ ११ ॥
लोकलज्जेसी भिवोनी, । ममतायोषितेसी सांडिली ज्यांनीं, ।
ये जनीं वनीं त्रिभुवनीं । तोची एक पुरुषार्थी. ॥ १२ ॥
सर्व कर्मीं कुशळपण, । समता दया सेवी जयाची आंगवण, ।
जया अहंमता नाहीं जाण । तोची एक पुरुषार्थी. ॥ १३ ॥
स्वयें न बोले वाटिवेसी, । शत्रु निर्दाळणीं उल्हास मानसीं, ।
आपपर नेणे रणभूमीसी, । तोची एक पुरुषार्थी ॥ १४ ॥
क्षात्रधर्मीं निधडा पूर्ण, । तृणप्राय देखे निजजीवन, ।
रिपु निर्दाळी, 'थोर सान' । न म्हणे, तोची पुरुषार्थी. ॥ १५ ॥
सर्व भूतीं दया पूर्ण, । स्वकर्माविषयीं सावधान, ।
गुरुभजनीं उदित मन, । तोची एक पुरुषार्थी. ॥ १६ ॥
जो न सांडी निजधर्मासी, । स्वामिकार्जीं नव्हे आळसी, ।
मातृपितृभक्ति जयासी । तोची एक पुरुषार्थी. ॥ १७ ॥
बहुसाल मिळती खद्योत, । तरी न जिंकवे रवि एक, ।
माजरी काय व्याघ्रासन्मुख । ठाण मांडोनी राहेल ? ॥ १८ ॥

पतंग आपुले प्रभेकरून । काय गिळूं शकेल हुताशन ? ।
पहा, हो ! धेनूचा नंदन । मदगजेंसीं भिडेल ? ॥ १९ ॥
कद्रुतनय बहुतेक । वैनतांतनय एकाएक, ।
त्यातें काय ते मशक । पराभवीतील संग्रामीं ? ॥ २० ॥
कमलमृणालाचेनी तंतें । केवीं बांधवेल मातंगातें ? ।
कटिभंग अळिकेचेनी सूत्रें । केवीं मेरु वेंधवेल ? ॥ २१ ॥
धेनूचें वत्स निजशृंगेंकरी । जें हिमालयाचें हृदय विदारी, ।
मशक सागरा प्राशन करी, । हें कैसेनी घडों शके ? ॥ २२ ॥
महा अंधाचेनी निजपुत्रें । भेदिजे पिपीलिकेचे नेत्र, ।
चरणविहीन पर्वत—। मस्तकीं केवीं वळंघेल ? ॥ २३ ॥

—एकनाथ.

तापसांमाजी कैलासनाथ, । कीं पक्षियांमाजी विनतासुत, ।
नातरी देवांमाजी शचीनाथ, । न लोपेची सर्वथा. ॥ २४ ॥
मृत्तिकेमाजी कस्तुरी, । कीं वृक्षांमाजी मैलागिरी, ।
कीं श्वापदांमाजी गजकेसरी, । न झांकेची सर्वथा. ॥ २५ ॥

—महीपति.

## श्लोक.

तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना ।
दावी धन्यास जठरार्थ कसें पहाना. ॥
दे आळवून जरि हस्तिप 'बाप भाई !' ।
घेतोचि घांस गजराज, कशी वढाई ? ॥ १ ॥
सिंहाचा जो बाल, तोही चपेटा ।
मारी त्याला, जो करी मत्त मोठा ; ॥

तेजस्वी जे, वृत्ति ऐशी तयांची, ।
तेथें कांहीं चाड नाहीं वयाची. ॥ २ ॥

—भर्तृहरी.

## अभंग.

अंधळें तें सांगे सांगितल्या खुणा, । अनुभव देखणा प्रगट त्या. ॥ १ ॥
नांदणूक सांगे वडिलाचें बळ, । कैसा तो दुर्बळ सुख पावे ? ॥ २ ॥
तुका म्हणे, नांदों आपल्या प्रतापें, । तयाची लोकापें स्तुती सांगों. ॥ ३ ॥

नाहीं सुगंधाची लागत लावणी । लावावी ते मनीं शुद्ध होतां. ॥ १ ॥
वाऱ्याहातीं माप चाले सज्जनाचें, । कीर्तिमुख त्याचें नारायण. ॥ २ ॥
प्रभा आणि रवि काय असे आन ? । उदयीं तंव जन सकळ साक्षी. ॥३॥
तुका म्हणे, बरा सत्याचा सायास, । नवनीता नाश नाहीं पुन्हा. ॥ ४ ॥

सत्या मान वाढे, । गवाळाची चाली खोडे. ॥ १ ॥
उतरे तें कळे कसीं । विखरोनी सर्व देशीं, ॥ २ ॥
घरामध्यें राजा । नव्हे, हो बा ! पाटपूजा ॥ ३ ॥
तुका म्हणे, साचें । रूप तें दर्पणाचें. ॥ ४ ॥

तांबियाचें नाणें न चाले खऱ्या मोलें, । जरी हिंडविलें देशोदेशीं. ॥ १ ॥
करणीचें कांहीं न मने सज्जना, । यावें लागे मना वृद्धांचिया. ॥ २ ॥
हिरियासारिखा दिसे शिरगोळा, । पारखी ते डोळा न पाहती. ॥ ३ ॥
देउनियां भिंग, कमाविलें मोतीं । पारखिया हातीं घेतां नये. ॥ ४ ॥
तुका म्हणे, काय नटोनियां व्यर्थ ? । आपुलें हें चित्त आपणा ग्वाही. ॥५॥

---

**मुंबई.**—खेतवाडी व्याकरोड घर नं. १–२ व ३ येथें 'तत्त्वविवेचक' छापखान्यांत रा. भिवा हरी यांनीं मालकाकरितां छापिलें.

## आमचेकडे विक्रीस असलेल्या पुस्तकांपैकीं

# कांहीं पुस्तकांची यादी.

## राजवाड्यांची ज्ञानेश्वरी

ज्या पोथीवरून छापली आहे ती पोथी होयसळवंशीय जयंतपाळाचा गुरु मुकुंदराज याची होय. ही पोथी शक १२१२ पासून शक १२४० पर्यंतच्या काळांत केव्हां तरी लिहिलेली आहे. म्हणजे ती थेट श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वेळची आहे. ही पोथी म्हणजे मराठी भाषेंतील कागदावर लिहिलेला अत्यंत जुना असा पहिला लेख होय.

पहिला खंड ( अध्याय १ ते १२ ) छापून तयार आहे. ग्रंथाची पृष्ठसंख्या ६८२ आहे. शिवाय मराठी भाषेवर रा. राजवाड्यांचा जो आजपर्यंत व्यासंग झाला आहे, त्याचें सार म्हणून शंभरांवर पृष्ठांच्या प्रस्तावनेंत मराठी भाषेच्या उत्पत्तीचें त्यांनीं उत्कृष्ट विवेचन केलें आहे. मूळ प्रतीच्या एका पृष्ठाचें चित्र दिलें आहे व ग्रंथाच्या शेवटीं कठिण शब्दांचा कोश दिला आहे. हा खंड विकत घेणाराला पुढील खंडाची किंमत अगाऊ द्यावयास पाहिजे. फुटकळ खंड विकणें इष्ट व शक्य नाहीं. दोन्ही खंडांची किंमत चार रुपये. प्रत्येक खंडास ट. ख. ८४. पहिला खंड ग्राहकांकडे पाठवितांना ४८४ ची व्ही. पी. करण्यांत येते; पैकीं दोन रुपये पुढील खंडाच्या किंमतीबद्दल अमानत ठेवण्यांत येतात. २ रा खंड तयार झाल्यावर फक्त ८४ ची व्ही. पी. करून पाठविण्यांत येईल.

कै. डॉक्टर काशिनाथ नारायण गोखले यांनीं तयार केलेलीं

# वैद्यकीय पुस्तकें.

**सूतिकाशास्त्राचीं मूलतत्वें:**—उत्तम प्रत. सचित्र. ह्या पुस्तकाचे एकंदर १५ भाग आहेत. अनुक्रमणिकेंत ह्या प्रत्येक भागांतील मुद्दे दाखविले आहेत. गर्भाशयांतून गर्भमुक्तीचे निरनिराळे देखावे हुबेहुब वठविले आहेत. या पुस्तकाचा स्त्रियांस फार उपयोग आहे. किंमत ३ रु., ट. ख. ८=

**सूतिकाशास्त्राचीं मूलतत्वें:**—मध्यम प्रत. किं. २ रु., ट. ख ८=

**गृहपरिचर्या** आणि **अरोग्यशास्त्र:**—सचित्र. ह्या पुस्तकांत रोग्याची हरएक प्रकारची शुश्रुषा कशी ठेवावी व शरीराचे व्यापार कसे चालतात, हें सांगितलें आहे. किंमत १॥ रु., ट. ख. ८-॥

**सुईणपण:**—हें पुस्तक सुईणीकरितांच आहे, तथापि तें सर्व स्त्रियांनीं वाचून ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. किंमत १ रु., ट. ख. ८-

**शारीर** व **इंद्रीयविज्ञानशास्त्राचीं मूलतत्वें:**—सचित्र. या पुस्तकांत मनुष्यशरीराच्या रचनेची सामान्य माहिती व इंद्रियांच्या कामाचें त्रोटक वर्णन दिलें आहे. हें पुस्तक प्रत्येकानें वाचून महत्वाच्या गोष्टींचें ज्ञान करून घेण्याजोगें आहे. किंमत ॥• रु., ट. ख. ८-

**एकाद्यास एकाएकीं इजा झाली असतां तीवर ताबडतोब करण्याचे उपाय:**—सचित्र. बुडणें, टेंचण, मोडणें, भाजणें विषारी पदार्थ पोटांत जाणें, इत्यादि अनेक प्रकारच्या अपघातांवर ह्यांत उपचार सांगितले आहेत किंमत ॥• रु., ट. ख. ८-

**मनुष्यशरीराचें थोडक्यांत वर्णन:**—किंमत ८- ट. ख. ८॥

# विद्याधर वामन भिडे बी. ए. ह्यांचीं पुस्तकें.

**१. राघवीयपरीवाह, पूर्वार्द्धः**—सर्ग १ ते १०; किं. १२ आणे. ह्या काव्यांत श्रीमद्वाल्मीकिरामायणाच्या आधारानें श्रीदाशरथिरामचरित्र गुंफिलें आहे. राष्ट्रमत, काळ, सयाजीविजय वगैरे वर्तमानपत्रांचे व प्रो. राजवाडे व प्रो. वेलवलकर ह्या गृहस्थांचे चांगले अभिप्राय ह्या काव्यावर आले आहेत.

**२. काव्यकुसुमावलीः**–किं. ८ आणे. ह्यांत भिडे ह्यांचीं दहा लहान लहान काव्यें संकलित केलीं आहेत. काळ, इंदुप्रकाश, वगैरे पत्रांचे व रा. सा. विष्णु मोरेश्वर महाजनी व प्रो. वेलवलकर वगैरे गृहस्थांचे ह्या काव्यसमुदायावर चांगले अभिप्राय आलेले आहेत.

**३. मराठी शब्दांचें उद्घाटनः**–किं. ८ आणे. मराठी शब्दांच्या अभ्यासापासून प्राचीन काळासंबंधानें अनेक प्रकारची माहिती कशी मिळते हें सुमारें २०० शब्दांच्या उदाहरणांनीं ह्या पुस्तकांत स्पष्ट केलें आहे. ह्या प्रकारचा हा मराठी भाषेंत पहिलाच निबंध होय. ह्या निबंधास डेक्कन व्ह. ट्रा. सोसाएटी पुणें, हिनें बक्षीस दिलें आहे.

हीं व ह्यांशिवाय इतर सर्व तऱ्हेचीं पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील.

**महादेव केशव काळे,**

पेंडसे यांची वाडी, गिरगांव-मुंबई.

# रबरटाइपप्रेस

रबरी आणि पितळी शिक्के, लाखेवरील सील, वुडकट्, स्टीरिओ, इलेक्ट्रो, शिपायांचे पट्टे, सोन्याचांदीवरील प्रेक्षणीय मोनोग्राम, वगैरे कामें आमच्या कारखान्यांत काळजीपूर्वक केलीं जात असून तीं उत्तम होत असल्याबद्दल औद्योगिक प्रदर्शनांत सोन्याचीं आणि रुप्याचीं पदकें मिळालीं आहे.

सर्व कामांची आणि सामानाची माहिती देणारा सचित्र कॅटलॉग अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविणारास फुकट पाठविला जाईल.

पी. पी. रेळे आणि कंपनी,

काळकादेवीरोड, मुंबई.

REFBK-0019898

REFBK-0019898